चरित्र ७६ स. १८९४

# महंमदाचा वृत्तांत

( श्री प्रिंटर्स अ‍ॅण्ड स्टेशनर्स, ठाणे )

१०५

चरित्र

४६० सं.ग्रं.

नं. ४६४

# महमदाचा वृत्तांत.

# LIFE OF MOHAMMAD.

BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.

1,000 Copies. A. D. 1894.

PRINTED AT D. B. PADMANJI'S VICTORIA
PRINTING WORKS.

## दुसऱ्या आवृत्तीची सूचना.

——:o:——

हें पुस्तक रेव॰ जार्ज बोयनकृत मूळ इंग्रेजी ग्रंथाचें भाषांतर आहे. त्याची ही दुसरी आवृत्ति ट्राक्ट सोसैटीच्या विनंतीवरून रेव॰ कासम महमदजी (अमेरीकन मिशन, सातारा,) ह्यांनीं तपासून त्यांत कित्येक ठिकाणीं नवीन मजकूर घातला आहे.

एडिटर, ट्राक्ट सोसैटी.

# महंमदाचें वृत्तांत.

## प्रकरण १.

### अरबस्थान व अरब लोक.

एशिया खंडाच्या दक्षिण भागीं हिंदु सागरांत मोठमोठीं अशीं तीन उपद्वीपें आहेत. मध्यें हिंदुस्थान, त्याच्या पूर्वेकडे चिनैहिंदुस्थान आणि पश्चिमेकडलि उपद्वीप अरबस्थान या नांवेंकडून प्रख्यात आहे. हिंदुस्थान आणि चिनैहिंदुस्थान यांचीं उत्तरेकडील अंगें फार रुंद आहेत. आणि दक्षिणेकडे त्यांची रुंदी उत्तरोत्तर कमी कमी होत गेली आहे. पण अरबस्थान असें नाहीं; तें दक्षिण अंगीं फार रुंद असून त्याच्या पूर्व पश्चिम सीमा उत्तरेकडे एकमेकांशीं जवळ जवळ होत गेल्या आहेत. ह्मणून त्याचा आकार विषम त्रिकोनासारिखा आहे. ह्या देशाचा विस्तार दाहा लक्ष चौरसमैलांपेक्षां सरस असून हिंदुस्थानापेक्षां किंचित कमी आहे. याच्या दक्षिण बाजूस अरबी ( किंवा हिंदु ) समुद्र लागून आहे. या देशाची सर्वांहून मोठी रुंदी १३०० मैल आणि लांबी ह्मणजे पालमिरापासून आदनापर्यंत १५०० मैलांपेक्षां अधिक आहे. ह्या देशांत हिंदुस्थानांतल्या सारिख्या मोठाल्या नद्या नाहींत. आणि वास्तविक पाहिलें असतां त्या देशांतील कोणतीही नदी गलबत हाकारून नेण्यासारिखी नाहीं. परंतु त्याच्या पूर्वसीमेस इराणाचें

आखात व एफ्रात नदी आणि पश्चिमेस तांबडा समुद्र म्हणून त्या देशाला पुष्कळ फायदा होत असतो.

या देशाचे जे भाग समुद्रालगत आहेत ते सुपीक आहेत. तरी विशेषेंकरून जे भाग सुफ व अरबी या समुद्रालगत आहेत ते बरेच सुपीक आहेत, पण बाकीचा सर्व भाग बहुतकरून वाळवंटांकडून व्यापला गेला आहे. हें अरबस्थान वाळवंटांविषयीं फार विख्यात आहे व त्यांत लागवड करण्याजोग्या अशा बागायती जमिनी थोडक्या आहेत. दुसऱ्या देशांतील लोक निर्जल व वालुकायुक्त प्रदेश सोडून देऊन जो प्रदेश सुपीक असतो तेथें जमावानें वस्ती करितात. पण अरबस्थानांतील लोक वाळवंटांमध्यें देखील वस्ती करितात. त्यांत नगरें केवळ थोडकीं असून त्यांतील वस्तीही लहान आहे. या विशाल देशांत सर्वांहून मोठीं अशी साहा शहरें आहेत आणि त्यांतील एकंदर प्रजा पाहूं गेलें असतां १,९०,००० देखील नाहीं. अरबस्थानांतील सर्व प्रजा सुमारें एक कोटी किंवा हिंदुस्थानांतला केवळ पंधरावा हिस्सा इतकी आहे.

हिंदु सागराच्या कांठीं डोंगरी प्रदेशांत जे लोक राहतात त्यांची अबादी उष्ण मासांत जो नियमित पर्जन्य पडतो त्याकडून होत असती. ज्या प्रदेशांत यापेक्षां अबादी कमी आहे ते देश रात्रीं पुष्कळ दहिंवर पडण्याकडून सुपीक होत असतात. तेथील वाळवंटांत कोठे कोठे झरे आहेत, पण ते माहितगार वाटसरांस मात्र ठाऊक आहेत. शहरांत तर नळ व हौद यांच्या योगानें पाण्याचा पुरवठा केला आहे. मक्का व बगदाद यांम-

धील वालुका प्रदेश समिएल ह्मणजे तप्त झळई इजक-डून इतका तप्त होतो कीं, त्याकडून वाटसरांचा दम कों-डून जातो. अन्य देशांतील राहणाऱ्यांस जितक्या सामान्य सुखसोई असतात तितक्या सोई एथें नसल्याकरून ज्या फार थोडक्या आहेत त्याच अपरूप व मोलवान अश्या झाल्या आहेत. तेथील वालुकासमुद्रांत बहुत हिरवे टापू जिकडे तिकडे पसरले आहेत, असें आढळण्यांत येतें. एथें छाया, पाणी, कुरणें आणि फळफळावळ यांची समृद्धि असती ह्मणून फिरस्ते अरब लोक बहुतकाळपर्यंत येथें राहत असतात. ज्या वनस्पती उंट खातात त्या तप्त व नापीक अश्या वाळूच्या मैदानांत देखील सांपडतात. डोंगर व खोरीं हीं तर तऱ्हेतऱ्हेचे अनेक उपज ह्मणजे एरंड, सोनामुखी, चिंच, बुंद, डिकाच्या बाभळी, ताड, खजूर, नारळ, अंजीर, निंबें, नारिंगें, खरबुजें, खिरे, बदाम, निवडुंग, आणि फिल्बर्ते यांकडून भरलेलीं आहेत. तेथील सर्व लोकांच्या सामान्य खाण्याचा पदार्थ वरग आहे त्याला धौरा ह्मणतात. अरबिया पेत्रिया प्रदेश जो खनान व मिसर यांकडचा आहे त्याच्या टेंकड्यांवर बोकड, तरस, बिब्ब्यावाघ, कोल्हे, लांडगे, आणि अस्वलें हीं जनावरें राहतात. आणि वाळवंटांत हरणें, मृग, जर्बोआ हे पशु राहतात. तेथील लोक मेंढरें व बैल यांस खाण्यासाठीं तेथें पाळीत असतात.

अरबी घोड्यांची कीर्ति तर जगप्रसिद्ध आहे. एका जातीचे घोडे ओझें वाहण्यासाठीं आहेत, आणि जे घोडे उंच जातीचे आहेत ते फारच चपळ, सुशिक्षित आणि बळकट आहेत, ह्मणून ते स्वारी करण्यासाठीं राखले आहेत.

ते आपल्या धन्यासंगतीं एकाच तंबूंत राहतात. धनीही त्यांशीं लेंकराप्रमाणें ममतेनें वागतो. ते घोड्यांची वंशावळी फार जपून राखितात. त्यांतून कित्येकांची वंशावळी तर बरोबर दोन हजार वर्षांपर्यंत मिळती असें ह्मणतात. वालुकास्थलांतील अरब लोकांचा जीव आपल्या घोड्यांवर इतका असतो कीं ते त्यांस सोबती मानितात, सेवक मानीत नाहींत. आपल्या एकुलत्या लेंकराच्या मरणसमयीं जें दुःख होतें, इतकें मोठें दुःख आपल्या आवडत्या घोड्याच्या विरहावरून त्याच्या धन्यास होतें.

अरबी फिरस्त्यांस उंट हेंही अमोलिक जनावर आहे. त्याच्या खुरांचा बांधा व मुखाची आकृति वालुकासमुद्रांतून जाण्याजोगी बनावली आहे ह्मणून ते लोक त्याला वालुकासमुद्रांतील जहाज असें ह्मणतात. हें जनावर कित्येक दिवस खाण्यापिण्यावांचून मार्ग कंठितें; ह्मणून उंट हाच वालुकास्थलांतून सामान वगैरे वाहून नेण्यासाठीं मुख्य उपाय आहे. उंटाची एक जात कांहीं निराळी आहे, ती चपळ असतां याच गुणावरून मोलवान अशी मोजली गेली आहे. अरबस्थानांतील गाढव सुंदरता व शक्ति यांविषयीं घोड्याची बरोबरी करितें आणि तें घोड्यापेक्षां मजबूत असून थोडक्यांत पोसलें जातें ह्मणून यात्रेकरू व शिपाई लोक फारकरून गाढव निवडून घेतात.

जशी त्या देशाची तऱ्हा विलक्षण आहे, तसा त्या लोकांचा स्वभावही विलक्षण आहे. रीतिभातींविषयीं हिंदुलोकांची स्थिति पिढ्यानपिढ्यापासून अपालट आहे असें बहुत गोष्टींवरून सांगतां येतें. आणि अरब लोकांचेंही

अपालटपण त्यांपेक्षां कमी आहे असें नाहीं. बेदावी लोकांचें सांप्रतचें वर्णन त्यांचे पूर्वज जे ईयोब अथवा मोशे यांच्या वेळेस होते, त्यांलाहि बरोबर लागतें. सुमारें ४००० वर्षेपर्यंत त्यांनीं सुंता करण्याचा विधि बरोबरच राखिला आहे. पाहिलें असतां परक्या लोकांचा सहवास हेंच फेरफार होण्याचें मोठें कारण आहे. ब्राह्मण, मुसलमान, पोर्टुगीस, इंग्लिश अश्या लोकांचा हिंदुस्थानांत लागोपाठ संचार झाल्यावरून हिंदूमध्यें अनेक फेरफार झाले असें नजरेस येतें. पण हें कारण अर्बस्थानच्या विशेष भूकास्थितीस लावून पाहिलें असतां, केवळ थोडकाच फेरफार दिसून येतो.

ह्या देशाच्या कोणत्याही बाजूस भूमध्यसमुद्र लगत नाहीं. अरबस्थानाच्या वायव्यभागीं मिसर व खनान हे दोन देश भूमध्यसमुद्राचा कांठ परस्पर वांटून घेतात. आणि तसें ते ह्या देशाला त्या समुद्रापासून दूर राखितात. ह्या गोष्टीवरून भूमध्यसमुद्रतीरस्थ राष्ट्रांच्या बखरींत जे मोठमोठे धक्के, उलटापालटी व फेरफार जाणविले आहेत त्यांपासून अर्बस्थान कांहीं प्रकारें बचावलें गेलें. जिंकणाऱ्या योध्यांनीं आपणासाठीं जो मार्ग निवडून घेतला त्यापासून अर्बस्थान एका बाजूस राहिलें गेलें. कित्येकांनीं हा देश हस्तगत करण्याविषयीं उद्योग केला खरा, तरी त्यांतील कोणाचेहि प्रयत्न मुकरर कधीं सिद्धीस गेले नाहींत. अशुरी किंवा मादी राज्यांच्या पायास अरब लोकांत कधींही थारा मिळाला नाहीं. इराणी राजे जरी अरब लोकांचे मित्र होते आणि यांनीं त्यांचा इतका बहुमान राखिला होता कीं ते त्यांजकडे प्रति वर्षीं उदाचा नजराणा

पाठवीत असत, तरीं त्यांच्यानें त्यांस आपले खंडणीदार महसा करवेना. ते इराणी राज्याच्या स्वामित्वापासून इतके दूर होते कीं, जेव्हां कांबिसस मिसरावर स्वारी करण्यास गेला, तेव्हां अरबी प्रदेशांतून पार जाण्यासाठीं त्याला यांजपाशीं परवानगी मागणें प्राप्त झालें. आणि जेव्हां शिकंदरानें तें पराक्रमी राज्य हस्तगत केलें होतें, तेव्हां दुसऱ्या आजूबाजूच्या सर्व राष्ट्रांमधून त्यानें मात्र त्याची परवा न धरितां त्याकडे आपला वकील पाठविला नाहीं. औगस्तस काइसार त्याच्या कारकीर्दीत इलियस गालस यानें अबस्थानांत जितका प्रवेश केला, तसा कोणी रोमी मनुष्यानें कधींही केला नव्हता, तो देश हस्तगत करणें त्याला इतकें दुरापास्त झालें कीं शेवटीं आपलें अवशेष सैन्य घेऊन त्याला लवकर परतावें लागलें.

याप्रमाणें अरब लोक आपल्या स्वतंत्र स्थितीचें सत्व रक्षण करण्याविषयीं वंशपरंपरेनें सर्वदां यशस्वी होत आले आहेत.

अरब लोकांमध्यें एकच जात आहे, पण हिंदुस्थानच्या प्रजांमध्यें पराकाष्ठेचा भेद आहे. याचें कारण हेंच कीं, त्यांमध्यें अनेक जातींचे लोक मिळाले आहेत. आणि त्या जातिभेदाचीं लक्षणें सुदृढतेनें कायम राखिलीं आहेत. एथील लोक अनेक प्रांत मिळून किमानपक्ष २० भाषा तरी बोलत असतील. आणि या भाषाभेदापेक्षां त्यांच्या जातिभेदाविषयीं दुसरीं बहुत स्पष्ट लक्षणें त्यांमध्यें दिसून येतात. अरब लोक तर स्वभावतः एकच लोक असे आहेत आणि ते अरबी ही एकच भाषा बोलतात.

अरबस्थान व अरब लोक.

त्यांच्या स्वभावामध्यें, स्वतंत्रतेची आवड हें एक मुख्य लक्षण आहे. प्राचीन काळापासून अरबस्थानावर बहुत राजे व पुष्कळ लहान लहान अधिकारी अधिकार करीत आले पण ते परस्परें स्वतंत्र होते. ते आपल्या वडिलोपार्जित नेमाप्रमाणें आपआपल्या देशावर एक प्रकारचा एकछत्री अमल करीत आले. कुटुंबावर बापाची सत्ता असावी, असा जो मनुष्यामध्यें आज्ञांकितपणाचा मूळ धर्म आहे, तो धर्म अरब लोकांत बहुत काळापासून चालत आला आहे. एक एक लहान मेळा हा एका कुटुंबाप्रमाणें मानला जाऊन त्याजवर जो मुख्य अधिकारी असतो, तो त्याजवर बापाप्रमाणें अधिकार करितो. ह्या गोष्टीस बहुत पिढ्या गुजरल्यावरून किंवा देशांतर झाल्यावरून ह्या लोकांमध्यें फुटाफूट होऊन त्यांच्या अनेक शाखा झाल्या आहेत आणि त्या शाखा स्वतंत्र आहेत, तरी त्या एकच कुळ अशा मानल्या जातात. ते आपल्या वंशावळीविषयीं बारीक विचार करून जी शाखा मुख्य आहे ती विशेष महत्वाची आहे असें मानितात. लोकराज्याचा प्रकार अरब लोकांत कधीं माहीत नव्हता. पण कित्येक भागांत कोणी मोठा शेख किंवा शेखाचा शेख निवडून ठेविला असतां त्याला लोक विशेष मान देत असतात. महान शेख ही किताबत एका कुळास मात्र आहे. आपणावर अधिकारी असावा ह्मणून शेख लोक त्या महान शेखांतील कोणीएकाला निवडून घेतात. पण त्या अधिकाऱ्याला दुसऱ्या रयत लोकांप्रमाणें शेख लोकांला सत्तेनें बोलावण्याचा अधिकार नसतो. प्रत्येक महान शेख आपल्याला दगडाच्या गढी-

मध्यें कोंडून घेतो किंवा आपले उंट व जनावरांचे कळप घेऊन वाळवंटांच्या मैदानांत फिरत असतो. असें करण्याकडून मी सर्व मानवी अधिकारांपासून स्वतंत्र आहे असें तो आपणाला मानितो. कधीं कधीं दोन कुळांमध्यें तंटे बखेडे उद्भवले असतां ते कोणी अधिकाऱ्याकडून मिटवले जात नाहींत, पण बहुधा तरवारीकडून मिटविले जातात. अरबस्थानावर तर कोणी कधींच राजा झाला नाहीं. केवळ साना व मस्कत अश्या कित्येक स्थिरावलेल्या प्रांतांमध्यें मात्र प्रसंगानुरूप अधिकारी होत आले. पण अरब लोक पहिल्यापासून बहुतकरून स्वतंत्र स्थितींत राहत आले आहेत. याविषयीं पुरावा पाहिजे असल्यास ख्रिस्ती शास्त्राच्या उत्पत्ति प्रकरणांत एक भविष्य अढळण्यांत येतें, तें चांगलें लक्ष लावून पहायाजोगें असें आहे. तें येणेंप्रमाणें; ईश्वरानें आब्राहामाला याप्रमाणें ह्मटलें कीं, "इस्माएलाविषयीं म्यां तुझें ऐकिलें आहे, पहा, म्यां त्याला आशीर्वाद दिल्हा आहे, आणि मी त्याला सफळ करून फार फार वाढवीन. तो बारा अधिकाऱ्यांस जन्मवील आणि मी त्याला मोठें राष्ट्र असें करीन. परंतु तो रांठ माणूस होईल. त्याचा हात सर्वांविरुद्ध आणि सर्वांचा हात त्याविरुद्ध असें होईल. तथापि तो आपल्या सर्व भावांच्या समोर राहील." याप्रमाणें ३८०० वर्षांमागें भविष्य झालें. तर सांप्रतचे अरब लोक इस्माएलाच्या वंशांतील आहेत.

लढाईची हौस ही तर पहिल्यापासून अरब लोकांचें स्वाभाविक बिरीद आहे. अगदी क्षुल्लक कारणावरून देखील कुटुंबामध्यें किंवा कुळामध्यें वारंवार प्राणांतिक लढाया

चे प्रसंग गुजरतात. आणि एकदां लढाया उद्भवल्या ह्मणजे त्या विझणें फारच दुरापास्त आहे. अरब लोकांस लुटणें व लढणें यांची फारच आवड आहे. जर कोणी कीर्तिमान योद्धा जोखिमाच्या कामाला बोलावितो किंवा मातबर लूट मिळेल असें वचन देतो तर त्याजकडे जमून जावें ह्मणून लोकांचें बरेंच समुदाय सर्वदां सिद्ध असतात; यामुळें हजारों लुटारू लोक जमा करण्यास कांहींच आयास पडत नाहीं. मार्गस्थांस लुटण्यासाठीं लुटारू लोकांस कांहींच अवघडपण नाहीं. मिसर व खनान देशांमध्यें व सूर्या देशाच्या सीमेवर आणि एफ्रात नदीजवळच्या प्रदेशांत इकडे तिकडे हिंडणारे असे लुटारू लोकांचे मोठमोठे थवे नेहेमीं आहेत. ते वाटसरू व काफले यांची पाळत ठेवून एखाद्या सुप्रसंगीं त्यांजवर घाला घालण्यास सर्वदां टपत असतात.

रानटी लोक व बेबंद राज्य यांमध्यें जी आपआपसांत सूड उगाविण्याची चाल असती ती अरब लोकांत फार रूढींत आहे, यावरून अरब लोक ही रानटी माणसें आहेत असें दिसून येतें. ते इतके गर्विष्ठ आहेत कीं, कोणी त्यांची बेअदबी केली नसतांही त्यानें आपली बेअदबी केली असें कल्पितात. आणि त्या कल्पित अन्यायाबद्दल त्या माणसाचा प्राण घेण्यावांचून दुसरें कोणतेंही पारिपत्य ते कबूल करीत नाहींत.

अरब लोक हे फार पाहुणचार करणारे व उदार आहेत, असें बहुतांचें ह्मणणें आहे. आणि हे सद्गुण आह्मी मोठ्या आवडीनें बाळगितों असें तेही ह्मणतात. परंतु जोंपर्यंत लुटीचा सोस व परक्यास शत्रूप्रमाणें लेखणें हे दुर्गु-

त्यांमध्यें आहेत तोंपर्यंत त्यांमध्यें सदहू सद्गुण आहेत असें आमच्यानें सहसा ह्मणवत नाहीं. जर लुटीत नाहीं तर आह्मी कशानें उदार होऊं, असे विचार कदाचित ते आपल्या मनांत आणीत असतील. पाहिलें असतां, जें अनायासानें मिळविलें जातें तें सहज देतां येतें, ही गोष्ट वास्तविक आहे. ज्यांनीं बहुत काळानें व श्रमानें धन मिळविलें आहे, ते बहुधा अल्पव्ययी असतात. जेणेंकरून अरब लोक लोभग्रस्त होतील, अशी कांहीं जिन्नस ज्यापाशीं नाहीं त्याला अरबस्थानांत बहुधा निर्भयपणें हिंडतां येतें. आणि पाहुणचार करणारे असे बहुत लोकही त्याला वाटेनें आढळतील. ज्यानें आपली मीठ भाकर खाल्ली आहे, त्याचा विश्वासघात करावा किंवा त्याला मोकलून द्यावें, असें कोणींही अरबी मनुष्य सहसा करणार नाहीं.

अरब लोक हे वक्तृत्व विद्येचा पहिल्यापासून मोठा मान करीत आले आहेत. आणि या विद्येचा अभ्यास ते गद्यपद्यात्मक ग्रंथावरून करितात. त्यांचीं काव्यें दृष्टांताप्रमाणें सूत्रबद्ध आहेत. कविता करणें हें मोठें भूषण आहे असें मानून बडे लोक देखील तिजविषयीं पूर्वीं अभ्यास करीत असत. मोठ्या कवीला तर ते लोक इतिहासकर्त्ता, भाषेचा कित्ता, नीतिशिक्षक, आपल्या कुळाचा उत्तम रक्षक व अत्युत्कृष्ट भूषण अश्या किताबांनीं सन्मान देत असत.

वर्षांतून एक वेळ सर्व कवि एक महिन्यापर्यंत एकत्र मिळत आणि आपआपल्या कवनामध्यें कोणतें कवन पसंत किंवा नापसंत हें ठरविण्यासाठीं वादविवाद चालवीत

ग्रंथ. ४६४



असत. मग जीं कवनें उत्तम ठरत तीं कांहींस्या सन्मान्य ठिकाणीं अमानत राखून ठेवीत असत. मोआल्लकत ह्मणजे सुवर्ण वचनें या नांवाचीं सात नामांकित कवनें जीं मिसरांतील रेशमी कागदावर सोनेरी शाईनें लिहिलीं होतीं तीं मक्केंतील देवळांत सरकारी हुकुमावरून लटकावून ठेविलीं होतीं. अरब लोकांत असी एक ह्मण होती कीं, मुगुटांबद्दल पागोटीं, घरांबद्दल तंबु, हतेरांबद्दल तरवारी आणि कायद्याबद्दल कवनें, ह्या चार विशेष देणग्या ईश्वरापासून आमच्या राष्ट्रास प्राप्त झाल्या आहेत.

एशियांतील बहुतेक राष्ट्रें जड व मंदबुद्धीचीं आहेत, पण अरब लोक तसे नाहींत. त्यांची नापीक जमीन व उपजीविका मिळण्याची संकटें व वाळवंटांतील जिणें या गोष्टींवरून ते धैर्यवान व धमकदार होत आले आहेत. त्यांला साहस कर्माची मोठी हौस आहे. जरी ते योग्य अभ्यास करण्याकडून कधीं सुशिक्षीत झाले नाहींत आणि मोठ्या मान्यतेस पोहंचले नाहींत तरी त्यांची बुद्धि चांगली आहे.

अरबी भाषा तर जगामध्यें सर्वांहून पुरातन आहे; बहुत गोष्टींविषयीं ही भाषा विशेष संगतवार व सुबोध आहे ह्मणून दुसऱ्या सर्व भाषांवर इचा चढ आहे; अणखी ती इतकी विपुल आहे कीं इजविषयीं कोणी माणूस कधींही पूर्ण ज्ञाता व्हावयाचा नाहीं, असें ह्मणतात. या भाषेमध्यें मधेला ८० नांवें, सापाला २००, सिंहाला ५०० आणि तरवारीला १००० नांवें आहेत ह्मणून ह्मटलें आहे. तथापि त्यामध्यें लिहिण्याची युक्ति केवळ अलीकडे निघाली. ख्रिस्ती सन सहाव्या शतकांत एका इराककरानें अरबी

अक्षरें योजून काढले. आणि महमद जन्मल्यानंतर मक्के- मध्यें लोक तीं अक्षरें शिकूं लागले.

महमदापूर्वी (किंवा ज्याला लोक अज्ञान काळ ह्मण- तात त्या वेळीं ) अरब लोकांचा धर्म मुख्यत्वेंकरून मूर्तिपूजेचा होता. तो धर्म साबी लोकांच्या सांप्रदायाप्रमा- णें चालत आला होता. त्या पंथांत अचल तारे, ग्रह, दूत आणि दूतांच्या मूर्त्ति यांची भक्ति होती. लोक यांस क्षुद्र- दैवतें असें मानून त्यांच्या द्वारें प्रार्थना करीत असत. यां- शिवाय सृष्टीचा उत्पन्न करणारा व रक्षण करणारा व धनी असा एक मुख्य देव आहे असें ते मानीत असत. आणि या देवाला देखील ते अर्पणें करित असत. पण त्यांनीं खऱ्या देवापेक्षां मूर्तीला विशेष होम व अर्पणें केलीं व महमदानें त्यांचा याविषयींचा निषेध केला आहे. तसेंच जेव्हां ते फळझाडें लावीत किंवा धान्य पेरीत तेव्हां मध्यें बांध घा- लून एक मूर्तीसाठीं व एक ईश्वरासाठीं असे दोन भाग क- रीत. मग जर मूर्तीच्या भागांतील फळ ईश्वराच्या भागांत पडलें, तर ते फळ परत मूर्तीला देत, पण ईश्वराच्या भागांतील फळ मूर्त्तीच्या भागांत पडलें, तर ईश्वराला परत देत नसत. याप्रमाणेंच जेव्हां ईश्वराला योजिलेलें अर्पण मूर्तीला योजि- लेल्या अर्पणापेक्षां चांगले दिसे, तेव्हां त्या अर्पणाची अद- लाबदल करावी, अशी त्यांची चाल असे पण मूर्तीकडचें अर्पण ईश्वराकडच्या अर्पणापेक्षां उत्तम असल्यास असें करीत नसत.

तें सर्व राष्ट्र बहुधा आकाशांतील ज्योतींचे उपासक होतें. तरी प्रत्येक कुळामध्यें निरनिराळी ज्योति कुळदैवत असे. येणेप्रमाणें कोणी कुळ सुर्याची, कोणी बृह-

स्पर्तीची, कोणी कुतुब ताऱ्याची, कोणी बुधाची अशी विशेष भक्ति करीत असत. ज्या दूतींची ते उपासना करीत असत त्यांतलि तिघींचीं नामें कुरानामध्यें अढळतात. तीं अल्लात, अलउझा, आणि माना अशीं आहेत. त्यांस तें देवकन्या या नांवानें हांक मारीत, ह्मणून त्या देवी आहेत असें मानीत असत. त्यांनीं हीं नामें केवळ त्या दूतींसच दिल्हीं असें नव्हें, पण त्यांच्या मूर्ति ह्या त्यांचे देव्हारे आहेत असें मानून त्यांसही हीं नामें देऊन त्यांचीही भक्ति दूतींप्रमाणेंच करीत असत.

तयेफ नामें ठिकाणीं आल्लात देवीचें देऊळ होतें; सन हिजरी ९ या सालीं महमदानें त्या देवळाचा नाश करण्याचा हुकूम देऊन त्या ठिकाणीं फौज पाठविली. यावरून तयेफांतील सर्व राहणारे आणि विशेषेंकरून स्त्रिया ह्या दुःखार्णवांत निमग्न होऊन त्यांनीं सामोपचारानें त्या लोकांची अशी विनंती केली कीं, हें देऊळ तीन वर्षेंपर्यंत मोडूं नये. पण ह्या गोष्टीस ते मान्य होत नाहींत असें पाहून एक महिनाभर तरी मोडूं नये असें पदर पसरून मागितलें. परंतु त्यांनीं एक दिवस देखील अवकाश त्यांस दिल्हा नाहीं. मिसरी कंटक किंवा मिसरी बाभूळ या झाडाला अलउझा असें नाम ठेऊन ते त्याची भक्ति करीत असत. त्या मूर्तीचा नाश करण्याकरितां महमदानें खालेद इब्न वालद यास पाठविलें. त्यानें तें देऊळ जमीनदोस्त केलें व तें झाड तोडून जाळून टाकिलें. त्या देवीच्या आरा-

धिणीनें आपल्या झिंज्या फिंदारून व आपले हात कपाळास लावून शरणांगताप्रमाणें बाहेर पळून गेली. तथापि त्यानें तिलाही मारून टाकिलें. ते°लोक मोठा धोंडा मांडून माना ईंची भक्ति करीत असत. महमदाच्या एका नायकानें येऊन तिचाही याप्रमाणेंच नाश केला. माना ह्मणजे वाहणें. त्या देवीला जे बळी अर्पिले जात त्यांचें रक्त वाहण्यावरून तिला हें नाम दिल्हें होतें. आणखीही पांच मूर्तींचीं नांवें कुराणांत अढळतात. तीं वाद, सावा, यागूथ, याअक आणि नास्र अशीं आहेत. ते लोक यांचीही भक्ति करीत असत. यांतून पहिली मूर्ति पुरुषाची, दुसरी स्त्रीची, तिसरी सिंहाची, चवथी अश्वाची आणि पांचवी गरुडाची, अशा होत्या. महमदापूर्वीं अरब लोक ज्या मूर्तींचें भजन करीत त्या तर असंख्यातच होत्या. मक्केंत काआबा ह्मणून एक नामांकित देऊळ होतें, त्या देवळांत व त्याच्या सभोंवतीं वर्षांच्या दिनसंख्येप्रमाणें मनुष्य, गरुड, सिंह, हरिण इत्यादि आकृतीच्या ३६० मूर्ति होत्या. त्यांमध्यें होबालाची मूर्ति मुख्य होती. ती आरक्त गोमेद पाषाणाची मनुष्याकृतीची होती. तिच्या एका हातांत सात बाण होते आणि तो हात सोन्याचा होता. ही मूर्ति आम्रु इब्न लोहाई यानें सुर्या देशांतून आणिली होती. त्यानें असें सांगितलें कीं जेव्हां गरज आहे तेव्हां हा देव पाऊस पुरवितो. सन हिजरी ८ या सालीं महमदानें मक्का शहर घेतलें तेव्हां काआबा देवळामध्यें आब्राहाम, इस्माएल यांच्या व त्या सभोंवतीं बहुत दूत

व भविष्यवादी इत्यादिकांच्या ज्या मूर्त्ति त्यांस सांपडल्या तितक्यांचा त्यानें नाश केला. या मूर्त्ति खेरीज करून प्रत्येक कुटुंबांत एक किंवा अनेक कुळ दैवतें असत. बाहेर जातांना किंवा घरीं आल्यानंतर त्या दैवतांस नमस्कार करावा अशी त्यांची चाल होती.

काआबा हें सदहू नाम मक्केंतील एका फार प्राचीन देवळांत दिल्हें होतें. याच्या मूळ इतिहासाचा कांहीं थांग लागत नाहीं. महमदाच्या पूर्वीं अरव लोक शेंकडों वर्षें मूर्तिपूजक होते, तेव्हां लोक दूरदूरच्या प्रांतांपासून येऊन एथील यात्रा करीत असत. तेथील पुजारी हे अत्यंत बहुमान्य कुळ आहे असें मानति असत. हे लांब चवडें देऊळ निरनिराळ्या आकाराचे मोठाले दगड वांकडे तिकडे जोडून बांधलें आहे. त्याची लांबी २४ हात, रुंदी २३ आणि उंची २७ आहे. ह्या देवळाला एकच दार आहे; तें त्याच्या उत्तर अंगीं जमिनीपासून सात फूट उंचीवर आहे. तें रुप्यानें मढवून सोन्यानें शृंगारलेलें आहे. तें दार एका कोनांत आहे यावरून ती इमारत मुळीं पूजा करण्यासाठीं बांधली नव्हती, असें दिसून येतें. पण ही त्या कार्यार्थ केव्हां आणि कशी लाविली गेली या गोष्टीचा निश्चय करितां येत नाहीं. काआबाच्या दाराजवळ चार फूट जमिनीपासून उंच असा एक नामांकित पाषाण आहे. सर्व यात्रेकरू तें नगर पाहवयास जातांना त्या पाषाणाचें भक्तिभावानें चुंबन घेत असतात. त्या पाषाणाचा गर्भ सुमारें

७ इंच असून तो अंडाकृति आहे. निरनिराळ्या आकाराचे लहान मोठे असे दगडाचे तुकडे अशा चतुराईनें एकत्र जोडून गुळगुळीत केले कीं 'जणूं काय हा मूळचा एकच पाषाण होता आणि कांहीं तरी मोठ्या आघातानें फुटून तुकडे झाले असतां परतून तेच तुकडे एकत्र जडले आहेत असें दिसतें. आणि लोकांमध्येंही अशीच गोष्ट आजपर्यंत वाजत आली आहे. मुसलमान लोकांच्या कल्पित कथांमध्यें असें ह्मटलें आहे कीं, जगाच्या उत्पत्तीच्या वेळेस हा पाषाण ग्राबीएल दूतानें आकाशांतून आणिला तेव्हां हा पांढ़रा शुभ्र होता पण माणसाच्या पापामुळें काळा ठिक्कर झाला.

मनुष्यबलि अर्पणाची अत्यंत क्रूर चाल प्राचीन काळीं अरब लोकांत होती. दैवतांस प्रसन्न करण्याकरितां एका वर्णामध्यें एक मुलाचें बलिअर्पण करीत असत. जर आह्मास पुष्कळ पुत्र होतील तर त्यांतून एकाचें बलिअर्पण करूं असे आईबाप देवाला वारंवार नवस करीत असत. कांहीं अनर्थाचा परिहार व्हावा ह्मणून महमदाच्या बापाचें बलिअर्पण अविचारी नवसानें नेमिलें होतें, पण मग त्याच्या जिवाबद्दल शंभर उंट देऊन त्याला खंडून घेतलें अशीं गोष्ट आहे.

लोकांस महमद उपदेश करूं लागला तेव्हां आपल्या कन्येस जितें गाडण्याची अरब लोकांत दुसरी एक निर्दय चाल होती. ही क्रूर चाल पाळण्याविषयीं रजपूत संस्थान आदिकरून हिंदुस्थानाच्या भागांतील लोकांची आणि अ-

रब लोकांची एकसारिखीच समजूत होती. कन्येच्या पाळण-पोषणासाठीं व नांवां लौकिकाप्रमाणें त्यांचें लग्नकार्य समारंभानें करण्यासाठीं जो खर्च आणि संकटें लागतात तीं टाळावीं असें त्यांच्या मनांतून होतें. ह्या बालहत्येच्या विधिविषयीं असें ह्मटलें आहे कीं कोण्या अरबाला आपल्या कन्येस मारणें असल्यास त्यानें तिला सहा वर्षांची होईपर्यंत राखावी. मग आपल्या बायकोस असें ह्मणावें कीं, " मुलीला इच्या मावलायांकडे म्या न्यावें ह्मणून इला सुगंधित व सुशोभित कर." त्याप्रमाणें तिच्या आईनें केल्यावर जी खांच या कार्यासाठीं सिद्ध केली असती, तिकडे तिला बापानें घेऊन जावें आणि मुलीला त्या खांचेंत डोकावयास लावून आपण तिला मागून आंत लोटून द्यावें. मग ती खांच जमिनीबरोबर बुजवून काढावी ह्मणजे झालें. मक्केच्या जवळ एक डोंगर होता, तेथें खोरश कुळांतील लोक आपल्या कन्यांस जितेंच पुरीत.

अरबिया पेत्रिया नामें जो अरबस्थानाचा एक भाग सूफ आणि मृत या दोन समुद्रांच्या मध्यें आहे, त्यांत एक खोरा आहे त्याच्या दोहों बाजूंस उंच कडे तुटलेले असे दोन डोंगर आहेत. तेथें ग्रीक कारागिरांच्या हातचीं बहुत ग्रीक दैवतांचीं सुंदर देवालयें अढळनात, पण आतां त्यांची पडझड होऊन तीं उजाड पडलीं आहेत. हीं पेत्रा नगराचीं अवशेष उरलीं आहेत. त्या नगराला पेत्रा ह्मणजे खडकी ह्मणत असत. कारण कीं त्यांतील मुख्य इमार-

ती भरीव खडक कोरून केल्या होत्या. यावरून कित्येक अरब लोकांनीं ग्रीक लोकांचीं दैवतें आणि त्यांच्या चाली अंगीकारिल्या होत्या असें दिसतें.

ईयोब नामें एक अरबी मनुष्य ख्रीस्तापूर्वीं १५०० वर्षांमागें झाला, त्याचा इतिहास ख्रिस्ती शास्त्राच्या एका पुस्तकांत लिहिला आहे. ईयोब जरी खऱ्या ईश्वराचा भक्त होता तरी त्या वेळेस देखील अरब लोक मूर्तिपूजा करीत होते असें त्या पुस्तकावरून प्रमाण आहे. त्याकाळीं लोकांची स्थिति कोणत्या प्रकारची होती हें दाखविण्यासाठीं त्या पुस्तकाच्या पहिल्या अध्यायांतील कांहीं कांहीं वचनें काढून पुरवणीस घालितों.

" ऊज देशांत एक मनुष्य होता त्याचें नाम ईयोब होतें आणि तो मनुष्य साधुशीळ व यथार्थ, देवभ्रत व पापवर्जक होता. २ आणि त्याला सात पुत्र आणि तिघी कन्या हीं जन्मलीं. ३ आणि त्याचें धन सात हजार मेंढरें आणि तीन हजार उंट आणि बैलांच्या जोड्या पांचशें आणि पांचशें गाढवी आणि घरचीं दारचीं माणसें पुष्कळ असें होतें ह्मणून तो मनुष्य पूर्वेच्या सर्व जनांतला परमाढ्य होता. ४ आणि त्याचे पुत्र एकमेकांच्या घरास एक एक आपआपल्या दिवशीं जाऊन भोजन करीत असत आणि निरोप पाठवून आपल्या तिघी बहिणींस आपल्या संगतीं खायाप्यायाला बोलावीत असत.

१३ "आणि एका दिवशीं असें झालें कीं, त्याचे पुत्र

व त्याच्या कन्या हीं आपल्या ज्येष्ठ भावाच्या घरीं खात-
आणि द्राक्षारस पीत होतीं. १४ आणि ईयोबाकडेस एक
वार्त्तावह येऊन ह्मणाला, बैल नांगरीत होते आणि गाढवें
त्यांजवळ चरत होतीं, १५ आणि शबा लोकांनीं दरवडा
घालून त्यांला हरून नेलें आणि गड़ी तरवारीनें हाणिले आ-
हेत आणि तुला वर्तमान सांगायाला मी मात्र एकलाच
सुटून आलों आहें. १६ तो बोलत असतांच दुसरा येऊन
ह्मणतो, देवाग्नीनें आकाशांतून पडून मेंढरांला आणि ग-
ड्यांला जाळून नष्ट केलें आहे आणि तुला वर्त्तमान सां-
गायाला मी मात्र एकलाच वांचलों आहें. १७ तो बोलत
असतांच तिसरा येऊन ह्मणतो, खास्द्यांनीं तीन टोळ्या
केल्या आणि उंटांवर दरवडा घालून तीं हरून नेलीं आ-
हेत आणि गड्यांला तरवारीनें हाणिलें आहे, आणि
तुला वर्त्तमान सांगायाला मी मात्र एकलाच सुटून
आलें आहें. १८ तो बोलत आहे तोंच अन्य येऊन
ह्मणतो, तुझे पुत्र आणि तुझ्या कन्या हीं आपल्या ज्येष्ठ
भावाच्या घरीं खात आणि द्राक्षारस पीत होतीं. १९
आणि पहा, जंगलावरून मोठा वारा आला आणि घरा-
च्या चोहों कोपऱ्यांला लागला तेव्हां तें त्या तरण्यांवर
पडलें ह्मणून तीं मरून गेलीं आहेत आणि तुला वर्त्तमान
सांगायाला मीं मात्र एकलाच वांचलों आहें. २० तेव्हां
ईयोबानें आपला झगा फाडिला आणि आपली डोई कात-
रिली आणि भूमीवर पडून भजन केलें; २१ आणि ह्मटलें,

मी आपल्या आईच्या उदरांतून नग्न आलों आणि तिकडेही परत नग्न जाईन. ईश्वरानें दिल्हें आणि ईश्वरानें परत घेतलें आहे; ईश्वराचें नाम सुवंदित असो. २२ या सर्वांत ईयोबानें पाप केलें नाहीं आणि तो देवाला अपवाद बोलला नाहीं."

आब्राहाम आणि इश्माएल यांविषयीं अगोदर कांहीं सांगितलें होतें. तर या लोकांची गोष्ट वास्तविक आहे कीं काय याविषयीं प्रमाण पाहिजे असल्यास उत्पत्तीचें पुस्तक पहा. आब्राहामाचें जन्मस्थान मेसोपोटाम्या देश होता. त्याला प्रभु देवानें दर्शन देऊन सांगितलें कीं, तूं आपल्या बापाचें घर आणि स्वदेशस्थ लोक (ते फारकरून मूर्त्तिपूजक होते) यांस सोडून खनान देशाकडे जा. तो त्याप्रमाणें ईश्वरावर भरवंसा ठेऊन त्यास मान्य होऊन पुढें चालता झाला. देवानें त्याला सांगितलें कीं, तुझी संतति अगणित होऊन त्या देशाचें धारण करील व तिजवर माझा विशेष आशीर्वाद होईल आणि तिजकडून दुसरीं सर्व मनुष्यें देखील आशीर्वादित होतील. आब्राहामाला पहिला पुत्र दासीपासून झाला. त्याचें नांव इश्माएल ठेविलें, त्याची सुंता तेराव्या वर्षी झाली. आब्राहामाला दुसरा एक पुत्र, त्याची लग्नाची बायको सारा इजपासून झाला. त्याचें नांव इझाक, याची संतति यहुदा देशांत जाऊन राहिली. आणि ईश्वरानें आब्राहामाला जीं आशीर्वचनें दिल्हीं होतीं तीं यांस प्राप्त झालीं. इश्माएलाला

तर त्याच्या आईनें अरबस्थानांतील रानांत नेलें, मग तो मोठा झाल्यावर त्यानें एका मिसरी बायकोशीं लग्न केलें. आणि तिजपासून त्याला बहुत संतति झाली.

महमदाच्या वेळेस अरबस्थानांतील सर्वच लोक मूर्तिपूजक होते असें समजूं नये. इसवी सन ७० या सालीं रोमी लोकांनीं यरूशलेमाचा नाश केला. नंतर त्यांनीं यहुद्यांतील निभावलेल्या लोकांस हाकलून लाविल्यामुळें यहुदी समुदायानें अरबस्थानांत आश्रय धरीला. यहुदी लोक, मेहनती, हुशार व थोर दृष्टीचे होते. त्यांनीं बहुत सभास्थानें बांधिलीं व कित्येक मूर्तिपूजक अरबांस वळवून यहुदी केलें. त्यांनीं कित्येक नगरें व गढ्या हस्तगत केल्या. कित्येक थोर आवेशी यहुदी तर येमेन नामक लोकांचे राजे झाले होते असें इतिहासांत अढळतें.

महमदापूर्वीं त्या राष्ट्रांत ख्रिस्ती धर्मही कांहींसा पसरला होता. ख्रीस्ताचें मरण व पुनरुत्थान यानंतर लवकरच ख्रिस्ती धर्मोपदेशक अरबस्थानांत गेले असतील. प्रेषित पौलस हा ख्रिस्ती झाल्यावर लागलाच अरबस्थानांत जाऊन कांहीं वर्षें राहिला होता असें लिहिलें आहे. पण आशिया खंडांतील दुसरे देश आणि आफ्रिका व युरोप यांतील जे देश भूमध्यसमुद्रालगत होते आणि त्या समुद्रापासून दूरचीं ह्मणजे हिंदुस्थान, पार्थीया आणि ग्रेटब्रिटन इत्यादि, ह्या देशांत ख्रिस्ती धर्माचा फार विस्तार झाल्याचें वर्णन इतिहासांत तपशीलवार केलें आहे,

असें असतां अरबस्थानांत ख्रिस्ती धर्माच्या विस्ताराविषयीं थोडें लिहिलें आहे. रोमी राज्यांत ख्रिस्ती लोकांचा पाठलाग झाल्यावरून बहुतेक ख्रिस्ती लोक अरबस्थानांत पळून गेले आणि तेथील आडवळणी जंगलांत निर्भयपणें राहिले होते. ख्रिस्ती शकाच्या पहिल्या तीन शकांपर्यंत कित्येक मिशनेरी लोक ह्या देशांत पाठविले जाऊन लोकांच्या सुधारणुकीविषयीं त्यांनीं निःसंशय प्रयत्न केले असतील. आरिजेन हा अरबस्थानांत गेला होता आणि त्यानें बहुत ख्रिस्ती मंडळ्यांशीं पत्रद्वारें व्यवहार राखिला होता. तेथील आठ कुळें व दोन प्रांत यांतील सर्व लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला असें ह्मटलें आहे. पण तेथील वस्ती विरळ आणि कळप घेऊन हिंडावें अशी लोकांची चाल आहे, यावरून ख्रिस्ती धर्म फैलावला जाण्यास आणि विशेषेंकरून तो टिकून राहण्यास मोठ्या अडचणी आहेत. वास्तविक पाहिलें असतां जसें मिसर, नुमिदिया, एशियामैनर आणि इताली हे देश ख्रिस्ती धर्मांत सरसावले गेले, तसें अर्बस्थान कधींही सुधरलें गेलें नाहीं. महमदाच्या वेळेपर्यंत ह्मणजे इसवी सन ६०० पर्यंत ते लोक मूर्त्तिपूजा करीत होते असें स्पष्ट दिसून येतें. पण ख्रिस्ती शकाच्या चौथ्या शतकापासून साहाव्या शतकापर्यंत दुसऱ्या ठिकाणाप्रमाणें ह्याही देशांत ख्रिस्ती लोक आपला आवेश, प्रेम आणि मत यांपासून भ्रष्ट झाले होते, हें आह्माला पक्कें माहीत आहे. त्यांनीं पवित्र

आत्म्याला खेद दिल्हा. त्यांची फुटाफूट होऊन त्यांमध्यें वेगवेगळे पंथ झाले. त्यांनीं मूर्त्तिपूजकांच्या बहुत कांक्षा आणि चाली धरिल्या होत्या. आपण जगाचा उजेड होण्याबद्दल त्यांनीं जगीक अंधार वाढविला. जोंपर्यंत ते ईश्वरी आज्ञेस मान्य असून आपल्या स्वामीच्या पावलांस अनुसरले होते, तोंपर्यंत कोणत्याही गोष्टीकडून त्यांस अडथळा झाला नाहीं. आणि त्यांनीं ज्या ईश्वरी वाक्याचा उपदेश केला तें वाक्य सर्वांहून पराक्रमी राज्यापेक्षांही विशेष पराक्रमी आहे असें त्यांच्या प्रतीतीस आलें. पण जेव्हां त्यांनीं शास्त्र टाकून मूर्ख व अभिमानी लोकांची मतें अंगीकारलीं तेव्हां ईश्वरानें त्यांपासून आपली कृपा काढून त्यांस भ्रष्टपणाचें फळ भोगावयास लाविलें. आणि त्या दिवसांतील पतित खिस्ती लोकांवर आपला राग दाखवावा आणि ईश्वरी शास्त्र अव्हेरण्याच्या भयंकर परिणामाविषयीं पुढील खिस्ती मंडळीस बोध व्हावा ह्मणून ईश्वरानें महमद व महमदाचे अनुसारी यांस यश पावूं दिल्हें.

## अध्याय २.

### महमदाचा वृत्तांत.

अरब लोकांच्या कुळांमध्यें कोरेश नामें एक विख्यात कुळ झालें, त्यांत महमद जन्म पावला. त्या कुळाच्या मूळपुरुषापासून अरब लोकांच्या वंशावळींमध्यें महमदाच्या वाडवडिलांचीं नांवें वंशपरंपरेनें जतन करून राखलीं आहेत.

तो हाशेमाचा गोत्रज होता. हाशेमाचा पुत्र अबदुल्ल मुतालेब तो एकशें दहा वर्षेंपर्यंत वांचला. त्याचा एक धाकटा पुत्र अबदुल्ला यानें वाहिबांची सुंदर कन्या जी आमिना तिशीं लग्न केलें. या उभयतांपासून सन इसवी ५७० या वर्षीं मक्का शहरांत महमदाचा जन्म झाला. तो जन्मल्यापूर्वीं किंवा जन्मतांच त्याचा बाप मरण पावला. आणि त्याची आई त्याच्या आठव्या वर्षीं वारली. तेव्हां पांच उंट व एक शिद्दीण दासी एवढीच काय ती त्यापाशीं मालमत्ता होती ह्मणून लहानपणापासून त्याचा प्रतिपाळ त्याच्या आजानें केला. आजानें आपल्या मरणसमयीं आबुतालेब नामक आपला पुत्र जो त्या वेळेस त्या घरांतील मानपान व वित्तविषय यांचा वारीसदार होता त्याच्या ओसंगीं ह्या पोरक्या मुलास घातलें. आबुतालेबानें ह्या आपल्या पुतण्यास फिरस्त्यांच्या व्यापारांत योग्य समयीं तरबेज केलें. महमद स्वतां पंचवीस वर्षांचा होईपर्यंत आपल्या चुलत्याचा धंदा करीत राहिला. महमदाच्या मूळ पीठिकेविषयीं एवढेंच काय तें आमच्या समजण्यांत आलें आहे.

ईश्वराचे पुरातन पैगंबर ह्मणजे मोशे, ख्रीस्त आणि जे महमदापूर्वीं होऊन गेले त्यांच्या जन्माप्रमाणेंच चमत्कारिक रीतीनें आमच्या पैगंबराचा जन्म झाला, हें पटविण्यासाठीं मोसलेम लेखकांनीं अशी गोष्ट उठविली आहे कीं त्या काळीं मोठीं आश्चर्यकारक अद्भुतें घडलीं असें सांगितलें

आहे. ते ह्मणतात कीं, मुरियाच्या टेंकड्या, नगरें व खेडीं यांवर महमदाच्या जन्मकाळीं मोठा ज्ञोत प्रकाशला होता. सवा सरोवराचें पाणी अटून तें इतकें कोरडें ठणठणीत झालें कीं, त्याच्या तळीं एक शहर वसलें गेलें. भूकंपानें तर इराणी राजमहालाचे १४ बुरूज ढांसळून पडले. पारसी लोकांचा पवित्र अग्नि विझविला गेला. आणि सर्व भूतें व पिशाचें हीं चंद्रलोक व नक्षत्रलोक यांपासून धुडाविलीं गेलीं व त्यानंतर त्यांच्यानें मूर्त्तींत संचार करवेना; व शकुन व प्रश्न सांगवेना. ते अणखी असें सांगतात कीं, तें लेंकरूं जगामध्यें येतांच त्यानें गुडघे टेंकून हात आकाशाकडे उभारिले आणि स्पष्ट वाणीकडून मोठ्यानें असे शब्द उच्चारिले कीं, "ईश्वर थोर आहे, केवळ एकच ईश्वर आहे आणि मी त्याचा पैगंबर आहें." याप्रमाणें अचंबा होण्याजोगीं अशीं बहुत दैवी अद्भुतें त्याच्या जन्मकाळीं झालीं असें ह्मटलें आहे. पण ह्या नवलयुक्त वर्णनाला आधार पाहूं गेलें असतां किंचितही प्रमाण मिळत नाहीं. ह्या गोष्टी महमदाच्या जन्मानंतर बहुत काळानें लिहिल्या हें स्पष्ट दिसतें. जर अश्या अचंब्याच्या जगप्रसिद्ध गोष्टी वास्तविक घडत्या, तर त्यांची लोकांमध्यें आठवण राहिली असती, आणि तेणेंकडून महमदाचा निरोप अंगीकारण्यास सर्व लोक तयार झाले असते. अणखी तुला ईश्वरानें पाठविलें याचें प्रमाण काय? असें जेव्हां लोकांनीं महमदाला वारंवार विचारिलें, तेव्हां

त्यानें आपल्या जन्मकाळचीं अद्भुतें पुराव्यास द्यावयाचीं होतीं पण त्यानें तसें कधींही केलें नाहीं.

त्याच कुळांतील कादिजा नामें एक विधवा स्त्री होती. तिचा नवरा मक्का शहरामध्यें बडे लोकांतील एक गृहस्थ होता. महमदानें तिची चाकरी आपल्या पंचविसाव्या वर्षी धरिली. तो तिचे उंट आणि सौदा सूत घेऊन दमास्कसाच्या बाजारांत एरजारा करीत असे. त्यानें तिला वश करून अशी वाहवा मिळविली कीं, तीन वर्षांच्या आंतच ती त्याची बायको झाली. लग्न झाल्यावरून जन्माप्रमाणें जो लौकिक व जें वजन त्याला योग्य तें प्राप्त झालें, आणि आपले वाडवडील आपल्या कुळामध्यें बडे लोक होते याची आठवण त्याला पडली असेल. त्याचें लग्न झाल्यावर त्यानें व्यापारसंबंधी खेपा करणें सोडलें असें नाहीं. त्यानें सर्व धर्म व अनेक राष्ट्रें यांतील लोकांशीं वहिवाट ठेविली. यावरून त्याला सर्व मतांविषयीं व आसपासच्या राज्यांतील स्थितीविषयीं माहिती झाली, आणि तसें लोकांच्या धर्मसंबंधी व राज्यसंबंधी जे नेम त्यांचीही माहिती करून घेऊन पुढें एकांत ध्यान करण्यांत त्यांचा उपयोग त्यानें केला.

महमदाच्या २५ वर्षांपासून तर ४० वर्षांपर्यंत त्याच्या इतिहासांत कांहीं नवल विशेष गोष्ट घडली असें अढळत नाहीं. तथापि त्यानें या अवधींत एकांत विचार करून नवा धर्म जगांत चालविण्याची धादांत मसलत सजविली.

या गोष्टींवरून महमदाच्या सर्व आयुष्यांत हीं वर्षें विशेष समय अशीं झालीं. परंतु कोणत्या कारणावरून त्याला ही गोष्ट सुचली व कोणत्या विचारानें तिला पुष्टिबळ झालें व या गोष्टिवरून कोणता परिणाम सिद्धीस नेण्याचा होता आणि ही गोष्ट प्रसिद्धीस आणण्यासाठीं कोणकोणते वास्तविक कारभारी घेतले पाहिजेत या सर्व गोष्टींचा त्यानें बिलकूल मागमूस फुटूं दिल्हा नाहीं.

अशीं हीं विचार करण्याचीं वर्षें गुजरल्यावर शेवटीं महमुदानें आपले सिद्ध केलेले बेत ख्रिस्ती शकाच्या ६०९ या वर्षीं फारच तजविजीनें प्रसिद्धीस आणिले. मक्केजवळच्या हेरा नामें एका गुहेंत महमद दररोज जाऊन बसत असे. त्याचें कारण तो असें सांगे कीं मी तेथें उपवास व प्रार्थना आणि ध्यान करीत असतों. त्यानें चांगला प्रसंग पाहून तो एका दिवशीं संध्याकाळीं आपण घरीं परत येऊन गंभीरपणानें आपल्या बायकोजवळ वर्त्तमान प्रगट करूं लागला कीं, मला ईश्वरी साक्षात्कार व आकाशवाणी झाल्यावरून माझें ध्यान करण्याचें सार्थक झालें आहे. शेवटीं त्यानें एक वाक्य ह्मणून दाखवून सांगितलें कीं, ईश्वरानें गाब्रिएल दूताकडून मला नुकतेंच जें प्रगट केलें त्याचा हा एक भाग आहे. एक स्मरणीय रात्र जिला कधीं कधीं एलंकद्र ह्मणजे ईश्वरी हुकमाची रात्र असें ह्मटलें आहे (ती रमजान महिन्याच्या २३ व २४ या तारखेच्या मध्यें होती ), त्या रात्रीं गौरवी दूत मला प्रगट होऊन

प्रेषितपणाचें वर्त्तमान निवेदन करिता झाला कीं, "हे महमदा, तूं ईश्वराचा प्रेषित आहेस आणि मी गाब्रिएल दूत आहें" असें महमदानें ह्मटलें. तो दूत रेशमी कापड पाठपोठ लिहिलेलें सामोरें करून बोलला, "वाच." पैगंबर ह्मणाला कीं मी वाचूं शकत नाहीं. तेव्हां तो दूत ह्मणाला कीं, "वाच, तुझा प्रभु ज्यानें सर्व पदार्थ उत्पन्न केले, ज्यानें गोठलेल्या रक्ताचा माणूस बनविला आहे त्याच्या नामानें वाच. तुझा अत्यंत कृपाळू प्रभु ज्यानें लेखणीचा उपयोग शिकविला, मनुष्याला जें माहीत नाहीं तें जो त्यास शिकवितो, त्याच्या सहायानें वाच" (अ०९६ सुरा अलक. आयत.१–६). हें दूताच्या भेटीचें आश्चर्यकारक वर्त्तमान ऐकून कादिजा त्यावर विश्वास ठेवून बोलली कीं, "केणे एका दिवशीं महमद आपल्या राष्ट्रांचा पैगंबर होईलच होईल." तिनें आपण ऐकिलेलें वर्त्तमान आपला नातलग वारका यास सांगितल्यावरून त्यानेंही विश्वास धरिला. पण तो महमदाच्या शिष्यांत गणला नाहीं.

ह्यानंतर महमद तसाच एकांत स्थितींत कडकडीत व्रत करीत राहिला. यावरून तो महान साधु आहे अशी कीर्त्ति लोकांमध्यें झाली. पुढें लवकरच त्याचा चाकर जेईद इब्न हारेथ त्याचा शिष्य झाला. जेईदानें विश्वास धरिल्यावरून महमदानें त्याला आपल्या दासपणांतून मुक्त केलें. यावरून मुसलमान लोकांमध्यें असा नेम पडून गेला कीं, दासांनीं महमदाचा धर्म अंगीकारिला ह्मणजे त्यांस मुक्त करावें,

तथापि हा नेम सर्वदा ते पाळितात असें नाहीं.

त्याप्रमाणें त्याची वायको आणि त्याचा दास हे दोघें जण त्याचे पहिले शिष्य होते.

तिसरा तर, महमदाचा चुलता अबूतालेब ज्यानें त्याचें पाळण केलें त्याचा पुत्र आलि हा होता. त्या वेळेस आलि हा केवळ मुलगा होता. चवथा अबुबेकर होता. हा मनुष्य मक्केमध्यें मोठा अब्रुवान व वजनदार होता. आबुबेकराच्या मथविण्यावरून ओथमान, आब्दुल रहमान, सयद, आल-जोबेईर,आणि दुसरेही मक्केतील मुख्य मुख्य गृहस्थ महमदाला मिळण्यास मान्य झाले. हे त्याचे शिष्य तर त्याच्या अधिकाराचे मुख्य आधार व त्याच्या सैन्यांतील परम शूर मनुष्य झाले. ह्या प्रसंगीं आबुबकरानें महमदाचें सहाय केल्यावरून महमदानें आब्दुल्ला ( ईश्वरी सेवक ) आजेदिक ( पुण्यवान ) आणि आनिक ( नरकाग्नीपासून मुक्त) अश्या त्याला किताबा दिल्या.

तीन वर्षेपर्यंत महमद आपलीं मतें केवळ एकांतीं शिकवीत असे, कारण कीं कोरेश लोक विरोध करितील असें त्याला भय होतें. ह्या वेळेपर्यंत आकाशापासून बहुत हुकूम आपल्याला मिळाले असें त्यानें ह्मटलें. आपल्याला आबुबकराचें सहाय आहे व आपले अनुसारीही पुष्कळ आहेत हें पाहून महमदाला हिंमत आली कीं, आपल्या नातलगांसही आपल्या प्रेषितपणाविषयीं प्रगट करण्याचा हुकूम देवानें मला दिल्हा हें जाहीर करण्याचा शेवटीं

त्यानें निश्चय केला. या हेतूनें आपला चुलत बंधु आलि याला मेजवानी तयार करावयास सांगितलें आणि त्या मेजवानीस अब्दुल मुत्तालेबाचे सर्व वंशजांस बोलाविलें. त्यांतून सुमारें ४० जणांनीं हें आमंत्रण घेतलें. त्यांस फिरून बोलावणें पाठविलें असतां ते सर्व जण आले. तेव्हां महमदानें त्यांशीं याप्रमाणें भाषण केलें. "जें भाषण आतां मी तुह्मांशीं करितों, त्यापेक्षां आपल्या नातलगांशीं चांगलें बोलेल असा साऱ्या अरबस्थानामध्यें कोणीही मला दिसत नाहीं. मी तुह्मापुढें ऐहिक आणि पारलौकिक अशीं दोन्हीं सुखें सादर करितों. सर्वसमर्थ ईश्वरानें तुह्मांला आपल्याकडे बोलावून घ्यावें ह्मणून मला आज्ञा दिल्ही आहे. याकरितां तुह्मांतून कोण माझा वजीर व भाऊ होईल?"

तेव्हां सर्व मागें हटले हें पाहून आलि उठून ह्मणाला कीं, "हे देवाच्या पैगंबरा, मी तुझा वजीर होईन; जे सर्व तुझा विरोध करितील त्यांचे दांत पाडीन, डोळे उपटून टाकीन, पोट विदारीन आणि पाय तोडून टाकीन." तेव्हां महमद मोठ्या कळवळ्यानें आलिला आलिंगन देऊन त्या वेळेस जे तेथें होते त्यांस ह्मणाला, "हा माझा भाऊ, माझा प्रतिनिधि, माझा खालीफ आहे; तुह्मी त्याला मान्य व्हा." ह्या त्याच्या भाषणावरून ते सर्व हसून आबुतालेब याला ह्मणाले कीं, "आतां तूं आपल्या पुत्राला मानिलें पाहिजे."

तेव्हांपासून महमद उघडपणें आपल्या लोकांस उपदेश करूं लागला. बहुत प्रवास व एकांतीं विचार करण्यावरून अधींच त्याची तीक्ष्ण बुद्धि व जिवट कल्पना व स्मरणशक्ति चांगली झाली होती; अणखी त्यांत त्याचें रूप इतकें सुंदर व त्याचें भाषण इतकें मधुर होतें कीं त्याला फारकरून लोक वश्य झाले. परंतु ते मूर्त्तिपूजा करितात व ती तशीच करीत चालतात यावरून महमदानें त्यांचा असा खडतर निषेध केला कीं केवळ थोडके लोक खेरीज करून वरकड सर्व जण त्याचे प्रसिद्ध शत्रु झाले.

कोणी ह्मणूं लागले कीं, हा जादुगीर व मंत्रवादी आहे, कोणी तर हा लबाड, ढोंगी आहे असा त्यावर दोष लाविला. त्या वेळेस लोकांनीं महमदाची निंदा व तिरस्कार केला असें कुरानांत ठिकाणो ठिकाणीं दाखले आहेत, त्यांतून कांहीं कांहीं सांगतों. "मक्केकर ह्मणतात कीं, ज्या तुजवर उपदेश ( कुरान ) उतरले, त्या तुला खरोखर भूत लागलें आहे. आतां जर तुझें बोलणें खरें असतें तर तूं दूतासहवर्त्तमान आह्मांकडे आला नसतास काय? उत्तर, आह्मी योग्य प्रसंगावांचून दूतास पाठवीत नसतों" (कुरान अ. १५. सुरा हज्र.आयत. ६–८).ते ह्मणतात कीं, "हें जादुगिरीचें कृत्य आहे ह्मणून आह्मी त्यांजवर विश्वास ठेवीत नाहीं. अणखी ते ह्मणतात कीं जर हें कुरान मक्का किंवा मदीना या शहरांतील कोण्या संभावित गृहस्थावर उतरतें तर आह्मीं तें अंगीकारिलें असतें" ( अ० ४३

सुरा झुखराफ. आयत २०, ३० ). "मक्केच्या लोकांला आपला हिशेब देण्याची वेळ येत आहे. ईश्वरापासून त्यांकडे कांहीं संबोध आला ह्मणजे ते तो ऐकतांच त्याची विटंबना करितात. ते ह्मणतात, कुरान तर केवळ स्वप्नकथेचें भारूड आहे; तें त्यानेंच बनावून केलें आहे," (अ० २१ सुरा अंबिया आयत १–५). "आणि अविश्वासी ह्मणतात, कुरान तर शुद्ध बनावटीचें काम आहे तें त्यानें योजिलें आणि दुसऱ्यांनीं याविषयीं त्याची मदत केली आहे. पण ते अयोग्य बोलतात व लबाडी करितात. ते अणखी ह्मणतात कीं ह्या तर प्राचीन काळाच्या दंतकथा आहेत, ह्या त्यानें दुसऱ्याकडून लिहविल्या आहेत आणि त्या त्याला सकाळीं व संध्याकाळीं कळविल्या जातात तर त्यांस असें सांग कीं, जो आकाश व पृथ्वी यांतील गुप्त स्थिति जाणतो त्यानें तें प्रगट केलें आहे. आणि ते ह्मणतात, हा असा कसा प्रेषित आहे! तो तर आह्माप्रमाणें अन्न खातो व रस्त्यांत वागतो. तुह्मी तर शुद्ध वेड्याच्या नादीं लागले आहां असें दुष्टही ह्मणतात. (अ० २५ सुरा फुरकान आयत ५–९). आमचे खरे साक्षात्कार त्यांस वारंवार सांगितले जातात तेव्हां अविश्वासी ह्मणतात कीं ही तर उघड जादुगिरी आहे. महमदानें कुरान बनावून केलें असें ते ह्मणतील काय? उत्तर. जर मीं हें बनाविलें आहें तर, मजसाठीं ईश्वरी कृपा तुह्मी मिळवणार नाहीं जें अभद्र भाषण यांविषयीं तुह्मी करितां तें ईश्वर पुरतें जाणतो. जें मला क-

ळविलें गेलें त्याशिवाय दुसरें कांहीं मी सांगत नाहीं; मी बोधक एवढाच आहें" (अ. ४६. सुरा अहकाफ. आय. ७).

परात्पर भगवानानें तो प्रेषित आहे असें स्वतः शपथ वाहून स्थापित केलें ह्मणून कुरानांत दाखविलें आहे. "जे तुह्मी पाहतां आणि पाहत नाहीं त्याची शपथ वाहून मी सांगतों कीं, हें कवीचें लाघव नव्हे, पण सन्मान्य प्रेषिताचा संबोध आहे. तरी तुमचा विश्वास किती अल्प आहे? हें कांहीं दैवज्ञाचें सांगणें नव्हे, तरी किती थोडाच तुह्मी संबोध घेतां! सर्व प्राणीमात्राच्या प्रभुपासून हें प्रगट झालें आहे. जर आह्माविषयींच्या संबोधामध्यें महमदानें आपल्या पदरचें कांहीं घातलें असतें, तर निश्चयें आह्मी त्याला उजव्या हातानें धरून त्याच्या अंतःकरणाची शीर कापून टाकिली असती" (कुरान अ० ६९. सुरा हाका आयत. ३८—४६). "जो कुरानाचा उपहास करण्यासाठीं निंदेचें भाषण करितो तो शापित असो, तो नरकाग्नींत टाकिला जाईल" (अ० ७४. सुरा मुद्दसिर आयत १७—१९). "अविश्वास्यासाठीं बेड्या, गळफांस आणि जळत अग्नि आह्मीं निश्चयें सिद्ध केला आहे" (अ० ७६. सुरा दहर आय. ४).

लोकांनीं महमदापाशीं आपल्या प्रेषितपणाच्या सत्यतेविषयीं चमत्कार करण्यानें प्रमाण दाखीव असें वारंवार मागितल्यावरून जसा तो कुंठित झाला तसा तो दुसऱ्या

कोणत्याही गोष्टीनें झाला नाहीं. त्याचे श्रोते ह्मणाले कीं "मोशे व येशू आणि वरकड भविष्यवादी यांनीं आपण देवापासून आलों याविषयीं चमत्कार करून प्रमाण दाखविलें, हें तूंही कबूल करितोस; आतां ज्यापेक्षां तूं बढाई करितोस, कीं मी पूर्वीच्या सर्व पैगंबरांपेक्षां मोठा आहें, त्यापेक्षां जर तूं तसा आहेस तर आह्माला तुझाही चमत्कार दाखीव. तूं मेलेल्यास उठीव, मुक्यास बोलता, बहिऱ्यास ऐकता कर; नाहीं तर जवाहीर व मोल्यवान साहित्य यांनीं सुशोभित असें तूं आपल्यासाठीं सुवर्ण मंदिर कर. किंवा जी किताब आकाशापासून उतरली ह्मणून तूं निश्चयपूर्वक सांगतोस ती अथवा तुझ्या ह्मणण्याप्रमाणें जो दूत तुजकडे ती घेऊन येत असतो त्यास आह्माला पाहूं दे ह्मणजे आह्मी विश्वास ठेवूं."जरी हें मागणें उचित व यथार्थ होतें, तरी महमदानें अनेक युक्तिप्रयुक्तींनीं त्याची टाळाटाळ केली असें कुरानावरून दिसून येतें."अविश्वासी ह्मणतात कीं ईश्वरापासून चमत्कार पाहिल्यावांचून आह्मी विश्वास धरणार नाहीं. बरें, तुला केवळ उपदेश करण्याची परवानगी दिल्ही पण चमत्कार करण्याची नाहीं " (कुरान अ० १३ सुरा रद. आयत ८). "त्यांस जबाब दे कीं चमत्कार तर केवळ ईश्वरी सामर्थ्यानें होतात पण मी प्रसिद्ध उपदेशकापेक्षां कांहीं विशेष नाहीं " (अ० २९. सुरा अनकबूत आयत. ४९). दुसऱ्या वेळेस त्यानें लोकांस असें सांगितलें कीं " ज्यांनीं अगोदरच्या भविष्यवाद्यांचे चम-

त्कार पाहिले, त्यांनीं त्यांचा अव्हेर केला होता. सबब ईश्वर आणखी चमत्कार करणार नाहीं "(अ.२३ सुरा बनी इस्राईल आयत ६१). फिरून त्यानें ह्मटलें कीं " विश्वास धरण्याविषयीं ईश्वरानें ज्यांस नेमिलें आहे ते चमत्कारावांचून विश्वास धरितीलच, पण ज्यांस निवडिलें नाहीं त्यांनीं कितीही चमत्कार पाहिले, तरी ते विश्वास ठेवायाचे नाहींत. जरी आह्मी त्याकडे दूत पाठवितों आणि जरी मेलेला उठून त्यास बोलेल, तरी ईश्वरी खुशी नसल्यास ते विश्वास धरणारच नाहींत " (अ० ६. सुरा अनाम आयत. १११). पुढें मदिनामध्यें महमद सैन्याचा मुख्य झाला तेव्हां या गोष्टीवरून ज्या अडचणी उद्भवतात त्या दूर करण्याचा त्याला सोपा उपाय झाला. कारण कीं त्या वेळेस त्याचें मत असें होतें कीं ईश्वरानें पूर्वीं मोशे व येशू यांस चमत्कार करण्याची शक्ति देऊन पाठविलें होतें, तरी लोकांनीं विश्वास ठेविला नाहीं, याकरितां त्यानें मला निराळ्या प्रकारचा हुकूम देऊन पैगंबर केलें आणि तरवारीच्या जोरानें जुलूम करून लोकांस वळविण्याविषयीं परवानगी दिल्ही आहे.

अनेक चमत्कार महमदाच्या हातून घडले असें कित्येक त्याचे साळे भोळे शिष्य मानितात खरें; ह्मणजे त्यानें चंद्राचे दोन भाग केले, झाड त्याला भेटायास सामोरें आलें, त्याच्या बोटांमधून पाणी वाहिलें, दगडानें बोलून त्याला सलाम केला, तुळई त्यापाशीं कन्हली, उंटानें

गाऱ्हाणें सांगितलें, मेंढराच्या फेरानें त्यानें खाऊं नयें ह्मणून आपणांत विष आहे असें त्याला कळविलें आणि यांसारिखे दुसरे बहुत घडले ह्मणून ह्मणतात. परंतु हे चमत्कार मजकडून घडले असें महमदानें कधींही ह्मटलें नाहीं आणि कोणी प्रामाणिक मोसलेम लेखकांनींही सांगितलें नाहीं. खरोखर पाहिलें तर कुरानांत याचा कांहीं दाखला आढळत नाहीं. पण उलटें कुरान सांगतें कीं, महमद चमत्कारावांचून आला; यावरून पुरतें प्रमाण आहे कीं सदरहू गोष्टी अलिकडेस कल्पिल्या आहेत.

जरी आबु तालेब स्वतः महमदाचा शिष्य नव्हता, तरी लोकांच्या शत्रुत्वापासून त्यानें आपल्या पुतण्याचा बचाव केला. त्याच्या कुळांतील मुख्य मुख्य मनुष्यांनीं त्याला धाक घातला कीं, "तुझ्या पुतण्यानें उपदेश न करावा असें जर तूं त्याला मनावीत नाहींस, तर तुजशीं आह्मी मोठा कलह करूं."

या चुलत्यानें महमदाला आग्रह करून सांगितलें कीं उपदेश करणें सोडून दे; पण त्यानें उत्तर दिल्हें कीं त्यांनीं माझ्या विरुद्ध सूर्याला उजवीकडे आणि चंद्राला डावीकडे जरी ठेविलें, तरीं मी हें सोडून देणार नाहीं. त्याच्या कुळांतील लोकांनीं महमदास व त्याच्या अनुसाऱ्यांस नगराबाहेर हांकून लावण्याचा निश्चय केला असतांहि त्याच्या चुलत्यानें त्याच्या रक्षणाविषयीं त्याला अभिवचन दिल्हें. लोकांनीं त्यांचा भारी पाठलाग केला, पण

महमदाचा चुलता हामजा व ओमार नामें एक वजनदार मनुष्य ज्यांनीं अगोदर त्याचा मोठा विरोध केला होता ते आतां त्याच्या पक्षास मिळाले. तथापि पाठलाग अझून इतका तीव्र होत राहिला, कीं त्याच्या मोठे नामांकित अनुसाऱ्यांमधून देखील कित्येकांस सूफ समुद्रापलिकडे जो हाब्शी देश त्याच्या राजाकडे पळून जाणें प्राप्त झालें. त्या राजानें त्यांचा अंगीकार करून त्यांवर तो इतका सुप्रसन्न झाला, कीं जरी त्यांस घालवावें असें कोरेश लोकांनीं मागितलें होतें, तरी तो मान्य झाला नाहीं. पण उलटें त्यांस आपण होऊन सांगितलें कीं, जे सर्व तुमचे भाऊ इकडे येण्यास राजी असतील त्यांस मी आश्रय देईन.

ह्या नव्या मताचा फैलाव फार झाल्यावरून कोरेश लोकांमध्यें मोठा गवगवा होऊन त्यांनीं मोठा कट केला कीं महमदी आणि अबदूल मुतालेबाचें घराणें यांतील लोकांशीं आपण सोयरीक करणार नाहीं व कोणत्याही गोष्टीविषयीं त्यांशीं अर्थाअर्थीं संबंध ठेवूं नये असें ठरवून आणि तो ठराव विशेष कायम होण्यासाठीं लागलाच त्याविषयीं लेख करून काआबामध्यें राखून ठेविला, ही गोष्ट महमद आपणाला पैगंबर ह्मणूं लागल्यावर ७ व्या वर्षी घडली. या गोष्टीवरून त्या कुळांमध्यें दुफळी झाली. महमदाचा एक चुलता खेरीज करून बाकीचे सर्व हाशेम घराणें यांनीं अबुतालेबाला आपला मुख्य करून एका पक्षाकडे

झाले. आणि दुसऱ्या पक्षानें आपला पुढारी आबु सोफीयन याला करून त्याच्या मागें जाते झाले. तरी या एकोप्यावरूनही महमदाचा धर्म लयास गेला नाहीं. अबुतालेब याला मक्केंत अधिकार असल्यावरून शत्रूंच्या सर्व योजनेपासून आपला पुतण्या महमद याला रक्षण करण्याचें पुरतें सामर्थ्य त्याच्या अंगीं होतें. अशी दुफळी कांहीं वर्षें टिकून राहिल्यावर महमदानें आपल्या चुलत्याला सांगितलें कीं लोकांनीं जो कट करून लेख केला आहे तो ईश्वरानें नापसंत करून दाखविला आहे. कारण कीं ईश्वरानें एक किडा पाठवून त्या लेखांतलें ईश्वराचें नाम मात्र खेरीज करून बाकीचे सर्व शब्द त्याकडून खाऊन टाकविले. या गोष्टीविषयीं महमदाला आंतून चोरबातमी लागली असावी. तात्काळ आबुतालेबानें जाऊन कोरेश लोकांला ही गोष्ट कळविली आणि ह्मणाला कीं जर ही गोष्ट खोटी निघाली तर मी आपला पुतण्या तुमच्या हातीं देईन, पण जर ही खरी होईल तर मग तुह्मी आपला वैरभाव सोडला पाहिजे आणि जो एकोपा करून तुह्मी हाशमी लोकांविरुद्ध लेख केला आहे तो रद्द केला पाहिजे. तेव्हां त्यांनीं ही गोष्ट मान्य केली आणि काआबास जाऊन तो लेख पाहिला तों आबुतालेबानें ह्मटल्याप्रमाणेंच घडलें असें पाहून त्यांस मोठें आश्चर्य वाटलें. या कारणावरूज तो लेख अगदीं रद्द आहे असें ठरलें.

त्याच वर्षीं ह्मणजे दाहाव्या सालीं आबुतालेब ८०

वर्षांचा होऊन मरण पावला. परंतु त्यानें आपल्या पुतण्याचा धर्म स्वीकारिला असें भरंवसा धरण्याजोगें कांहीं प्रमाण नाहीं. यानंतर महमदाची बायको कादिजा ही आपल्या पांसष्टाव्या वर्षी वारली. या वर्षाला "शोकांचें वर्ष" असें मुसलमान लोकांनीं नामाभिधान दिल्हें आहे.

महमदाचा चुलता आबुतालेब जिवंत असतां त्याच्या गळ्यांत महमदाला आसरा होता, पण तो व महमदाची बायको हीं मरण पावल्यावर त्याला कोरेश लोकांच्या जळजळाटांत फिरून पडावें लागलें. ह्या पाठलागाचा कहर गुजरल्यावरून महमद हा आपला पूर्वींचा चाकर जेइद यासहवर्तमान पहिल्यानें तायीफ लोकांकडे गेला. त्या लोकांतील दोघां मुख्य गृहस्थांपाशीं महमदानें आश्रय मागितल्यावरून त्याला त्यांनीं आश्रय दिल्हा खरा, पण आश्रय शुद्ध वरकांतीचा होता. तो त्यांच्या नगरांत एक महिनाभर राहिला आणि तेथें केवळ थोडकेच शिष्य त्यानें मिळविले. तो अलमुताम याच्या आश्रयानें मक्का शहरांत परतला. बहुत पाठलाग व निंदा होत असतांही अर्बस्थानाच्या चहूंकडून जे यात्रेकरी येत असत त्यांनीं मूर्तिपूजा सोडावी असा तो त्यांस उपदेश करी. महत प्रयत्न करून जे शिष्य त्यानें मिळविलें त्यांमध्यें ६ जण खाज्राई कुळांतील यथ्राब ( मदीना ) या नगराहून आलेले होते. तें नगर त्या वेळेस खाज्राई व अलऔस या दोन कुळांतल्या मनुष्यांनीं विशेषेंकरून भ-

रलें होतें. त्या सहा जणांनीं आपल्या घरीं परत येऊन आपल्या ग्रामस्थ लोकांमध्यें या नव्या धर्माचा फैलाव केला. मोसलेम लेखकांनीं ह्या मनुष्यांस अल आन्सार (आधार देणारे ) अशी संज्ञा दिल्ही आहे. मक्केच्या उत्तरेकडे अल आकबा नामें टेंकडीवर खाज्राई कुळांतील दाहा जण आणि औस कुळांतील दोघेजण हे महमदाला भेटले. तेथें त्यांनीं त्याला भरंवशाचें वचन दिल्हें. त्यांनीं या आपल्या धर्मांत अधिक निपुण व्हावें ह्मणून मुसाब नामें आपल्या एका शिष्यास त्यांस शिकविण्यासाठीं त्याच्याबरोबर त्यानें पाठविला. तो शिकविणारा असा यशस्वी झाला कीं, त्याच्या शिकविण्यावरून त्या नगरांतील एक मुख्य गृहस्थ, औस कुळांतला राजा आणि फारकरून प्रत्येक घराण्यांतील कित्येक जण असे लवकरच कुराणाचे अनुसारी झाले.

महमदाच्या प्रेषितपणाच्या बाराव्या वर्षीं अशी गोष्ट घडली ह्मणून महमद सांगतो कीं, मजवर मोठी मेहरबानी करून गाब्रीएल दूतानें मला मक्केपासून यरूशालेमास आणि यरूशालेमापासून सात आस्मानांस नेलें. याविषयीं कुराणाच्या १७ व्या अध्यायांत याप्रमाणें लिहिलें आहे. "आपले साक्षात्कार कांहीं दाखविण्यासाठीं ज्यानें आपल्या सेवकाला रातोरात मक्केच्या पवित्र देवळापासून तर यरूशालेमाच्या देवळास नेलें तो स्तुत्य असो; तोच ऐकतो व पाहतो. या कुराणाच्या वचनावर रचलेली पुढील

अजागळ व बाष्कळ कथा कुरानांत सांगितली नाहीं पण परंपरेनें चालत आली आहे. आपण साधु आहें अशी कीर्ति वाढावी आणि पवित्र डोंगरावर ज्या मोश्याशीं देव तोंडोतोंड बोलला त्याशीं आपली बरोबरी व्हावी ह्मणून फारकरून त्यानें ही गोष्ट कल्पून सांगितली असावी. ती येणेंप्रमाणें:

"मी काआबाच्या आवारांत असतां (किंवा मी एका धोंड्यावर निजलों असतां, असेंहीं कधीं कधीं तो सांगे ) पहा, एक (गाब्रीएल) दुसऱ्यासहवर्त्तमान मजकडे आला आणि नरडीपासून तर कटीसंधिपर्यंत मला चिरून विदारिलें. हें केल्यावर माझें अंतःकरण आंतून काढून घेतलें आणि तात्काळ विश्वासाच्या पाण्यानें भरलेलें सुवर्णपात्र माझ्याजवळ आणिलें गेलें. मग त्यानें माझें अंतःकरण धुऊन त्या पाण्यानें तें भरलें आणि पूर्ववत जेथलचें तेथें ठेविलें. मग एक शुभ्र पशु मजकडे आणिला गेला. तो खेंचरापेक्षां लहान पण गाढवापेक्षां मोठा होता. त्याच्यावर मी बसलों आणि ग्राबीएल मजसंगतीं पहिल्या आस्मानापर्यंत येऊन दरवाजावर ठोकूं लागला. तेव्हां आंतून विचारिलें कीं "कोण आहे? "तो बोलला, "ग्राबीएल."विचारिलें कीं "तुझ्या संगतीं कोण आहे?" उत्तर दिल्हें कीं " महमद." मग विचारिलें कीं "याला पैगंबरपणा मिळाला काय?" तो बोलला "होय." त्यावर असें आशीर्वचन झालें कीं "तो आबाद होवो? तो सुखरूप आंत येवो." तेव्हां

पाहा, तेथें आदाम होता यावरून ग्राब्रीएल मला ह्मणाला, "हा तुझा पूर्वज आदाम आहे त्याला क्षेम दे." आणि मी त्याला क्षेम दिल्हें असतां त्यानें उलटून मला क्षेम देतांना ह्मटलें," माझा सुपुत्र व उत्तम पैगंबर आबाद होवो." तेव्हां गाब्रीएल मजबरोबर दुसऱ्या आस्मानास आला. त्यानें दारावर ठोकितांच वाणी झाली कीं "कोण आहे?" तो बोलला, "गाब्रीएल." अणखी विचारिलें, "तुझ्याबरोबर कोण आहे?" त्यानें प्रत्युत्तर केलें "महमद." फिरून विचारिलें, "त्याला पैगंबरपणा मिळाला काय? त्यानें "होय" असें उत्तर देतांच आंतून शब्द ऐकण्यांत आला कीं "तो आबाद होवो, त्यानें सुखरूप आंत यावें." दार उघडलें असतां पाहतो तों आंत याहिया (योहान्न) आणि ईसा (येशू) होते; ते तर मावसभाऊ होते.*

गाब्रीएल मला ह्मणाला, "हे याहिया आणि ईसा आहेत यांस सलाम कर." मी त्यांस सलाम केल्यावर ते मला सलाम करितां ह्मणाले," आमचा उत्तम बंधु आणि उत्तम पैगंबर यशस्वी होवो."

अणखी पांच आस्मानांविषयीं सदरहूप्रमाणें दारावर ठोकणें, ते प्रश्न व तींच उत्तरें आणि परस्पराचें परस्परांस सलाम करणें हें जर अक्षरशः सांगूं लागलों तर वाचणा-

* येथें महमदाची चूक झाली कारण कीं मारया व एलिसाबेथ ह्या सख्या बहिणी नव्हत्या.

त्यांस कंटाळा येईल ह्मणून एवढेंच सांगितलें असतां पुरे होईल. [illegible] कीं तिसऱ्या आस्मानामध्यें तो गेला असतां तेथें योसेफ भेटला आणि चवथ्या आस्मानीं इनोख, पांचव्यांत अहारोन, साहाव्यांत मोशे, सातव्यांत आब्राहाम याप्रमाणें त्याला भेटले. आणखी असें झालें कीं, तो मोश्याजवळ होता तेव्हां मोशे रडला. "तूं कां रडतोस?" असें विचारिलें असतां मोशे ह्मणाला कीं, "हा तरुण माझ्या पाठीमागून आला असतां माझ्या देशस्थ लोकांपेक्षां याचा मोठा समुदाय सौख्यलोकीं जाईल ह्मणून." तो पैगंबर पुढें असें सांगतो कीं "मग लेद्राज्याच्या* पलिकडे जाण्याची परवानगी नाहीं तेथपर्यंत मला नेलें. त्या झाडाचें फळ हेजार यांतल्या घागरी एवढें मोठें होतें आणि त्याचीं पानें हत्तीच्या कानाएवढालीं मोठीं होतीं. म्या तेथें चार नद्या पाहून गाब्रीएलाला विचारिलें, ह्या कोणत्या आहेत? तेव्हां त्यानें उत्तर दिल्हें कीं "ह्यांतून दोन तर सौख्यलोकांतील असतां त्यांमधून वाहतात आणि दुसऱ्या दोन ज्या बाहेरून वाहतात त्या नील आणि युफ्राथ अशा आहेत." मग त्यानें मला भेटीच्या† घराकडे नेलें. त्या घरीं दररोज सत्तर हजार दूत जात असत. तेथें मजपुढें एक द्राक्षरसाचें व दुसरें दुधाचें आणि एक मद्याचें अशीं तीन पात्रें ठेविलीं होतीं. मी त्यांतून दुधाचें घेऊन प्राशन केलें. यावरून

* किंवा कमल वृक्ष.

† महमदी लोकांच्या कथेप्रमाणें यासारिखें एक घर आदामाला पाठविलें होतें.

गाब्रीएल मला ह्मणाला कीं, हा तुजविषयीं आणि तुझ्या राष्ट्राविषयीं शुभ शकुन आहे." दुसऱ्या दंतकथेंत अणखी असें ह्मटलें कीं "जर तूं द्राक्षरस निवडला असतास तर तुझें राष्ट्र नीट मार्गापासून बहकलें असतें." शेवटीं मी अल्लाच्या तक्तापाशीं आलों तेव्हां पन्नासदां नमाज करण्याविषयीं हुकुम मिळाला. तेथून परत येतांना मोश्याजवळ आलों तेव्हां त्यानें विचारिलें कीं "काय करण्याविषयीं हुकूम झाला?" त्याला मी ह्मटलें, "दररोज पन्नासदां नमाज करण्याचा." तो ह्मणाला, "रोज रोज पन्नासदां नमाज करण्याविषयीं तूं समर्थ आहेस काय?" तेव्हां त्यानें शपथ वाहून सांगितलें कीं "मला माणसाच्या गोष्टीविषयीं अनुभव आला आहे, कारण कीं इस्त्राएल संतानांनीं हें परिणाम पूर्ण करावें ह्मणून मी यत्न करून पाहिला पण त्यांच्यानें तें पूर्ण करवेना. तर तूं आपल्या प्रभूकडे जाऊन आपल्या राष्ट्राकरितां सूट माग."तसा मी परत गेलों तेव्हां त्यानें दाहा नमाज उणे केले. मग माघारे मोश्याकडे आलों असतां त्यानें पूर्ववत मसलत दिल्ह्यावरून मी फिरून परत गेलों तेव्हां अणखी १० ची सूट मिळाली. अणखी मोश्याकडे आल्यावर त्यानें तीच मसलत दिल्ही असतां मीं परतुन गेलों तेव्हां दाहा नमाज करण्याचा हुकूम झाला. मोश्यानें तर पूर्वीप्रमाणेंच ह्मटल्यावरून मी अणखी परतलों असतां दररोज पांच नमाजांचा हुकूम मिळाला. ह्या शेवटच्या हुकमाविषयीं मो-

ऱ्याला कळविलें गेल्यावर अणखीही सूट मागण्याकरितां मला तो माझ्या प्रभूकडे पाठविणार होता, पण मी ह्मणालों कीं माझ्या प्रभूला इतक्या वारंवार विनंत्या केल्यावरून अणखी त्याकडे जाण्याविषयीं मला लाज वाटती. इतकें ह्मणून त्याची आज्ञा घेतली आणि त्यासाठीं प्रार्थना केली."

ही सदई हकीकत एक प्रकारची आहे. दुसरी तर यापेक्षां फारच निराळी आहे. ती अशी कीं महमद बिछान्यावर निजला होता तेव्हां तो दूत आपले सत्तर जोड पक्ष फैलाविलेले असतां त्यानें त्याला दर्शन दिल्हें आणि महमदाला बुराक नामें पशूवर बसवून डोळ्याच्या एका निमिषांत यरूशालेमास नेलें. तेथें खडकाशीं तो पशु बांधून गाब्रिएलाच्या मागोमाग प्रकाशवंत शिडीनें पहिल्या आस्मानास गेला, तेथें महाकाय कोंबडा होता. तेथून दुसरें आस्मान ५०० फुट अंतरावर होतें तरी त्या कोंबड्याचें डोकें तेथवर पोहंचलें. दुसऱ्या आस्मानांत नोहा त्याला भेटला. अणखी तेथें एक दूत त्याला भेटला, त्याच्या दोहों डोळ्यांमधील अंतर ७०,००० दिवसांची वाट इतकें होतें. सातव्या आस्मानीं येशू ख्रीस्ताला त्यानें पाहिलें. त्यानें आपल्यासाठीं प्रार्थना कराव्या असें महमदानें त्यापाशीं मागिल्यावरून आपल्यापेक्षां त्याला श्रेष्ठ मानिलें.

आतां हें स्वप्न होतें किंवा खरोखर त्याचा आत्मा किंवा त्याचा देह आस्मानांत चढला याविषयीं लोककथेचें

एक मत नाहीं. विवेक दृष्टीनें पाहिलें असतां कोणाएका-ची खात्री होईल कीं असें कांहींच झालें नाहीं, परंतु हे त्याच्या मनाचे शुद्ध तरंग असे आहेत. ह्या गोष्टीमध्यें असंभव्यता किंवा पोकळ धिटाई यांतून कोणतें विशेष आहे हें सांगतां येत नाहीं. परंतु आरब लोकांला नवल-युक्त कथेची मोठी आवड आणि ही गोष्ट ज्याला सांगि-तली गेली त्यांनीं ती मान्य केली असें जेव्हां आह्मास आढळतें तेव्हां या सर्वांवरून ही गोष्ट जागिक आणि ई-श्वराला तुच्छ मानण्याचा चतुराईनें बनाविली असावी असें साफ नजरेस येतें.

आपल्या पक्षाकडील लोकांस केवळ नवलयुक्त दैव योगानें चकीत करावें ह्मणून ही बाष्कळ गोष्ट महम-दानें बनाविली असावी, यावांचून त्याचा दुसरा एक उद्दे-श होता ह्मणून दिसून येतें. जो कोणी इस्लामाचा धर्म लक्ष देऊन पाहील त्याला हा धर्म आणि यहूदी लोकांचा ईश्वरस्थापित धर्म या उभयतांमध्यें अनेक गोष्टी कांहींशा सारख्या आहेत. आणि जितकी होईल तितकी मोश्याची व आपली बरोबरी करावी आणि जितकी यहूदी धर्मां-तील मुख्य विषयांशीं ऐक्यता करतां येईल तितकी करावी ह्मणून महमदानें साक्षेपेंकरून उद्देश धरिला होता असें साफ दिसून येईल. रात्रींच्या सफर करण्याच्या कथेमध्यें ज्यांचीं नांवें दाखल केलीं आहेत ते ज्यांस यहूदी व ख्रिस्ती लोक देवाचे सेवक मानून त्यांचा सन्मान करीत होते असे गृहस्थ होते.

महमदाला हें पुरतें माहीत होतें कीं ईश्वराच्या गौरव-विशिष्ट स्थानीं त्याची आपणास भेट झाली आहे, व आपल्याला आकाशांतील खोल मर्मांची पुरती माहिती झाली आहे अशी लोकांची एकदां आपल्यावर श्रद्धा बसवितां आली ह्मणजे त्या पायावर जशी पाहिजे तशी इमारत बांधितां येईल. तेव्हांपासून पुढें त्यानें आपल्या धर्मसंबंधी हरएक क्षुल्लक गोष्ट किंवा कृत्य जें सांगितलें तें लोकांनीं विशेष देववचन असें मानिलें होतें. ह्या गोष्टींचें बरोबर स्मरण राखिलें गेलें आणि महमदाच्या मरणानंतर त्या सर्व एकत्र जमविल्या जाऊन सांप्रदायिक ग्रंथ असे रचिले गेले, त्याला सुन्ना ह्मणतात. यहूदी लोकांमध्यें याच प्रकारचे तोंडानें सांगितलेले सांप्रदाय आहेत.

जेव्हां महमदानें आपल्या रात्रीच्या सफरीविषयीं आपला चुलता अलआब्बस व अबुतालेबाची कन्या ओमहाना नामें आपली चुलत बहीण यांस सांगितलें तेव्हां त्या उभयतांनीं ही गोष्ट इतकी असंभूत मानिली कीं त्यानें लोकांस हें सांगू नये अशी त्यांनीं त्याजपाशीं विनंती केली, पण तो ऐकेना. यावरून त्याचे कित्येक अनुसारी त्यास सोडून गेले. त्याच्या शत्रूंनीं त्याचा उपहास केला, परंतु अबुबेकर यानें त्याचा अभिमान धरून ह्मटलें कीं जें महमद सांगतो त्यावर माझा विश्वास आहे. नजम नामें कुरानाच्या ५३ व्या सुऱ्याची आयत १—१८ यांत त्याच्या प्रमाणिकपणाविषयीं लोकांची

खातरी करण्याकरितां अशीं वचनें आहेत. "हा तारा मावळतांना याची शपथ वाहतों कीं तुमचा सोबती महमद हा बहकला नाहीं, किंवा मार्गाबाहेर वळला नाहीं. तो आपल्या इच्छेनें बोलत नाहीं. जो हुकूम त्याकडे पाठविला तोच हा आहे. जो पराक्रमानें समर्थ, बुद्धिसंपन्न त्यानें हें त्यास शिकविलें आहे. तोच आस्मानाच्या उंच किनाऱ्यावर होता, मग तेथून पैगंबराजवळ पोहंचून दोन धनुष्यांचें किंवा त्याहूनही कमी अंतर राहीपर्यंत त्याच्याजवळ येत आला आणि पाठविलेला हुकूम आपल्या सेवकास दिल्यानें जें महमदानें पाहिलें त्याविषयीं त्याचें अंतःकरण लबाडी करीत नाहीं. अणखीही त्यानें त्याला अनुल्लंघनीय कमळ वृक्षापाशीं पाहिलें; त्याच्या जवळ बिहिस्त याचा बाग आहे. त्या कमळ वृक्षानें जें गुप्त तें आच्छादिलें तेव्हां त्याची नजर चळली नाहीं व बहकली नाहीं; त्यानें खरोखर आपल्या प्रभूचीं कित्येक महान चिन्हें पाहिलीं होतीं."

आतां लोकांमध्यें महमदाविषयीं फारच विरोधभाव माजला आणि गवगवा झाला यावरून त्यानें मुसाब याची मदत आनंदानें अंगिकारिली. हा आपल्याबरोबर धर्म मतानुसारी ७३ आसामी व त्यांशिवाय दुसरेही अविश्वासी लोक यांस घेऊन याथ्राब ( मदिना ) येथून परत आला होता. या मनुष्यांनीं महमदाला शपथपुरःसर वचन दिल्हें कीं आह्मी आपल्या बायका व मुलें याप्रमाणें अं-

तःकरणपूर्वक तुला सर्व बेआदबीपासून राखूं. तेव्हां यानें-ही आपल्या तर्फेनें शपथ वाहून ह्मटलें, मी तुह्माशीं विश्वासूपणें वागेन आणि सहसा तुह्माला अंतर देणार नाहीं. तो अणखी ह्मणाला, " सर्व गोष्टी आह्मामध्यें आतां समाईक आहेत. तुमचें रक्त तेंच माझें रक्त, तुमच्या नाशाप्रमाणें माझा नाश. आपण मानापानानें एकमेकाशीं बांधले आहों. मी तुमचा मित्र आणि तुमच्या वैऱ्यांचा मी वैरी आहें. तेव्हां त्याचे शिष्य त्याला ह्मणाले, "परंतु जर आह्मी तुझ्या सेवेंत वधिले गेलों तर आह्मांला काय प्राप्त होईल ?" "बिहिस्त" असें महमदानें प्रत्युत्तर केलें. हा करार त्या नगरांतील लोकांनीं मान्य केला अशी सिद्धता झाल्यावर त्यानें आपल्या सोबत्यांस मक्केंतून निघून मदिनेस जावयास सांगितलें. तथापि त्यांच्या मागें जाण्याविषयीं ईश्वरी परवानगीची वाट पाहण्याकरितां महमद स्वतः व अबुबेकर व आली हे मागें राहिले.

मदिनेंतील लोकांशीं असा करार झाल्याचें वर्त्तमान समजल्यावरून मक्केंतील महमदाच्या शत्रूस असा धाक पडला कीं त्याला न जाण्याविषयीं प्रतिबंध करण्याचा त्यांनीं निश्चय केला. या कारणास्तव त्यांनीं सभा जमवून असें ठरविलें कीं त्याचा वध करण्याकरितां प्रत्येक कुळांतील एक एक असामी निवडून घ्यावा. सर्व कुळांनीं सन्मानाचा किंवा दोषाचा वांटा घेतला असतां हें केवळ एकलें हाशेम घराणें जें आपल्या भावाबंदांच्या वधाचा सूड उगविण्यास त-

यार होईल त्यास भय पडून तें असें कृत्य करण्यापासून राहील ह्मणून त्यांनीं आशा धरिली.

ह्या कटाविषयीं बातमी महमदाला लागली. त्यानें आलीला सांगितलें कीं "माझ्या हिरव्या झग्यानें तूं आपल्याला झांकून घेऊन माझ्या जागीं निजून रहा." इतकें बोलून आपण आबुबेकराच्या घरीं चुकवून गेला. इकडे त्या कट करणाऱ्यांनीं त्याच्या खोलीभोंवता सकाळपर्यंत चौकी पाहरा करून उजेडल्यावर पाहूं लागले तों महमद आपल्याला चुकांडी देऊन गेला असें समजून आलें. महमदानें तर अबुबेकराला आपल्या बरोबर घेऊन त्याच्या घराहून निघाला आणि मक्केच्या आग्नेय दिशेस सुर नामें एक डोंगर आहे त्यांतल्या गुहेंत जाऊन ते उभयतां आपल्या पाठीस लागणाऱ्यापासून तेथें तीन दिवस लपून राहिले. "एथें केवळ आपण दोघेच जण आहोंत" असें आबुबेकर ह्मणाला. महमदानें प्रत्युत्तर केलें कीं "एथें एक तिसरा, तो साक्षात आल्लाच आहे."

मोसलेम लेखक अशी बतावणी करितात कीं कोरेश लोक त्या गुहेजवळ आले तेव्हां त्या गुहेच्या तोंडीं बाभळीचें झाड वाढलेलें व तिच्या फांद्यांनीं त्या गुहेचें तोंड झांकलेलें होतें व तिच्या फैलावलेल्या फांद्यांवर खबुतरांनीं आपलीं कोटीं करून त्यांत अंडीं घातलीं, यांशिवाय कांतिण्यांनीं त्यावर जाळीं केलीं होतीं. हीं लक्षणें पाहून अलिकडे कोणी त्या गुहेंत गेला नसावा असें त्यांनीं ठरविलें. आणि माघारें व-

ळून दुसरे दिशेनें धुंडावयास गेले. हे उभयतां तीन दिवस त्या गुहेंत लपून राहिले तों पर्यंत आबुबेकराची आसमा नामें कन्या दर संध्याकाळीं अंधारामध्यें त्यांच्यासाठीं अन्न पाणी आणून देत असे.

चवथ्या दिवशीं त्यांनीं धैर्य धरून जे उंट आबुबेकरानें आणविले होते त्यांवर बसून मोठा मार्ग सोडून व सुफ समुद्राच्या काठाकडून ते मदिनेकडे चालते झाले. ते लांब गेले नव्हते इतक्यांत स्वारफौजेनें त्यांस आटोपिलें. त्या फौजेचा सेनापति सोराका इब्न मालेक नामें होता. आबु-
१ बेकराची तर पांचावर धारण बसली परंतु महमद त्याला धीर देतां बोलला, "घाबरूं नको. आल्ला आपल्या साहित आहे." सोराका हा भयंकर तोंडाचा योद्धा होता, त्याचे कल्ले रांठ ढवळ्या केसाचे होते आणि त्याच्या बाहूवर शिरा तरतरीत दिसत होत्या. त्यानें महमदाला अटोपिलें तेव्हां त्याचा घोडा दुपायांवर येऊन त्यासहवर्तमान तो खालीं पडला. सोराकाला हें दुश्चिन्ह असें वाटलें. महमदानें ह्या अशा त्याच्या भावना जाणून अशा प्रकारचें पांडित्य केलें कीं सोराकानें त्याची क्षमा मागितली आणि त्यास सुखरूपें जाऊं दिल्हें. पुढें त्यांनीं कोबा नामें एक डोंगर जो मदिनेपासून एक कोसाच्या अंतरावर आहे तेथें येई तोंपर्यंत निर्विघ्न मार्ग क्रमिला. या ग्रामस्थ लोकांनी ती मोठी आवडती जागा होती, तेथें रोमी व अशक्त अशा मनुष्यांस पाठवीत असत, कारण कीं तेथील

हवा शुद्ध व आरोग्य अशी होती. अणखी तेथूनच फळफळावळ मदिना शहरास पुरविली जात असे. तो डोंगर व त्याच्या आसमंतातचे प्रदेश तर द्राक्षमळे, खजूर व कमलें यांचीं बनें, माहाळूंगें, नारिंगें, डाळींबें, अंजीर पीचादिक झाडांचे बाग यांकडून भरून गेले आहेत. आणि त्यांस नितळ पाण्याच्या पाटांनीं पाणी दिल्हें जात असे. ह्या ठिकाणीं आल्यावर महमदाचा उंट आपल्या गुढघ्यावर मेटाखुंडीस येऊन पुढें जाईनासा झाला. महमदानें हें शुभ चिन्ह आहे असें सांगून तो कोबामध्यें चार दिवस राहिला. त्या उंटानें तेथें गुढघे टेंकिले. या गोष्टीच्या स्मरणार्थ तेथें एक मस्जीद बांधिली आहे.

त्या गांवीं महमद असतां बोरैदा इब्न होसैद नामें एक नामांकित सरदार व त्याच्या अंकित सत्तर असामी हे त्याला मिळाले. हे सर्व सहाम कुळांतील होते. दुसरा एक नामांकित शिष्य सालमन अल पार्सी ( इरानी ) हाही त्याला त्याच गांवीं मिळाला. इस्पाहान याजवळ एक लहान खेडें आहे, तें त्याचें जन्मस्थान होतें असें ह्मटलें आहे. आणि एका दिवशीं ख्रिस्ती देवळामध्यें तो गेला असतां त्या लोकांच्या गंभीर भक्तीवरून असा चकीत झाला कीं, ज्या मूर्तिपूजक धर्मामध्यें तो वाढला त्याचा त्यानें त्याग केला. पुढें तो धर्माचा शोध करीत देशांत फिरत असतां, शेवटीं अरबस्थानांत एक पैगंबर निघाला आहे असें वर्त्तमान त्याला एका वृद्ध पाद्रीनें सां-

गितलें, त्यावरून तो महमदाकडेस गेला. कांहीं वर्षांनीं हा सालमन नांवा लौकिकास चढला, व मक्केंतील अविश्वासी लोक असें सांगतात कीं कुराण लिहिण्यांत त्यानें महमदाचें सहाय केलें. त्याविषयीं कुरानांत अशी सूचना आहे. "मूर्तिपूजक खरोखर ह्मणतात कीं फलान्या माणसानें कुराण रचण्यांत सहाय केलें आहे परंतु ह्या माणसाची भाषा आजमी ( पार्सी ) आहे आणि कुरान तर शुद्ध अरबी भाषेंत लिहिलें आहे." अ. १६ सुरा नहल आय. १०५.

ज्या मोसलेमांनीं पूर्वीं मदिनेमध्यें आश्रय धरिला होता, ते महमदाला भेटण्यासाठीं सामोरे आले? आणि ह्या नगरांत शिष्य मंडळींची संख्या वाढत चालली आहे हें समजल्यावर रवी महिन्याच्या १६ व्या तारिखेस प्रसिद्धपणें मदिनेंत त्यानें प्रवेश केला. नगराच्या जवळजवळ तो आला असतां वाटेनें ५०० ग्रामस्थ त्यास भेटले. त्यांस बसावयास उंट आणि छायेसाठीं ताडपत्राचा चांदवा असें होतें आणि त्याच्या समोर त्यांनीं पताकांप्रमाणें एक पागोटें सोडिलें होतें आणि मोठे शूर योद्धे त्याच्या मागें पुढें चालत असतां सर्व प्रकारच्या विजयाच्या समारंभानें त्यानें त्या शहरांत प्रवेश केला.

हें पळणें (आरबीमध्यें हिजरा ) अरबी कालानुक्रमामध्यें शकारंभ असें आहे, एथूनच सर्व सन मोजले जातात. हिजरा सनाचें प्रथम वर्ष हें ख्रिस्ती सन ६२२ असें आहे.

## अध्याय ३.

### महमदाचा उत्तर वृत्तांत.

आतां हा परागंदा झालेला महमद राजा होऊन बसला. तो मदिनेंत पोहंचतांच त्याला सैन्य मिळालें; तें सैन्य तर त्याशीं संसक्त, त्याच्या इच्छेनुरूप वर्त्तणारें, आणि त्याचे भोळे शिष्य असें होते. तो एकदम जाथू कामाच्या योजना करूं लागला, त्यानें आपली कन्या फतिमा इचें लग्न आलीशीं लावल्यावर पहिल्यापहीळ आपल्याला राहण्याकरितां घर बांधलें, आणि आपण प्रासिद्धपणें लोकांसमोर उपदेश व प्रार्थना करावी ह्मणून आपल्या घरानजीक एक मशीद बांधिली. कारण कीं तो आपल्या सैन्याचा अधिपति, लोकांचा न्यायाधीश आणि शिष्यांचा पालक असा झाला असतां त्याच्या अंगीं राजकीय आणि धर्मसंबंधी असें दोन्ही अधिकार मिळाले होते.

त्याचा भाग्योदय होण्यासरसें त्याचें मतही पालटूं लागलें. हा काळपावेतों त्यानें आपला धर्म पांडित्य व आर्जव, अशा सामोपचारानें चालविला आणि मक्का सोडल्यापूर्वी कांहीं जुलूम जबरदस्ती न करितां नुसतें गोड गोड बोलून नृत्यानें आपलें कार्य साधिलें होतें. “ तूं लोकांस बोध कर, बोध करणें हेंच तुझें काम आहे, तुला त्यांजवर अधिकार दिल्हा नाहीं. ” ( कुरान. सुरा. २८. ) तो मक्केंत होता तापर्यंत तो ह्मणत गेला कीं, मी आपला धर्म

वाढविण्यासाठीं कोणत्याहि प्रकारचा जुलूम किंवा जबरदस्ती करणार नाहीं. आणि जें कुरान त्यानें त्या गांवांत प्रसिद्ध केलें, त्यांतील बहुतेक वाक्यांत तो असें स्पष्ट बोलला कीं, माझें काम केवळ उपदेश व बोध करण्याचेंच आहे. माझा धर्म कोणी स्वीकारावा ह्मणून त्यांजवर जुलूम करण्याचा मला कांहीं अधिकार नाहीं. आणि लोक विश्वास धरोत अगर न धरोत त्याविषयीं मजकडे कांहीं नाहीं ; याविषयींचा सर्व मोसबा ईश्वराकडे आहे. हे महमदा, आह्मी अगखी तुला हुकूम पाठवून सांगितलें कीं तूं आब्राहामाच्या धर्माप्रमाणें चाल, तो सद्धर्मपालक होता, मूर्तिपूजक नव्हता. "तूं ज्ञानानें आणि मधुर बोधानें मनुष्यांस आपल्या प्रभूच्या मार्गाकडे बोलाव आणि अत्यंत नम्रतेनें त्यांशीं विवाद कर, कारण कीं कोण मार्गापासून वळतो आणि कोण नीट मार्ग धरीतात हें तुझ्या प्रभूला पुरतेंपणें माहीत आहे. याकरितां तूं सहनतेनें विरोध सोस, पण ईश्वरी सहायावांचून तुला सहनता होणार नाहीं. आणि अविश्वास्यामुळें तूं खिन्न होऊं नको!" (सुरा १६. सुरा नहल आय. १२६.) "धर्माविषयीं कांहीं जुलूम नसो." (सुरा २ सुरा बकर आय. २५६) त्यानें आपल्या अनुसाऱ्यांस जबरदस्ती करण्याचा हुकूम दिल्हा नाहीं असें केवळ नव्हे तर त्यानें त्यांस असा बोध केला कीं धर्मसंबंधी जे कांहीं पाठलाग किंवा अनर्थ होतील ते तुह्मी नम्रतेनें सोसून घ्यावे. आणि

जेव्हां त्याचा खाजगत पाठलाग झाला, तेव्हां तो कोंणाशीं कांहीं विरोध न करितां आपण आपलें जन्मस्थान सोडून दूरच्या एका खेड्यांत जाऊन राहिला. पण हें जें अनुसार्य व्रत त्यानें बारा वर्षं सतत चालविलें तें आपली शक्ति अल्प आणि आपल्या शत्रूची चढती कमान होती यावरूनच काय तें होतें असें दिसतें. कारण कीं मदिनेंतील लोकांच्या सहायानें आपल्या शत्रूसमोर आपण उभें राहण्यास समर्थ होतांच त्याच्या भाषणांत फरक पडला. त्यानें असें सांगितलें कीं "मला आणि माझ्या अनुसाऱ्यांस तरवार आदिकरून शस्त्रानें काफर लोकांपासून आपला बचाव करण्याविषयीं ईश्वरानें परवानगी दिल्ही." नंतर जेव्हां त्याचा पराक्रम वाढला, तेव्हां चढाई करून जाण्याविषयीं ह्मणजे शत्रूवर हल्ला करणें, हरतऱ्हेनें मूर्त्तिपूजेचा समूळ उच्छेद करणें आणि हा खरा धर्म अंगीकारण्यासाठीं लोकांस तरवारीच्या धारेवर धरणें या गोष्टींविषयीं आपल्याला हुकूम प्राप्त झाला असें त्यानें भासविलें. "काफर लोकांशीं लढाई करण्याविषयीं तुह्मास निक्षून हुकूम दिल्हा आहे." (सुरा २.) "यास्तव सैतानाच्या मित्रांशीं युद्ध कर, कारण कीं सैतानाची युक्ति अशक्त आहे." (सुरा ४.) "अहो खऱ्या विश्वासणाऱ्यांनो, तुह्मी आपल्या शत्रूंपासून आपला बचाव अगत्य करा आणि निरनिराळ्या टोळ्यांनीं किंवा सर्व मिळून लढाई करण्यासाठीं त्यांजवर चाल करा." (सुरा

४.) आणि ज्या महिन्यांत तुह्मी त्यावर हल्ला करूं नये ते संपल्यावर जेथें तुह्मास मूर्त्तिपूजक सांपडतील तेथें त्यांचा वध करा, त्यांस कैद करून वेढा घाला, आणि त्यांच्यासाठीं सोईवार ठिकाणीं दबा धरा. परंतु जर ते पश्चाताप करतील व नेमलेल्या प्रार्थना ( नमाजी ) करतील आणि नेमलेला धर्मादाय देतील, तर त्यांस मोकळें जाऊं दे." (अ. ९ सुरा तवबा. आय ५.) "तुह्मी जेव्हां अविश्वास्यांसीं भिडतां तेव्हां त्यांची मोठी कत्तल होईपर्यंत लढून त्यांचा शिरच्छेद करा, त्यांस बंधनानें बांधा. मग लढाई संपल्यावर मर्जी असल्यास त्यांस तसें जाऊं द्या नाहीं तर त्यांजपासून खंडणी घ्या." (अ. ४७ सुरा महमद. आय. ४, ९.)"निश्चय खऱ्या विश्वासणाऱ्यांस त्यांचे आत्मे व मालमत्ता यांसुद्धां ईश्वरानें खरेदी करून घेतलें आहे. आणि ईश्वरासाठीं ते लढतात यास्तव बीहिस्त त्यांस देऊं केलें आहे. ते मारोत किंवा मरोत तरी तौरात, इंजील आणि कुरान यांवरून त्यांविषयीं हें वचन एकसारिखेंच निश्चित आहे." ( सुरा ९. सुरा तवबा. आय ११२.) जे सुरे मदिनेमध्यें प्रगट केलेले त्यांमध्यें क्रूरता, अक्षमता आणि रक्तपात हीं लक्षणें विशेषेंकरून दिसून येतात व दुसरें प्रमाण नसतें तर त्यावरूनच ठरवितां येतें कीं ते सुरे महमदाच्या पळण्यानंतर लिहिले होते. महमदाच्या शिष्यांनीं ह्या अभिप्रायाबरहुकूम वर्त्तणूक केली आहे; व मोसलेम सैन्याकडून जो जाहीरनामा होत असे तो याप्र-

माणें," कुरान किंवा मरण अगर कर देणें." सांप्रत देखील मुसल्मानी राज्यांत दुसरे जे धर्मप्रकार राहतात त्यासर्वांस आपल्या मताबद्दल सरकारांस पट्टी देणें प्राप्त आहे; आणि महमदाच्या कोणत्याही मताविरुद्ध किंवा निंदेचें भाषण कोणी केलें असतां त्याचा वध नाहीं तर त्याची छळणूक झाल्यावांचून तो राहणार नाहीं. अविश्वासी लोकांशीं विवाद करणें यांविषयीं अगदी मनाई आहे असें जरी नाहीं तरी त्याचा अनंगीकार आहे. महमदाला देखील याप्रमाणें कुराणांत बोध केला आहे. " याकरितां या गोष्टीविषयीं त्यांस तूं आपल्याशीं वादविवाद करूं देऊं नको, पण तूं आपल्या प्रभूकडे त्यांस बोलाव कारण कीं तूं नीट धोरण धरितोस. पण जर ते तुजशीं विवाद करूं लागतात तर तुह्मी जें करितां तें देव पुरतें जाणतो. ज्या गोष्टींविषयीं आतां तुह्मामध्यें वाद आहे त्याविषयीं पुनरुत्थानांत देव तुमच्या मध्यें न्याय ठरवील." (सुरा २२ सुरा हज. आय.६८ – ७० ).

आतां महमदाला आपलीं मोठमोठीं कार्यें विशेष यशस्वीपणें सिद्धीस नेण्यासाठीं सामर्थ्य प्राप्त झालें. त्यानें जी तरवार गाजविली तिचा पराक्रम छपवून राखावा असें त्याच्या मनांत नव्हतें. तथापि कोरेश लोकांस त्रास देण्याकरितां त्याच्या हुकमावरून त्याच्या लोकांनीं जी पहिली त्यांवर स्वारी केली ती सफळ झाली नाहीं. त्या शत्रु कुळाकडील एक काफला सुरीयाहून मक्केस जात आहे असें

महमदास कळविल्यावरून तो काफला पाडाव करून आणण्यासाठीं त्यानें आपला चुलता हामजा याबरोबर तीस स्वारांची टोळी देऊन त्याला दौडीवर पाठविलें; परंतु ते काफल्याच्या जवळ गेले असतां त्याच्या संरक्षणार्थ तीनशें माणसें आहेत असें पाहून त्याजवर हल्ला न करणें हें ठीक आहे असें समजून गुपचीप मदिनेस परत गेले.

पेस्तर सालीं बेदर एथील लढाईमध्यें त्यानें आपल्या सैन्यबळेंकरून जें यश मिळविलें तेणेंकरून मागील अपयशाचा डाग उडून गेला. त्या विजयानें तें साल महमदी वृत्तांतामध्यें फार नामांकित झालें आहे. एक मातबर काफला मक्केहून जात होता आणि त्याच्या संरक्षणार्थ अबुसोफियन व त्याबरोबर तीस चाळीस माणसें होतीं, हें पाहून महमदाची सूड उगविण्याची बुद्धि आणि लोभ हे प्रदीप्त झाले. महमदाच्या हेरांनीं त्यास सांगितलें कीं ही मातबर लूट अनायासानें तुझ्या हातीं येण्याजोगी आहे, तेव्हां त्यानें आपल्या बरोबर कांहीं अनुसाऱ्यांस घेऊन त्यांचा पिच्छा धरिला. परंतु त्यानें त्यांस गांठलें नव्हतें इतक्यांत अबुसोफियन यानें आपल्या कुमकेसाठीं मक्केंतील आपल्या भावाबंदाकडे एक जासूद फेंकला. जर आपण आबुसोफियनाची सुटका करण्याविषयीं उशीर करितों तर आपले सर्व सवदासूत व सामग्री गमावली जाती असें भय धरून तात्काळ साडे नऊशें मनुष्य निघाले. त्यांमध्यें मक्केंतील कित्येक श्रेष्ठजन होते. महमद तर केवळ तीनशें तेरा शि-

पाई जे बहुतेक सांडणीस्वार होते त्यांसहवर्त्तमान येणारी कुमक व काफला यांच्यामध्यें वाटेवर बसला; त्यांत सत्याहत्तर तर त्याचे पहिले शिष्य होते आणि बाकीचे त्याचे अनुसारी होते. सैन्याच्या न्यूनाधिक्याविषयीं भय न धरितां आपला अधिकार, आपली अब्रू आणि कदाचित् आपला जीवही धोक्यांत घालून महमदानें लढाई करण्याचा निश्चय केला. हें सैन्य तर आबुसोफियनाच्या मातबर काफल्याच्या लुटीची आशा कांहीं वेळ सोडितां शत्रूच्या सबळ सैन्याशीं लढण्यास उद्युक्त झालें. तशांत महमद आपल्या प्रार्थनेनें त्यांस उत्तेजन देऊन परम थोर ईश्वर याच्या नामानें निश्चय तुह्मास जय प्राप्त होईल, असें त्यांस वचन देत गेला. परंतु आपल्याला ईश्वरी मदत मिळेल अशी कितीही त्याची खातरी होती तथापि त्यानें जय मिळविण्याकरितां मानवी उपाय योजण्याविषयीं कांहीं हयगय केली असें नाहीं. आपल्या सैन्याची बाजू राखावी ह्मणून त्यानें लहान वरवंडी केली. आणि ज्या ठिकाणीं त्यांनीं तळ धरिला होता तेथें एक ओढा वाहत होता ह्मणून सैन्यास पाण्याचा कांहीं तोटा पडला नाहीं. शत्रु त्या डोंगरावरून खालीं उतरत असतां महमदानें आपल्या पक्षाकडे लक्ष देऊन मोठ्यानें ह्मटलें, "हे ईश्वरा, जर ह्यांचा नाश झाला तर मग ह्या पृथ्वीवर तुझी भक्ति कोण करील? माझ्या लेकरांनो धैर्य धरा, आपली फळी दृढ धरा, तुह्मी आपले तीर मारा, हा दिवस तुमचाच आहे."

सैन्याचें युद्ध होऊं लागल्यापूर्वी मोसलेम पक्षाकडील आली, अलहारेथ, आणि हामजा असे तीन योद्धे यांनीं कोरेश पक्षांतील तिघांशीं द्वंद्वयुद्ध केलें त्यांत मोसलेम योद्धे विजयी झाल्यावरून उभय दळांला पुढील होईकाचें चिन्ह झालें. लढाईच्या आरंभीं महमदानें अबुबेकराबरोबर सिंहासनीं चढून आमच्या सहायासाठीं तीन हजार दूतांसहित गाब्रिएलाला पाठवावें अशी ईश्वरापाशीं आग्रहानें विनंती केली. परंतु जेव्हां आपल्या सैन्याची डळमळ होतांना त्यानें पाहिलें तेव्हां आपल्या प्रार्थनास्थळापासून त्यानें उडी मारून एका घोड्यावर आपलें आंग टाकिलें आणि मूठभर वाळू वर फेंकून ओरडला, "त्यांच्या तोंडाला काळिमा लागो." इतकें ह्मणून तो शत्रूवर तुटून पडला. त्याचे अनुसारी धर्मपिस्यानें अजिंक्य झाले. कोरेश सैन्य ह्या विश्वासू सैनिकांची फळी फोडावयास किंवा त्यांच्या तीव्र मारांचा विरोध करण्यास समर्थ नव्हतें ह्मणून तें घाबरून पळून गेलें. कोरेश लोकांतील सत्तर शूर असामी त्या रणभूमीवर मरण पावले, व सत्तर पाडाव झाले, ह्मणून मोसलेमांनीं मोठा जयजयकार केला. मोसलेमाकडील तर केवळ चवदा असामी मरण पावले. त्यांचीं नामें वंशपरंपरेमध्यें दाखल केलीं आहेत, आणि धर्माकरितां मरण पावणाऱ्यांच्या यादींत मांडलेलीं आहेत; आणि प्रत्येक धार्मिक मुसलमान भक्तिभावानें त्यांचें स्मरण करितो. कोरेश लोकांचीं प्रेतें त्यांनीं नग्न करून एका वि-

हिरींत टाकिली. दोघे बंदिवान विशेष दोषी होते ह्मणून त्यांस मरणाची शिक्षा ठरविली आणि वरकड बंदिवानांतील एक एकावर ४००० दिरम रूप्य खंड बसविला. जी लूट हातची गेली होती तिच्या मोबदला ही रकम प्राप्त झाली. कारण कीं कोरेश लोकांचा पराभव झाला असतांही आबुसोफियन हा युक्तीनें तजवजि करून बहुतेक काफला यासुद्धां सुखरूप मक्केस गेला. पाडाव झालेल्यांपासून जी खंडणी मिळाली आणि कांहींशी काफल्याचीही लूट हातीं लागली होती, असें मिळून बरीच रकम जमली होती. तथापि विजयीं सैन्यामध्यें वांटणीविषयीं इतका तंटा झाला कीं थोडक्यावर चुकली, नाहीं तर मोठा घात झाला असता. महमदाच्या सैन्याचे दोन भाग होते, त्यांतून आनसार ह्मणजे मदतगार ह्मटलेला तो संख्येनें बहुत होता ह्मणून ते मोठा वांटा मागूं लागले. मोहाजरीन ह्मणूं लागले कीं, आम्ही धर्मांगीकार करण्यांत पहिले आहों त सबब त्यांच्यापेक्षां अधिक, नाहीं तर बरोबरीचा तरी वांटा आह्मास असावा. हा कज्जा मिटवून टाकावा ह्मणून महमदानें एक बनावटी हुकूम करून तो ईश्वरापासून आला अशी बतावणी केली. त्या लुटीचा पांचवा भाग आपल्यासाठीं व अमूक धर्मादायाच्या कामासाठीं एकीकडे काढून ठेविल्यावर बाकीचा ऐवज समानतेनें विभागून घ्यावा अशी त्यांत आज्ञा होती." बिसमिल्ला हिर्रहमानिर रहीम. ते तुला लुटीविषयीं हुकूम विचारतात, तूं

सांग, लूटीचा माल विभागणें हें आल्ला व पैगंबर यांकडे आहे. याकरितां आल्लाला भ्या, आणि आपापसांत सल्ला करा, आणि आल्ला व त्याचा रसूल यांच्या हुकमांत चालून आपण इमानी आहों असें दाखवा." (सुरा ८ सुरा अनफाल. आय १. "समजा कीं कांहीं जिन्नस तुह्माला लूट मिळाली असतां त्यांतील पांचवा हिस्सा आल्लासाठीं व रसूल व त्याचें कुळ व पोरपोरका व गरीब व मुसाफीर यांच्यासाठीं आहे. (सुरा ८. सुरा अनफाल आय. ४२) जो हिस्सा या प्रसंगीं महमदानें आपल्याकडे करून घेतला तो कित्येक हजार दिराम रुपें असा होता. त्यांतून गरीब, पोरपोरके व मुसाफीर यांच्या कारणीं कितपत लाविला याविषयीं इतिहासांत कांहींच खबर दिल्ही गेली नाहीं. पुढें एका प्रसंगीं तर मागें सांगितलेला नेम एकीकडे ठेवून सगळी लूट त्यानेंच बळकावली आणि तिची व्यवस्था माझ्या इच्छेप्रमाणें करण्याविषयीं मला हुकूम मिळाला आहे असें जाहीर केलें ( सुरा हश्र. आय. ९९ ). दुसऱ्या वेळीं लुटींत मिळालेला एक उत्तम प्रकारचा रेशमी गालीचा एकाएकी नाहींसा झाला. तेव्हां तो खचीत महमदानेंच बळकावला असे लोकांस वाटल्यावरून आपल्या वरचा दोष उडविण्याकरितां अल्लाचा हुकूम तयार करून दाखविला, तो असा. " फसविणें हें भविष्यवाद्याचें काम नाहीं कारण जो फसवितो त्याला ज्या गोष्टी विषयीं त्यानें फसविलें ती शेवल्या न्यायाच्या दिवशीं आपल्या संगतीं

तथं न्याची लागेल." (अ. ३. सुरा इमरान आयत. १६२).

बेदरच्या लढाईमध्यें भक्तांच्या लहानशा टोळीसहवर्तमान महमदाला जो जय प्राप्त झाला त्याविषयीं कुरानांत वारंवार मोठी बढाई मिरविली आहे आणि ईश्वरानें आपण होऊन केवळ अद्भुत साक्ष महमदाविषयीं पटविली असें महमदी हमेशा सांगत असतात. "जीं दोन सैन्यें परस्पराशीं लढलीं त्यांमध्यें तुह्मास पूर्वीं एक चमत्कार दाखविला होता. एक सैन्य तर आल्लाच्या खऱ्या धर्माकरितां लढलें, परंतु दुसरें अविश्वासी होतें. त्यांनीं आपल्या डोळ्यांनीं आपल्यापेक्षां विश्वासणारे दुप्पट असे पाहिले; कारण कीं ईश्वर ज्यावर त्याची मर्जी झाली त्यास आपल्या सहायाकडून बळाविती." (सुरा ३. सुरा इमरान आय. १३). मोसलेम सैन्य जें होतें त्याच्या दुप्पट काफर लोकांच्या नजरेस पडलें. या चमत्काराखेरीज ह्या आठवण धरण्याजोग्या प्रसंगीं अणखी दोन चमत्कार घडले ह्मणून ह्मटलें आहे. एक असा कीं जी रेती महमदानें उधळली ती ईश्वरी सामर्थ्येंकरून अशी जोरानें शत्रूच्या मुखास लागली कीं त्यांनीं तात्काळ पाठ फिरवून पळ काढिला." ह्मणून तुम्ही त्यास मारिलें नाहीं पण देवानें मारिलें आणि त्या वेळेस जी रेती फेंकली होती ती त्वां फेंकलीस असें नाहीं पण देवानें फेंकली." (सुरा ८ सुरा अनफाल आय १७.) दु-

सरा असा कीं पहिल्यापहील ईश्वरानें महमदाचें सहाय करण्यासाठीं एक हजार आणि नंतर तीन हजार दूत पाठविले. त्या दूतांचीं शिरें पांढऱ्या व पिंवळ्या फेट्यांनीं शृंगारित असतां त्यांचे संबले त्यांच्या पाठीवर लोंबत होते. आणि हे आकाशांतील मदतगार स्वार काळ्या पांढऱ्या घोड्यांवर बसून आले. आणि ह्यांचा पुढारी गाब्रीएल दूत आपल्या हैजूम वारूवर बसून अघाडीस चालला होता. जरी महमदाचीं माणसें शौर्यानें लढलीं आणि ईश्वरी सूचना आल्यापूर्वी ह्या जयाचा अवघा मान त्यांनीं आपणास घेतला होता तरी कोरेश लोकांचा पराभव वास्तविक दूतांनीं केला होता. आणि देवानें बेदरच्या लढाईत तुमची मदत केली होती, तेव्हां तुह्मी अशक्त होतां, याकरितां देवाला भ्या आणि त्याचे उपकार माना. जेव्हां तूं मुसलमानांस ह्मणूं लागलास कीं तुमच्या प्रभूनें तुह्मांस मदत पाठविली तेव्हां हें पुरें नव्हतें काय? आकाशांतून तीन हजार दूत पाठविले. निश्चयें जर तुह्मी टिकून राहतां आणि जेव्हां जेव्हां ते तुह्मावर अकस्मात येतात तेव्हां तेव्हां त्यांचें भय धरितां तर पांच हजार दूत जे आपल्या घोड्यांवर बसले आहेत त्यांची मदत तुमचा प्रभु तुह्मास पाठवील." ( सुरा ३. सुरा इमरान आय. १२३–१२९).

ह्या गोष्टीनंतर कांहीं दिवसांनीं महमदानें काआब वल्लद अल आश्रफ नामें एका यहूदी माणसाचा दग्यानें घात केला यावरून त्याचा खुनसीपणा उघडकीस आला.

ह्या मनुष्याचें महमदाशीं हाड वैर होतें आणि तो कविता करण्यांत निपुण असतां बेदरची लढाई झाल्यावर मक्केस गेला आणि धर्मभ्रष्ट पैगंबर आपल्या लुटणाऱ्या टोळीसुद्धां लढत असतां कोरेश लोकांचे भाऊबंद कसे दुर्दैवानें रणांगणीं पडले याविषयींचें मनांत रुतण्याजोगें कवन करून सूड उगविण्यासाठीं त्यांस प्रवृत्त केलें.

नंतर तो मदिनेस परतला आणि तीं कवनें त्या नगरांत देखील त्यानें ह्मणून दाखविलीं. हा कवी वेड्यावाणी धिटाई करितो ह्मणजे अशी निंदा करितांना आपण निर्भय राहूं असें मानितो हें पाहून महमदाची तळ्याची आग मस्तकास इतकी चढली कीं तो ह्मणाला, "ह्या अल आश्राफाच्या पुत्रापासून मला कोण सोडवील?" तेव्हां कोणीएक महमदाचा नामधारी मोसलामाचा पुत्र, जो आपल्या धन्याच्या कामांत तत्पर असा होता तो उत्तर देऊन बोलला कीं, "हे देवाच्या पैगंबरा, मी तुझी सुटका त्यापासून करीन." कांहीं दिवसांनंतर काआब हा महमदाच्या एका शिष्याचें आगतस्वागत करीत असतां वधिला गेला.

त्या देशांत अनेक धर्मांतील भक्तांचा असा सांप्रदाय होता कीं नभोमंडळांतील कोणीएका नियमित ठिकाणाकडे भक्ति करितांना आपलें मुख वळवावें. यहुदी तर यरूशालेमाकडे वळत असत. अरबी लोक मक्केकडे, साबी उत्तर ध्रुवाकडे, पारसी पूर्वेकडे. याप्रमाणें आपलीं तोंडें

करून करीत असत. महमदानें प्रथम आपल्या शिष्यांस सांगितलें कीं कोणत्याही दिशेकडे तोंड करून नमाज करण्यास कांहीं हरकत नाहीं. "पूर्व व पश्चिम हीं परमेश्वराचीं आहेत; यास्तव तुह्मी नमाज करण्यास जिकडे कोठें आपलें तोंड फिरवाल तिकडे परमेश्वर समक्ष आहे, कारण-परमेश्वर सर्वसाक्षी व सर्वज्ञ आहे ( सुरा बकर. आयत ११९). यरूशालेमाकडे तोंड करून नमाज करण्यास त्यानें सांगितलें, कारण तें पवित्र नगर, भविष्यभाष्याचें स्थान असें होतें. परंतु साहा सात महिन्यांनीं त्यानें आपला नेम बदलला, आणि तेव्हांपासून सर्वांनीं मक्केकडे तोंड करून नमाज करण्याविषयीं हुकूम केला. आजतागाईत तो विधि चालत आला आहे.

महमदानें पहिल्यापहील यरूशलेमाकडे तोंड करून नमाज करण्यास लाविलें त्यांत त्याचा काय हेतु होता असें जर पुसलें तर यहूदी लोकांची मर्जी संपादावी असा हेतु होता ह्मणून दिसून येतें. परंतु ते आपल्या यहूदी धर्मावर पराकाष्ठेची निष्ठा ठेवितात असें जेव्हां त्यास पुरतें समजलें, आणि त्यांस इस्लामाच्या धर्मात वळविण्याविषयीं आपल्या सर्व फुसलावण्या व आर्जवी भाषणें व्यर्थ गेलीं असें त्याच्या लक्षांत आलें, तेव्हां त्याच्या मनोवृत्तींत मोठा पालट होऊन तो त्यांचा दुर्धर वैरी असा झाला, आणि तसाच आपल्या अंतकालपर्यंत त्यांशीं वैरभाव धरीत गेला. मदिनेंत कैनोका नामें एक यहूदी कूळ राहत होतें,

तें त्या नगराचें वतनदार होतें. एका दिवशीं त्यांजमध्यें कांहीं गडबड झाली, हा प्रसंग पाहून महमदानें त्या लोकांकडे निरोप पाठविला कीं तुह्मी हा धर्म अंगिकारा, नाहीं तर युद्धास तयार व्हा. ते भयाभित यहूदी उत्तर देतां बोलले कीं, "हाय हाय, आह्मांला हत्यार धरण्याचें ठाऊक नाहीं, तरी आपल्या वाडवडिलांच्या धर्मांत टिकून राहतों; तर खरेपण रक्षणार्थ आह्मीं लढलें पाहिजे असा जुलूम आह्मांवर कां करितोस ? यावरून एक लढाई पंधरा दिवसपर्यंत होऊन तींत यहूदी लोकांचा पराभव झाला. महमद तर त्या सर्वांचा वध करण्यास सिद्ध होता, पण याच्या मदतगारांनीं भीड खर्चिल्यावरून त्यानें त्या पाडावांस जीवदान दिल्हें. त्यांची मालमत्ता जप्त केली गेली. त्यांचीं हातेरें मुसलमानांनीं आपल्यांत वांटून घेतलीं आणि ते संख्येनें ७०० असामी असतां त्यांच्या बायका लेंकरांसुद्धां त्यांस देशपार केलें. पुढें देशांच्या लढाईमध्यें कोरैधांतलि यहुदी कूळ कोरेश लोकांस सामील झाल्यावरून महमदानें त्यांचा दावा धरिला. यहूदी लोकांनीं पंचवीस दिवस त्यांशीं लढाई केल्यावर महमदानें त्याजवर एवढा बलात्कार केला कीं ते बिनकरारी त्याच्या स्वाधीन झाले. ते मदिनेंतील आपल्या पुरातन मित्राच्या भरवश्यावर राहिले आणि याविषयीं एका सन्मान्य ह्यातान्यानें आमचा निवाडा करावा असें त्यांनीं मागितलें. परंतु त्यानेंच यांस मरणदंड ठरविला. सातशें यहूदी लोकांच्या पायांत बेड्या

घालून त्यांस नगरांतील बाजारांत चालवीत नेलें आणि तेथें एक गर्त्ता त्यांच्यासाठीं तयार केली असतां त्यांस बळजोरीनें तींत उतरविलें. जोंपर्यंत हा वध होत होता तोंपर्यंत हा नांवाचा पैगंबर बाजूस उभा राहून एकसारिखें टक लावून हें अघोर कृत्य अवलोकन करीत राहिला. त्यानें त्यांच्या बायका व लेंकरें पाडाव करून घेतलीं, व त्यांचीं घरें व जमिनी मदिनेंत पळून आलेल्यांस दिल्ह्या; आणि हातेरें तर विजयी सैन्यास देऊन टाकिलीं. पाडाव केलेल्या स्त्रियांमधील रिहाना नामें अत्यंत सुंदर स्त्रीला महमदानें मोठा आयास करून आपल्या धर्मांत आणिलें आणि त्यानें तिला आपल्यासाठीं ठेविलें. त्यानें पूर्वीं अबुबेकराची आयेशा नामें कन्या व जामाची सवदा नामें कन्या अशा दोन लग्नाच्या बायका केल्या होत्या.

बेदरच्या पराभवामध्यें त्या काफल्याचा पाठीवा जो अबुसोफियन होता त्यानें इराक प्रांताच्या पूर्वेकडून फेरी करून सुरीयाकडे दुसऱ्यानें जाण्याचा निश्चय केला. जे उदमी त्यांच्या संगतीं होते त्यांजपाशीं पुष्कळ ऐवज होता त्यांची वाट मारावी ह्मणून महमदानें जेईदाबरोबर पांचशें स्वार देऊन त्यांजवर पाठविले. त्याला ती लूट प्राप्त झाली असतां ती घेऊन तो मदिनेस परत आला. महमदानें त्या लुटीचा पांचवा हिस्सा घेऊन बाकीचा ऐवज लुटणाऱ्यांस वांटून दिल्हा.

पुढल्या वर्षी कोरेश लोकांनीं तीन हजार सैन्य पाठविलें, त्यांत दोनशें स्वार आणि सातशें कवचधारी मनुष्यें होतीं. त्यांचा सेनापति आबुसोफियन होता आणि त्याची बायको हेंदा ही त्याच्या संगतीं गेली. त्यांनीं मदिनेपासून तीन कोसांवर धूचौलैफा नामें गांवापाशीं तळ धरिला. आणि पिछाडीस आपल्या मनुष्यांतील पन्नास मोठे शूर तिरंदाज ठेवून त्यांस ताकीद केली कीं आपले जाणें सहसा सोडूं नये. शत्रु सैन्यांत उजव्या तर्फेस खालेद सरदार होता, डावीकडे अक्रेमा, मध्यभागीं आबुसोफियन, आणि राखून ठेवलेल्या तुकडीवर हेंदा ही सरदारीण होती. अणखीही दुसऱ्या पंधरा नायकिणी होत्या. त्या तंबूर वाजविण्यानें बेदरास जे त्यांचे देशस्थ पडले त्यांविषयीं शोक करण्यानें, आणि "धैर्य धरा, अब्दुल दुराच्या शूर पुत्रांनो, धैर्य धरा," असें वारंवार पुकारण्यानें त्या सैन्यास उत्तेजन देत असत. पहिली उठावणी तर महमदानें केली तेव्हां त्याच्या सैन्यानें कोरेश सैन्याच्या मधोमध मुसळी देऊन त्यांस पळविलें. त्यांचा मुख्य निशाणदार तर मारला गेला आणि त्यांची मोठी दाणादाण झाली. परंतु ह्या तिरंदाजांनीं लुटीसाठीं उतावळें होऊन आपलें ठाणें सोडलें. यावरून खालेद आपल्या स्वारांसुद्धां त्यांच्या पिछाडीस आला, आणि त्यानें "महमद मारला गेला"असें ओरडतांना मोसलेम सैन्यास मागें हटविलें. त्यास पुन्हा सावरण्याविषयीं महमदाचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. त्याचा

जाव तर थोडक्यावरून चुकला होता. त्याचा चुलता हमजा आणि त्याचा निशाणदार मुसीब हे ठार मारले गेले. आणि अबुबेकर, ओमार आणि ओथमान हे घायाळ झाले. हे घायाळ झालेले योद्धे अशा सिताफीनें मागच्या मार्गे निघून गेले कीं अबुसोफियनाच्या हातीं ह्या जयांत कांहींच लागलें नाहीं; परंतु पुढल्या वर्षी मी तुला भेटेन असें महमदापासून वचन मात्र मिळालें. ह्या पराभव झाल्यावरून महमदाचे अनुसारी संतप्त झाले. कोणी कोणी तर हा आपला पुढारी खोटा पैगंबर आहे अशी त्याची निंदा केली. दुसरे तर आपले नातलग गमावल्यावरून क्रोधाक्रांत झाले.

त्यांचें सांतवन करण्यासाठीं महमदानें त्याच्या नुकसानीचा दोष जे त्या लढाईत होते त्यांतून कित्येकांवर घातला. आणि जे रणीं पडले त्यांच्या दैवीं ईश्वरानें जें घातलें तें टळणार नाहीं, ते सत्य धर्मामुळें मरण पावले असतां सौख्यस्थानीं नेले आहेत असें त्यानें त्यांस निर्धारानें सांगितलें. कुरानांतील हीं पुढील वचनें त्या प्रसंगीं दिल्हीं गेलीं. असें ह्मटलें आहे, "ज्यांनीं आपला देश सोडिला आणि जे आपल्या घरांतून बाहेर घालविले गेले आणि माझ्यामुळें ज्यांनीं सोसिलें व जे लढाईत मरण पावले आहेत, निश्चयें मी त्यांचीं दुष्कर्मे निरसन करीन आणि मी त्यांस ज्या बागाला नद्यांकडून पुरवठा आहे त्यांत नेईन. ही देवापासून, आणि देवासहित जी देणगी

ती अति उत्तम देणगी आहे. देशांतील अविश्वास्यांचा समृद्ध व्यवहार तुला न फसवो. हा तर क्षणभंगुर संग्रह आहे आणि मग नरकांत त्याची फेड दिल्ही जाणार आहे; ती तर इंगळांचें अंथरूण अशी आहे. परंतु जे आपल्या प्रभूचें भय धरितात त्यांस ज्या बागांतून नद्या वाहतात ते प्राप्त होतील. ते त्यांत निरंतर राहतील हें देवाचें वरदान आहे. कारण कीं क्षणभंगुर जगीक ताले-वारीपेक्षां जें देवापाशीं आहे तें नीतिमानासाठीं अधिक उत्तम आहे. हे खऱ्या विश्वासू, सहनता धर आणि ती वाढविण्यास प्रयत्न कर. आणि स्थिर बुद्धि धर आणि ईश्वराला भी ह्मणजे तूं धन्य होशील." (सुरा इमरान आ-य, १९९ – २०० ).

ह्या पराभवावरून जो मनोभंग झाला तो दूर करावा ह्मणून महमदानें उमीया नामें एका मोठ्या वजनदार मनुष्यांची हेंद कन्या बायको करून घेतली; ती विधवा होती; ती आपल्या नवऱ्यासहित हाबशी देशांत जे परा-गंदा झालेले त्यांतील होती. ती अठ्ठावीस वर्षांची होती. तिला एक पुत्र सालमा नामें होता त्यावरून तिला उम-सालमा ह्मणजे सालमाची आई असें ह्मणत असत. ती विशेष सुंदर असतां अबुबेकरानें व उमर यानें तिला बा-यको करून घेण्यास पाहिलें पण साध्य झालें नाहीं. महमदाला देखील पहिल्यानें अडचण पडली होती. ती ह्मणाली, "आहाहा देवाच्या पैगंबराला मनपासून काय

सुखोत्पति होणार बरें! मी तर एक तरुण नाहीं. तशांत मला एक पुत्र आहे. आणि मी परस्त्रीशंकित आहें." महमदानें प्रत्युत्तर केलें, "तुझ्या वयाविषयीं ह्मटलें तर तूं मजपेक्षां फार धाकटी आहेस; तुझ्या पुत्राविषयीं तर मी त्याचा बाप असा होईन; तुझ्या संशययुक्त स्वभावाविषयीं तर आल्लानें तो समूळ काढून टाकावा अशी मी नित्याची प्रार्थना करीन."

मुसलमान लोकांच्या इतिहासांत हिजरा शकाच्या चवथ्या वर्षी ज्या असादी कुळांतील लुटारूंनीं मदिनेच्या प्रदेशांत स्वारी करण्याविषयीं धाक घातला होता त्यांच्या टोळीचा मोड करण्याविषयींचा मजकूर आहे. महमदानें आपलीं खासगीचीं पन्नास माणसें अगोदर त्यांच्या प्रदेशीं पाठवून त्यांस येऊं दिल्हें नाहीं. ह्या माणसांस अशी मातबर लूट मिळाली कीं मेंढरांचे कित्येक कळप खेरीज करून प्रत्येक माणसाच्या सात सात उंट वांटणीस आले. सोफियन खालेब याचा वध करावा ह्मणून महमदानें भूल महद्रत याला अखत्यार दिल्यावरून त्यानें त्याला मारिलें आणि महमदानें त्याला सन्मानाची निशानी ह्मणजे आपण जी काठी वागवीत असे ती त्याला इनाम दिल्ही. भूल महद्रत याला ती काठी इतकी विशेष वाटली कीं कधींही तो तिला विसंबला नाहीं. आणि तो मेला तेव्हां ती काठी त्यासहित खांचेंत पुरली होती. लोकांची श्रद्धा आपणावर बसविण्याविषयीं मह-

ती अति उत्तम देणगी आहे. देशांतील अविश्वास्यांचा समृद्ध व्यवहार तुला न फसवो. हा तर क्षणभंगुर संग्रह आहे आणि मग नरकांत त्याची फेड दिल्ही जाणार आहे; ती तर इंगळांचें अंथरूण अशी आहे. परंतु जे आपल्या प्रभूचें भय धरितात त्यांस ज्या बागांतून नद्या वाहतात ते प्राप्त होतील. ते त्यांत निरंतर राहतील हें देवाचें वरदान आहे. कारण कीं क्षणभंगुर जगीक तालेवारीपेक्षां जें देवापाशीं आहे तें नीतिमानासाठीं अधिक उत्तम आहे. हे खऱ्या विश्वासू, सहनता धर आणि ती वाढविण्यास प्रयत्न कर. आणि स्थिर बुद्धि धर आणि ईश्वराला भी ह्मणजे तूं धन्य होशील." (सुरा इमरान आय. १९९ – २०० ).

ह्या पराभवावरून जो मनोभंग झाला तो दूर करावा ह्मणून महमदानें उमीया नामें एका मोठ्या वजनदार मनुष्यांची हेंद कन्या बायको करून घेतली; ती विधवा होती; ती आपल्या नवऱ्यासहित हाबशी देशांत जे परागंदा झालेले त्यांतील होती. ती अठ्ठावीस वर्षांची होती. तिला एक पुत्र सालमा नामें होता त्यावरून तिला उमसालमा ह्मणजे सालमाची आई असें ह्मणत असत. ती विशेष सुंदर असतां अबुबेकरानें व उमर यानें तिला बायको करून घेण्यास पाहिलें पण साध्य झालें नाहीं. महमदाला देखील पहिल्यानें अडचण पडली होती. ती ह्मणाली, "आहाहा देवाच्या पैगंबराला मजपासून काय

सुखोत्पत्ति होणार बरें! मी तर एक तरुण नाहीं. तशांत मला एक पुत्र आहे. आणि मी परस्त्रीशंकित आहें." महमदानें प्रत्युत्तर केलें, "तुझ्या वयाविषयीं ह्मटलें तर तूं मजपेक्षां फार धाकटी आहेस; तुझ्या पुत्राविषयीं तर मी त्याचा बाप असा होईन; तुझ्या संशययुक्त स्वभावाविषयीं तर आल्लानें तो समूळ काढून टाकावा अशी मी नित्याची प्रार्थना करीन."

मुसलमान लोकांच्या इतिहासांत हिजरा शकाच्या चवथ्या वर्षी ज्या असादी कुळांतील लुटारूनीं मदिनेच्या प्रदेशांत स्वारी करण्याविषयीं धाक घातला होता त्यांच्या टोळीचा मोड करण्याविषयींचा मजकूर आहे. महमदानें आपलीं खासगीचीं पन्नास माणसें अगोदर त्यांच्या प्रदेशीं पाठवून त्यांस येऊं दिल्हें नाहीं. ह्या माणसांस अशी मातब्बर लूट मिळाली कीं मेंढरांचे कित्येक कळप खेरीज करून प्रत्येक माणसाच्या सात सात उंट वांटणीस आले. सोफियन खालेब याचा वध करावा ह्मणून महमदानें धूल महद्रत याला अख्त्यार दिल्यावरून त्यानें त्याला मारिलें आणि महमदानें त्याला सन्मानाची निशानी ह्मणजे आपण जी काठी वागवीत असे ती त्याला इनाम दिल्ही. धूल महद्रत याला ती काठी इतकी विशेष वाटली कीं कधींही तो तिला विसंबला नाहीं. आणि तो मेला तेव्हां ती काठी त्यासहित खांचेंत पुरली होती. लोकांची श्रद्धा आपणावर बसविण्याविषयीं मह-

मदाला कठीण गेलें नाहीं. एक खुनी दुसऱ्या खुन्यास त्याच्या अपराधाकरितां आपली हातीं धरण्याची काठी इनाम अशी देतो ह्मणजे त्याची जन्मभर श्रद्धा झाली. दुसराही दगा करून खून करण्याचा प्रयत्न केला होता परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. महमदानें आमजू आणि दुसरा एक मनुष्य यांस मक्केस जाऊन अबुसोफियनाचा नाश करण्यासाठीं मदिनेहून पाठविलें होतें, परंतु त्याचा बेत फुटल्यावरून त्यांस पळून जाणें प्राप्त झालें.

एथल व अलफाऊन ह्या गांवांनीं आपले मुत्सद्दी महमदाकडे मदिनेस पाठवून मागितलें कीं तुमच्या धर्माची आह्मांला माहिती करून देण्यासाठीं शिक्षकांस पाठवावें. यावरून अलराजी नामें एका झऱ्यापाशीं साहा शिक्षक येऊन पोहंचले असतां त्यांजवर त्या मुत्सद्यांनीं हल्ला करून तिघांस जिवें मारिलें आणि वरकडांस कैद करून नेलें. त्यांतील एक चुकांडी देऊन जाण्यास प्रयत्न करीत होता ह्मणून धोंडमार करून त्याचा जीव घेतला. दुसरे दोघे जण कोरेश लोकांला दासपणांत विकत दिल्हे. त्यांनीं मक्केंत आल्यावर त्या उभयतांस जिवें मारिलें. याप्रमाणेंच दुसऱ्याही सत्तर शिक्षकांची दशा झाली. त्यांस नेदजेद याच्या प्रांतांत पाठविलें होतें. हा डोंगरवट प्रदेश आहे व तो कित्येक फिरणाऱ्या कुळांचें स्थान आहे. ज्या राजाकडे त्यांस शिफारस करून पाठविलें होतें त्यानेच त्यांतील एकुणहत्तर असामींस तरवारीनें मारिलें आणि केवळ एकच निभावला.

ज्या वर्षीं ही गोष्ट घडली त्या वर्षीं जुगार खेळणें व द्राक्षारस पिणें हें महमदाच्या शिष्यांनीं वर्ज करावें ह्मणून बनावटी हुकूम आला होता. द्राक्षरसाची मनाई करण्याचें वास्तविक कारण येणेंप्रमाणें झालें होतें. हा पैगंबर एका दुपारीं आपल्या मित्राच्या घरीं गेला होता तेव्हां तेथें लग्नाच्या समारंभांत वऱ्हाडी व आमंत्रित मिळून उत्साह करीत होते. परंतु त्याच घरीं तो दुसऱ्या दिवशीं गेला होता तेव्हां जमिनविर रक्त व छिन्नभिन्न अवयव इकडे तिकडे पडलेले असे त्याच्या दृष्टीस पडले. त्याचें कारण त्यास कळलें कीं मेजवानींत लोक द्राक्षारस पिऊन मस्त झाले ह्मणून असा अनर्थ घडला. त्या मनाईवरून बहुतेक त्या वेळचे लोक महमदाला अनुसरण्याला नाखुष झाले. तथापि दुसरे जे द्राक्षारस प्रकृतीस व नीतीस बाधक आहे असें समजून त्यापासून दूर राहिले ते ह्याच मनाईवरून महमदाला अनुसरण्यास प्रवृत्त झाले.

अबुसोफियनाला बेदर एथें भेटण्याविषयींचा जो करार केला होता त्याचें विस्मरण झालें नाहीं. महमद त्या ठिकाणीं जाऊन आठ दिवस राहिला. अबुसोफियन तर त्याला भेटायास निघाला खरें, पण अशू अल तरीक एथें किंवा मखाबा एथें पोंहचल्यावर त्याचें धैर्य खचलें आणि तो माघारा घरीं गेला. महमदानें त्याच्या भित्रेपणाविषयीं असें सांगितलें कीं देवाच्या धमकावण्यानें तो मागें फिरला.

सुरीयाच्या सीमेवर दौमत अलजांदाल नामें एक गांव

कित्येक रानटी अरब लोकांकडे होतें. ते अरब जवळच्या प्रांतांला त्रास देत व त्या वाटेनें जे वाटसरू जात त्यांस लुटीत असत. ह्या लुटारूंवर महमदानें हजार मनुष्यांनिशीं स्वारी केली. तो तेथें पोंहचतांच त्या लोकांनीं तें गांव सोडून दिल्हें, आणि महमद बहुत लूट घेऊन परत आला.

ह्याच वर्षीं ज्या शत्रूंला महमदानें उपद्रव दिल्हा होता त्यांनीं त्यावरून मोठा कट केला होता. मक्केंतील कोरेश लोक, नेदजेद यांतील घातफानी कूळ आणि नादीर व कोरैधा यांतील यहूदी यांनीं बारा हजार मनुष्यांनिशीं मदिनेला वेढा घातला. इकडे त्यांच्या येण्यापूर्वीं महमदानें नगराभोंवता खोल खंदक करून त्याच्या संरक्षणार्थ तीन हजार मनुष्य जमा केले. घातफानी लोकांनीं पूर्वेकडे खोऱ्यांत वरल्या बाजूवर ठाणें धरिलें. आणि कोरेशांनीं पश्चिमेस खालच्या बाजूवर धरिलें. असें असतां त्या नगराच्या रक्षकांवर तीरांचा व गोफणगुंड्यांचा भडिमार केला. त्यांच्या डेरेराहोट्या वादळानें उलटल्या गेल्या. तेथें बहुत चमत्कार घडले, ह्मणून मुसलमानांनीं लिहिलें आहे. वेढा घालणाऱ्यांमध्यें कलह लावून फुटाफूट व्हावी असें महमदाच्या हातीं उपाय होते असें प्रमाण आहे. मुख्य स्वार सरदारांतील एक आम्रू यानें खंदक मोर्च्यावर चढून जाऊन मोसलेमांतील मुख्यानें येऊन मजशीं लढावें ह्मणून बोलाविलें. आलीनें आपल्या चुलत्याचें युद्धामंत्रण स्वीकारिलें असतां आम्रू त्याला ह्मणाला, "हे पु-

तण्या, तुला मारिलें असतां मला केवढी खुशाली वाटेल?" आलीनें प्रत्युत्तर केलें, "नाहीं काका, ज्याला मोठी खुशाली होईल तो मीच तुह्माला मारण्यांत." ते उभयतांही घोड्यांवरून खालीं उतरले. त्यांनीं लढाईत धूळ उधळिल्यावरून ते दिसेनासे झाले, केवळ तरवारींची चकमक मात्र कानीं पडली. धूळ शमली तेव्हां आली आपल्या चुलत्याच्या छातीवर गुडघे रोंवून त्याची नरडी कापतांना दृष्टीस पडला. मग त्यानें दुसऱ्या शत्रूसही ऊर्ध्वपंथास धाडिलें. आणि तिसऱ्यास तर माघारें पिटवून लाविलें. शत्रुसैन्य तर थकलें, त्यांचा हिरमोड झाला, त्यांची फुटाफूट झाली. असें असतां पहिल्यानें कोरेश लोक आणि मग घाफतानी लोक यांचा भयाभंग होऊन त्यांनीं वेढा उठविला, आणि थेट मक्केचा रस्ता धरिला. त्यांचें मागें हटण्याविषयीं महमदाला वर्तमान कळलें असतां तो बोलला, "पूर्व वाऱ्याच्या योगानें मला हा जय प्राप्त झाला आहे."

ह्या प्रसंगीं कोरैधांतील यहूद्यांचें कसकसें पारिपत्य केलें हें तर मागेंच सांगितलें आहे.

ही तर खंदकाची लढाई किंवा राष्ट्रांची लढाई होती अशी जी मुसलमान लेखकांनीं नामांकित मानिली ती हीच आहे. कुराणाचा तेहतीसावा "अहजाब" या नामें जो सुरा तो याजविषयींच आहे. 'अहो विश्वासणाऱ्यांनो, तुह्मांवर फौजा आल्या तेव्हां आल्लाची कृपा तुह्मांवर झा-

ली तिची आठवण करा. मग त्याजवर वारा आणि ज्या फौजा तुह्मी पाहिल्या नाहींत त्यांस आह्मीं पाठविलें. आणि जें कांहीं तुह्मी केलें तें आल्लानें पाहिलें आहे. जेव्हां ते तुह्मांवर वरच्या बाजूनें व खालून आले आणि तुमचे डोळे तळमळूं लागले आणि प्राण कंठास आले आणि आल्ला-विषयीं तुह्मी भलभलत्या कल्पना कल्पूं लागलां * * * जो आल्लाची व शेवटल्या दिवसाची आशा धरितो आणि आल्लाची आठवण बहुत वेळ करितो त्याला रसूल चांगला नमुना झाला आहे. ईश्वरानें अविश्वास्याला त्यांच्याच रागें भरण्यांत फिरवून लाविलें. त्यांच्या हातीं कांहीं भलेपण लागलें नाहीं. आणि मुसलमानांची लढाई आल्लानें उचलून घेतली आणि आल्ला शक्तिमान व पराक्रमी आहे." (सुरा अहजाब. आय. ९–११.२१, इ.)

आठवण असेल कीं महमदाचा दुसरा शिष्य त्याचा चाकर जेईद हा होता. तो हा नवा धर्म अंगीकारण्यावरून आपल्या धन्याच्या दासपणांतून मुक्त झाला. त्याला लहानपणीं फिरस्त्या अरबी लोकांच्या टोळीनें उचलून नेऊन महमदाला किंवा कादिजाला विकत दिल्हें होतें. कांहीं वर्षें गेल्यावर तो मक्केंत आहे असें त्याच्या बापाला थांग लागल्यावरून तो त्या नगरांत गेला आणि त्याची सुटका करण्यासाठीं मोठी रकम सादर केली. पण मी आपल्या धन्याला सोडायाचा नाहीं असें जेईदानें ह्मटल्यावरून महमदानें त्याला हातीं धरून काआबाच्या

काळ्या पाषाणाकडे नेलें आणि तो माझा पुत्र व वारीसदार आहे असें प्रसिद्धपणें त्याला अंगिकारिलें. ह्या दत्तविधानाला तो बाप राजी झाला आणि तेव्हांपासून जेईद हा महमदाचा पुत्र असा लोकांस माहीत झाला. नवा धर्म स्थापन केल्यावर त्यानें त्याला जैनाब ( महमदाची चुलत बहीण ) ही बायको करून दिल्ही, तिजबरोबर तो कित्येक वर्षें सुखानें राहिला.

आह्मी ज्या वर्षाची हकिकत पाहत आहों त्या वर्षी महमदानें जेईदाच्या बायकोविषयीं लंपट होऊन समारंभानें तिशीं लग्न लाविलें. सर्व प्रकारचे अरबी मोलवान भक्ष्य पदार्थ मेजवानींत केले होते, तींत स्त्रीपुरुषांस आमंत्रण केलें असतां मोठा समुदाय मिळाला होता. ह्या लग्नावरून महमदाचे बहुतेक शिष्य आपल्या मनांत डचकले. ही नवरी तर त्यांच्या लेखीं केवळ महमदाची सूनच होती. हे संशय दूर करण्याकरितां महमदानें कुराणाच्या तेहतिसाव्या सुऱ्यांत दुर्बुद्धीनें याप्रमाणें ह्मटलें.–

"जेव्हां ईश्वर आणि त्याचा रसूल हे कांहीं गोष्ट ठरवितात तेव्हां आपल्या गोष्टीविषयीं ठरविण्याचा अखत्यार कोणी विश्वासणारा पुरुष किंवा स्त्री यांस नाहीं. आणि जो कोणी ईश्वराची आणि त्याच्या पैगंबराची अवज्ञा करितो तो उघड भ्रांतीनें वाट चुकला आहे. आणि ज्याजवर ईश्वरानें कृपा केली व त्वांही कृपा केली त्यास जेव्हां तूं बोलूं लागलास 'आपल्या बायकोला तूं

आपल्यापाशीं राहूं दे आणि ईश्वराला भी,' आणि एक गोष्ट आपल्या मनांत लपवून ठेवीत होतास, जी ईश्वर प्रगट करायास पाहत आहे त्याची आठवण कर. आणि तूं लोकांस भीत होतास पण यापेक्षां त्वां ईश्वराला अधिक भ्यालें पाहिजे. मग जेईदाला आपल्या बायकोविषयीं नें सर्व ठरवायाचें होतें तें त्यानें ठरविलें. तेव्हां आह्मीं ती तुला लग्नानें दिल्ही आहे. तर सर्व जे मुसलमान, त्यांच्या दत्तपुत्राच्या बायकांविषयीं जें ठरवायाचें तें ठरविल्यावर त्यांशीं लग्न करितात त्यांस कांहीं दोष न लागावा ह्मणून असें करण्याविषयीं ईश्वराचा हुकूम आहे." ह्याच सुऱ्यामध्यें जितक्या पाहिजेत तितक्या बायका कराव्या अशी मुभा महमदाला दिल्ही आहे; ह्या कामांत कामातुरपण, ढोंग, धूर्तता किंवा ईश्वरनिंदा यांतून कोणता प्रकार सर्वांहून वाईट आहे हें कोणालाही फारकरून सांगतां येत नाहीं." (सुरा अहजाब. आय. ४६, ३७,४९,५०.)

ईश्वरी धर्माचें निमित्त करून अशी अन्यायाची त्यांत मिसळ करणें हें अंतःकरणाला त्रासदायक आहे. महमदी धर्म आणि सर्व अवांतर खोटे धर्म यांमध्यें मोठा संबंध आहे असें सहज लक्षांत येईल. सर्व खोटे धर्म ज्या दुर्वासनांला मोकळीक देतात त्यांचा सत्य धर्म प्रतिबंध करितो.

पुढील वर्षांत तर बहुत अरबी कुळांवर स्वाऱ्या केल्या

होत्या त्यांविषयीं फार सांगण्याची गरज नाहीं; तरी त्या स्वाऱ्यांमध्यें महमदाची वहिवाट कशी होती आणि आपले शिष्य पुढल्या वर्षांत विजय प्राप्त होण्यासाठीं त्यानें कसे तयार केले हें दिसून येईल. जेईदानें सत्तर मनुष्यांनिशीं एक मातबर काफला लुटला. मोसलेम लोकांस कान्स्तांतिनोपलच्या हिराक्लियस बादशाहापासून त्याच्या रयतेशीं व्यवहार करण्याची ज्या वकिलानें परवानगी मिळविली होती तो मदिनेस परत येतांना हिस्माच्या खोऱ्यांत अलहोरीद यानें त्याला लुटिलें. परंतु जेईदानें पांचशें मुसलमानांनिशीं त्या लुटाऱ्यांवर जाऊन त्याचा पुत्र आणि फारकरून त्याचीं सर्व माणसें यांसुद्धां त्याला जिवें मारिलें. ओरान्नी लोकांपैकीं आठ असामी यांनीं महमदाचा धर्म पत्करला आणि ते दुखण्यास पडले असतां त्यानें सांगितल्याप्रमाणें बरे झाले होते; मग त्यांनीं त्याच्या मेंढक्यांस मारिलें व त्याचे उंट चोरून नेले यावरून त्यांस मदिनेस आणविलें आणि लाल जरद तापविलेल्या लोखंडानें त्यांचे डोळे उपटून काढिले, त्यांचे हातपाय तोडून टाकिले आणि वधस्तंभावर मोठ्या दुःखानें त्यांस मारलें.

सुमारें ह्या वेळेस कित्येक खिस्ती अरबी यांनीं हा धर्म अंगिकारिला असें एक इतिहासक लिहितो. अब्दूल काहमान यानें जीं प्रमाणें दाखविलीं त्यांवरून दौमत अल जंदल नामें राजा वळला. आणि त्याचा कित्ता बहुतक-

रून त्याच्या सर्व प्रजेनें घेतला होता. जे सर्व आपल्या पूर्व धर्मांत टिकून राहिले त्यांजवर कर बसविला. ह्या यशस्वी उपदेशकानें त्या राजाच्या कन्येशीं लग्न केलें. आणि त्यांचा औरस पुत्र तर मदिनेमध्यें महमदी धर्माचा नामांकित शास्त्री झाला.

मुस्तलेकी नामें एक पराक्रमी कूळ यांनीं आपला सरदार अल हारेथ यासहवर्तमान मोसलेम लोकांवर हल्ला करण्यासाठीं मोठी जमात मिळविली. महमद त्याशीं अलमोरैसी याच्या मैदानांतील एका विहिरीजवळ भिडला. हें ठिकाण समुद्रापासून अडीच कोस व हास्फान यापासून दाहा कोस दूर आहे. अलहारेथाला एक तीर लागून तो मरण पावला. ह्या लढाईमध्यें महमदाला असा पूर्ण जय प्राप्त झाला कीं प्राचीन लोककथेंत याप्रमाणें गाजत आलें आहे कीं "त्याच्या पक्षीं गाब्रियेल प्रगट झाला होता. तो शुभ्र वस्त्रें परिधान केलेला असतां जो घोडा कधींही पाहण्यांत आला नाहीं अशावर स्वार झाला होता." जोवैरा नामें अलहारेथाची कन्या ही थाबेत याच्या वांट्यास आली परंतु महमद तिच्या सौंदर्याला मोहित झाल्यावरून त्यानें तिला त्यापासून विकत घेतलें आणि त्याच्या बायकांमध्यें तीही गणली गेली. ह्या लग्नानें त्या कुळाशीं जो संबंध झाला तो संबंध महमदाला मोठ्या फायद्याचा होता.

ह्या स्वारींत आयेशा ही आपल्या नवऱ्याबरोबर हो-

ली. मदिनेस परत येतांना सैन्याचा रात्रीं कूच झाला असतां मदिना तेथून फार लांब नव्हती, तेव्हां तिला आपल्या सांडणीवरून उतरण्याचें कारण पडलें होतें; आणि ती परतून सांडणीवर बसणार होती इतक्यांत आपला द्वाफर आरक्त पाषाणाचा हार गमावला आहे असें तिला समजलें ह्मणून त्याच्या शोधार्थ ती माघारी गेली. ती अंबारींत बसली आहे असें समजून सेवकांनीं ती अंबारी पुन्हा सांडणीवर ठेवून ते पुढें चालते झाले. इकडे ती परत त्या रस्त्यावर येऊन पाहती तों सांडणी नाहीं ह्मणून ती पुढल्या ठिकाणीं पायीं गेली पण कोणी भेटला नाहीं. मी नाहीं असें पाहून माझा शोध करीत ते लोक येतील असें समजून ती तेथेंच थांबली असतां झोंपीं गेली. सकाळीं महमदाचा एक सरदार साफवान याला ती अढळली. " आह्मी ईश्वराचे आहोंत आणि त्याकडेसच परत जाणार " हे शब्द हळू हळू बोलून त्यानें तिला जागें केलें. तिनें तोंडावरून बुरखा घेतला असतां त्यानें तिला आपल्या उंटावर बसवून त्या सैन्यास आटोपेपर्यंत तो बाजूनें पायीं चालत गेला. दुपार झाली असतां ती फार थकली होती.

ह्या गोष्टीवरून पंशागविष्ट लोकांमध्यें बिकल्प उठला. आणि त्यांतील कित्येकांनीं आयेशेवर आळ घेऊन तिचा नाश करण्याचा रंग आणिला. वाहेरील गोष्टीवरून आणि आयेशेनें जें सांगितलें त्यावरून महमदाला काय वाटलें

असेल तें वाटे, तथापि ममतेनें नाहीं तरी चातुर्यानें तिचें अब्रु बचावण्याविषयीं त्यानें आपली नेहमीची युक्ति योजिली. ह्मणजे बनावटी हुकूम प्रगट केला. “ ज्या लोकांनीं हें तुफान घेतलें ते तुमच्यांतील एक जमात आहे. हें तुमच्या वाईटासाठीं आहे असें नाहीं पण बऱ्यासाठीं आहे असें समजा. प्रत्येकाकडून जितका दोष घडला असेल त्याप्रमाणें त्याला मिळेल, आणि ज्यानें त्याचें मोठें ओझें उचललें आहे त्यास मोठी शिक्षा आहे.”(कुरान अ.२९४ सुरानूर आय. ११).

मक्केपासून महमद पळून गेल्याला साहा वर्षें झालीं असतां त्या नगराची शांतीनें भेट घ्यावी असा हेतु धरून चौदाशें मनुष्यांनिशीं तो तेथें पोहंचला. जेव्हां तो त्या पुण्यभूमीच्या मर्यादेवर अल्होदे वीरगा एथें पोहंचला तेव्हां कोरेश लोकांनीं त्याकडे निरोप पाठवून सांगितलें कीं तुह्माला मक्केंत आम्ही येऊं देत नाहीं याकरितां बळेंच आंत शिरावें असा त्यानें निश्चय केला. इकडे कोरेश लोक विरोध करण्याचा डौल दाखवीत असतां महमदानें ओथमानाला सल्याचें बोलणें लावण्याविषयीं पाठविलें. परंतु त्याला त्यांनीं कैद केलें. मक्केकर ऐंशीं माणसें हेरावयास पाठविलीं असतां धरलीं गेलीं, पण त्यांस महमदाजवळ आणिलें तेव्हां त्यानें त्यांस सोडून दिल्हें, यावरून उभय पक्षमध्यें तह झाला. तो रुहलाम। हिरिण्यांत कोरेश लोकांच्या वकिलांनीं मोठा

दुराग्रह धरिला. महमदानें आलीला सांगितलें कीं आरंभीं "बिस्मिलाः हि रहेमा निर्रहीम, " असें लिहावें. मक्केंतील मनुष्यांनीं "हे आल्ला, तुझ्या नामानें असा प्रारंभ करण्याविषयीं आग्रह धरिला होता. मग त्यानें आपणाला "महमद रसूल आल्ला" हें नांव घेतलें त्यावरून अर्थांतच त्यांनीं तकरार केली कीं, "जर आह्मी तुला रसूल आल्ला असें कबूल केलें असतें तर आल्लाकडून सहसा तुला अडथळा झाला नसता." प्रतिपक्षाच्या दुराग्रही भाषणाविषयीं महमद कांहीं आढेवेढे न घेतां मान्य झालां हें त्याच्या शिष्यांस बरें वाटलें नाहीं. याकरितां ते सम्मत देण्यास उशीरानें मान्य झाले. त्या तहनाम्यांतील हशाल असे कीं दाहा वर्षेपर्यंत हा तहनामा चालेल आणि पुढल्या वर्षी मक्केंतील देऊळ पाहण्यास महमदाला तीन दिवसांची परवानगी दिल्ही आहे.

महमदाची जी मानमान्यता त्याच्या शिष्यांकडून होई ती आर्वा जो थाकिफी यानें जें वर्णन केलें त्यावरून ध्यानांत येईल. याला मक्केपासून त्याच्या लष्कराकडे होदेबिगा एथें पाठविलें होतें. तो ह्मणतो, "मी इरानी राजाची सभा व रोमी बादशाहाची ही सभा पाहून चुकलों, पण महमदाची जशी मानमान्यता त्याचे सोबती करितात तसें कोणत्याही राजाची करितांना माझ्या पाहण्यांत आली नाहीं. नमाजाच्या पूर्वीं तो हातपाय धुतो तेव्हां ते धांवून त्याचें सांडलेलें पाणी तीर्थ असें घेतात. तो थुंकतो तेव्हां

तो त्याचा प्रसाद मानून ते चाटितात. त्याचा गळून पडलेला प्रत्येक केस ते परम नम्र बुद्धीनें जमा करितात."[७]
महमदाला आपल्या लोकांमध्यें जय प्राप्त झाल्यावरून धैर्य आलें असतां आसमंतातच्या राजांस आपल्या धर्मांत आणावें अशी त्यानें हिम्मत धरली. तो आपल्या कागदपत्रावर "महमद रसूल आल्ला," असा शिक्का मोर्तब करीत असे.

त्यानें पहिलें पत्र इरानी राजा खोस्रू याकडे पाठविलें होतें. खोस्रू नांवाअगोदर महमदानें आपलें नांव घातलें असें राजानें पाहून त्यानें त्या पत्राच्या चिंधाड्या केल्या आणि अति क्रोधाविष्ट होऊन त्या वकिलाला मावारें पाठविलें. महमदानें याविषयीं ऐकिलें असतां तो ह्मणाला, "ईश्वर त्याचें राज्य याचप्रमाणें फाडून टाकील."

हेराक्लियस बादशाहा सुरियांत असतां त्याकडे याच प्रकारचें पत्र दोजाइब्न कालैफा याच्या हातें पाठविलें होतें. त्यानें तें पत्र बाहेरील सर्व प्रकारच्या आदरानें घेतलें आणि देणगी देऊन त्या वकिलाची रवानगी केली. त्यावरून मुसलमान लोक ह्मणतात कीं, 'जर तो राजा आपल्या गादीविषयीं निर्भय असता तर अरबी धर्माचा स्वीकार करिता.' कोप्त लोकांच्या राजाला हेराक्लियसानें मिसराचा गवर्नर करून पाठविलें होतें, पारशी लोकांनीं कान्स्तांतिनोपलाला वेढा घातला त्या दिवसापासून त्यानें या प्रांताचा वसूल अटकावून ठेविला होता. महमदानें ज-

सें त्या बादशाहाकडे पत्र पाठविलें होतें त्याच मजकुराचें या राजाकडेही पाठविलें. मुकौकस हें त्या राजाचें नांव होतें. यानें तें पत्र मोठ्या आदरानें हृदयीं धरून ज्या हास्तिदंती करंड्यांत तो आपली मोतेंब ठेवीत असे त्यांत तें ठेविलें. त्यानें अनुकूळ उत्तरासहित चार मोलवान रत्नें व दोन कोप्त कन्या असा महमदाला नजराणा पाठविला. यांतील एक जी मरियाम ती महमदाचा पुत्र इब्राहीम त्याची आई होती. हाबसी लोकांचा राजा ज्यानें संकटाच्या वेळीं महमदाच्या अनुसाऱ्यांस फार मित्र-त्वानें अंगिकारिलें होतें त्यास यानें मोठें लांब पत्र पाठविलें. त्या राजाला तें पत्र पावल्यावर त्यानें तें आपल्या डोळ्यावर ठेविलें. मग सिंहासनावरून उठून नुसत्या भूमीवर बसला. अरबी पैगंबर धर्मावर माझा विश्वास आहे असें त्यानें बोलून तें पत्र हस्तिदंती संदुकेमध्यें ठेविलें आणि महमदाला नम्रतेचें व मान्यतेचें उत्तर पाठविलें.

याप्रमाणें दुसऱ्या कित्येकांस पत्रें पाठविलीं आणि त्यां-वरून भिन्न भिन्न परिणाम झाले.

कुरानांतील शेवटचे दोन सुरे हे आमच्या पैगंबरावर जादू चालविली होती तिच्या चमत्कारिक गोष्टीविषयीं आहेत असें मुसलमानी टीकाकार ह्मणतात. ते येणेंप्रमा-णें:— "तूं सांग, मी प्रभाताच्या प्रभुकडे आश्रयाकरितां आलों. अशासाठीं कीं प्रत्येक वस्तु जी त्यानें निर्माण

केली तिच्या बाधेपासून, व रात्र येती तेव्हां अंधाराच्या बाधेपासून व गांठीमध्यें फुंकणाऱ्या स्त्रियांच्या बाधेपासून आणि हेवायुक्त मनुष्य हेवा करितो तेव्हां त्याच्या बाधेपासून त्यानें मला सोडवावें." "तूं सांग, लोकांचा प्रभु, लोकांचा बादशाहा, लोकांचा पूज्यमान त्याच्या आश्रयाखालीं आलों, यासाठीं कीं जो कुजबुजतो व लपतो त्याच्या बाधेपासून आणि जो लोकांच्या अंतःकरणांत भूतें किंवा मनुष्यें यांकडून कुकल्पना भरितो त्यापासून राखावें" (सुरा फलक. आय. १-५. सुरा नास. आय. १-६ ). या वाक्यावर टीका अशी आहे कीं लोबीद नामें एका यहूदीनें आपल्या कन्येच्या सहायानें महमदाला जादू केली. म्हणजे त्यांनीं एका दोरीला अकरा गांठी मारून ती एका आडांत लपविली, त्यावरून महमद दुखण्यांत पडला. तेव्हां ईश्वरानें हा सुरा व दुसरा एक सुरा हे पाठविले. आणि यांचें काय करावें व ती दोरी कोठें लपविली याविषयीं हज्रत गाब्रीएल यानें त्याला कळविलें. तेव्हां त्यानें दाखविल्याप्रमाणें पैगंबरानें आलीला ती दोरी घेऊन ये म्हणून सांगितलें. ती आणिल्यावर पैगंबरानें तिजवर ह्या दोन सुऱ्यांचा जप केला आणि दरएक आयत जपल्याबरोबर एक गांठ सुटे. कारण कीं ह्या दोन सुऱ्यांचे अकरा आयते आहेत आणि जेव्हां अकरावी आयत संपली, तेव्हां तो तिच्या चेटकापासून अगदीं मुक्त झाला, अशी कथा आहे.

जरी महमदानें पूर्वींच्या सालीं आपल्या सोबत्यांस वचन दिल्हें होतें कीं, आपण आपल्या दाढ्या डोया मुंडवून मक्केंत जाऊं, तथापि त्यांस मक्केस जाऊं न देणें प्राप्त झालें. सदर्हू सांगितल्याप्रमाणें शिष्यांला आशाभंगाचा विसर पडावा व त्या यहूद्यांस जादुगिरीमुळें शिक्षा द्यावी म्हणून त्यानें त्यांस मदिनेपासून ईशान्येस साहा मजलांवर वाळवंटामध्यें खैबर नामें एका सुफल ठिकाणीं नेलें. ही जागा यहूद्यांची होती आणि तिच्या संरक्षणार्थ अनेक गढ्या होत्या. त्यांतून एक गढी महमदाच्या हातीं लवकरच लागली. तथापि अलकामूसची गढी जी एका उंच पहाडावर होती, व जींत त्या कुळाचा सर्व खजीना भरला होता, तिजपासून तो वारंवार जीवाच्या धोक्यानें हटविला गेला. अबूबेकरहि याचप्रमाणें हटविला गेला, तेव्हां ओमार यानें ती हस्तगत करण्याविषयीं प्रयत्न करून पाहिला पण सिद्धीस गेला नाहीं. सरशेवटीं आलीनें खैबर गढींतील माहाबि योद्ध्याची कत्तल करून ती हस्तगत केली. पाडाव लोकांमध्यें साफिजा ही होती. तिला महमदानें मुक्त करून तिशीं लग्न लाविलें. त्या गढींतील जितका खजीना सांपडला तितका त्या जिंकणाऱ्याच्या हातीं लागला. बाकीचा ऐवज कोठें लपविला तो दाखवावा म्हणून केनाना नामें किल्लेदाराला तसदी दिल्ही. परंतु त्यानें यहूदी स्थिरतेनें हें धन त्यांच्या हातीं न लागूं देतां आपला प्राण दिल्हा. दुसऱ्या गढ्या तर एकामागें एक

घतल्या गेल्या; आणि सरशेवटीं तें शहर त्यांच्या हस्तगत झालें. तेथील राहणाऱ्याला ताकीद दिल्ही गेली कीं तुह्मी मागल्या चालीप्रमाणें आपल्या शेतांची लागवड करावी पण अर्धें उत्पन्न मुसलमानांस देत जावें आणि मर्जीस येईल तेव्हां महमद तुह्मांस काढून देईल. या लढाईमध्यें दुसरीं शहरेंही हस्तगत झालीं आणि त्यांची लूट मिळाल्यावरून महमदाचे अनुसारी सधन झाले. त्यांचीं लढाऊ माणसें अनेक स्वाऱ्या करण्यासाठीं चहुंकडे पाठविलीं गेलीं आणि जे लोक जिंकले गेले त्यांनीं हा धर्म अंगीकारावा, नाहीं तर कर द्यावा असा त्यांजवर भार घातला. याप्रमाणें त्यांचा अधिकार व धर्म अरबस्थानामध्यें लवकर वाढत गेला.

गतवर्षींच्या तहनाम्याप्रमाणें मक्केचें दर्शन महमदानें घेण्याविषयींची मुद्दत आतां भरली होती. त्या शहराकडची यात्रा कादा जो अलहाजीन पर्वताचा एक भाग आहे तेथें भरली होती. खोऱ्यामध्यें ते उतरत असतां महमद कास्वा ह्मणून जो त्याचा आवडता उंट त्यावर बसला आणि आब्दुल्ला त्याचा लगाम धरून पायीं चालत गेला. त्याच्या भोंवतां मुसलमानांचा मेळा होता व मागें बल्यर्पणासाठीं सिद्ध केलेले सत्तर उंट येत आहेत अशी त्यांची स्वारी आजूबाजूच्या टेंकड्यांच्या शिखरावरून कोरेश लोक पाहत होते. मक्केंत पोहंचल्यावर त्या देवळाच्या दारापाशीं दर्शनाचे सर्व संस्कार यथाविधि

केले गेले. काआबाच्या काळ्या पाषाणाचें चुंबन घेतलें गेलें. मग त्यांनीं त्या देवळाला दुडदुडा धांवून तीन प्रदक्षिणा केल्या, नंतर हळू हळू चालून दोन प्रदक्षिणा केल्या. नमाजाची घटका पुकारणाऱ्याकडून सर्वांस कळविली गेली, आणि पैगंबर व त्याचे शिष्य यांनीं साफा व मेर्वा या दोन डोंगरांमध्यें धांवत सात एरझारा केल्या. हा विधि इश्माएलाची आई हागार इच्या दिवसापासून देशसंप्रदायाप्रमाणें चालत आला होता. मिना खोऱ्यामध्यें त्या उंटांचें बल्यर्पण केल्यावर दर्शनविधि आटोपला आणि मुसलमानांनीं चालीप्रमाणें आपलें क्षौर केलें.

ही मक्केची यात्रा करण्यावरून कोरेश लोकांतील तीन नामांकित गृहस्थ लवकरच वळले गेले. ह्मणजे त्या काळांत परम श्रेष्ठ योद्धा खालेद ज्यानें ओहोदाजवळ मुसलमानांचा पराभव केला तो, आम्रू जो अगोदर हाब्सी देशांकडील वकील तो, आणि ओथमान जो काआबाचा रखवालदार तो, त्या तिघां श्रेष्ठ मनुष्यांचें सहाय मिळाल्यावरून आपल्या सर्व शत्रूंविषयीं आपण निर्भय आहों व अरबस्थानाचें एकछत्री राज्य संपादण्याविषयीं आपल्या अंगीं पुरतें सामर्थ्य आहे असें लवकरच महमदाला वाटलें. अगोदर ह्मटलें होतें कीं आपला धर्म अंगीकारावा ह्मणून महमदानें अनेक राजांला बोलावण्यासाठीं त्यांकडे वकील पाठविले होते, त्या वेळेस घात्फान कुळांतील आम्रू इब्न शोरकेल यानें त्यांतील एका वकिलास मुता गां-

वापाशीं मारिलें. हें गांव यार्देन नदीच्या पूर्वेकडे बाल्कस धामध्यें असतां हिरक्लियस बादशाहाच्या नांवानें तो अरब तेथें अधिकार चालवीत होता. या अपराधाचें पारिपत्य करावें ह्मणून महमदानें तीन हजार निवडक सैन्य बरोबर देऊन जेईदाला पाठविलें. जेईदाला जातांनां वर्तमान लागलें कीं आपल्यावर हल्ला करण्याकरितां त्या बादशाहाची एक लाख फौज वाटेवर आहे. अशा दडपून टाकणाऱ्या फौजेशीं भिडायास तो भ्याला. परंतु पुढें चाल करण्याविषयीं आब्दुल्लानें मथविलें असतां एक जिंकूं, नाहीं तर मरून जाऊं असा त्यानें दृढ निश्चय केला. जर लढाईंत जेईद पडला तर जूआफरानें सरदारी करावी आणि जर जूआफर पडला तर आब्दुल्लानें करावी अशी तजवीज योजिली होती. हे सर्व तिवेही एकामागें एक मारले गेले आणि मुसलमान लोकांची त्रेधा होऊन ते पळणार होते इतक्यांत खालेदानें मागून त्यांस सांवरून जय मिळविला. ह्या जयावरून महमद एवढा संतुष्ट झाला कीं त्यानें खालेदाला "ईश्वराची एक तरवार" अशी किताब दिल्ही. आणि जे लढाईंत पडले होते त्यांस धर्मासाठीं मरणाऱ्यांचे जे मुगुट प्राप्त झाले त्यांचें वर्णन महमदानें मोठ्या आनंदानें केलें. तथापि एकांतीं जेईदाची कन्या आपल्या वीर बापाच्या मरणावरून रडत असतां तोही तिजबरोबर रडला. त्याच्या एका शिष्यानें हें दुःख पाहून ह्मटलें, "हें ही मी काय पाहतों?" महमदानें उत्तर दिल्हें कीं, "आपला

परम विश्वासू मित्र गमावल्यारून एक मित्र खेद करीत आहे असें तूं पाहतोस."

मक्का शहर घेतल्यावरून महमदाला आपला अधिकार स्थापितां आला. तहनाम्याचीं वर्षें गुजरल्यावर आमच्या पक्षांतील कित्येकांचा घात झाल्यावरून तो मोडला गेला असें मुसलमान सांगतात. अबुसोफियन तो तहनामा पुन्हां करून घेण्यासाठीं मदिनेस गेला, पण महमदानें त्याला आपल्यासमोर येऊं दिलें नाहीं. त्यानें मक्केच्या आसपास जितक्या कुळांवर हुकूम चालवितां आला तितक्यांवर चालवून दाहा हजार मनुष्यें जमा केलीं. आपण तांबडा पोषाक करून उंटावर बसला आणि त्या दाहा हजार मशालींच्या उजेडाखालीं मक्केवर त्यानें चाल केली. दुसऱ्या दिवशीं सूर्यानें डोकें काढतांच त्यानें मोठ्यानें जयजयकार करीत त्या नगराच्या वेशींत पाऊल ठेविलें. हा जय कुराणाच्या अठ्ठेचाळीसाव्या सुऱ्यांत दाखल केला आहे. मग त्यानें काआबांत जाऊन तीनशें साठ मूर्तींचा विध्वंस केला. मग त्या देवळांतील सर्व ठिकाणीं हिंडून "आल्ला अक्बर ( ईश्वर थोर आहे )" "आणि महमदरसूल आल्ला ( त्याचा प्रेषित आहे )" असें मोठ्यानें ओरडत गेला. जे त्याच्या समीप होते त्यांस त्यानें सांगितलें कीं "हा तुमचा केब्ला आहे." ह्मणजे नमाज करितांना त्यांनीं आपलीं मुखें ह्या स्थानाकडे करावीं. मग त्यानें सूर्यास्त होईपर्यंत लोकांस

आपल्या मताचा उपदेश केला. कोरेश लोकांतील श्रेष्ठ जनांस बोलावून आणून उग्र मुद्रेनें त्यांस तो बोलला कीं, "आतां मीं तुह्मास जिकलें आहे तर मी काय करीन ह्मणून तुह्मास वाटतें!" तेव्हां ते ह्मणाले, "हे उदार कुळ-पुरुषा, जें चांगलें तेंच वाटतें." तो ह्मणाला, "जा, तुह्मी स्वतंत्र लोक आहां." काआबाची देखरेख ओथमान व त्याचे वारीसदार यांकडे त्यानें सोंपून दिल्ही. त्याच्या पुकारणाऱ्यानें नमाजाच्या वेळेविषयीं मक्केच्या देवळाच्या शिखरावरून लोकांस कळविलें.

यापुढें ज्या लढाया व गराडे आणि विजय यांकडून महमदानें आपल्या नामाचा पराक्रम वाढविला व ज्या लु-टीकडून अरब लोकांस सधन केल्यावरून आपल्या मोर्च्या-खालीं त्यांस ओढिलें, आणि जें ऐहिक गौरव व बिहिश्त यांविषयींच्या वचनावरून आपली शिष्यसंख्या बहुत वाढ-विली, त्या सर्वांविषयींची सविस्तर गोष्ट सांगूं लागलों तर वाचणाऱ्यांस कंटाळा येईल. मदिनेमध्यें त्याच्या दरबारांत परदेशांतील वकील लोकांची इतकी गर्दी झाली होती कीं, त्याच्या देशस्थ लोकांच्या ह्मणीमध्यें त्यांची गणना खार-केच्या झाडावरच्या खारकांपेक्षां अधिक होती.

त्याची शेवटली मोठी स्वारी ग्रीक लोकांवर होती. अबुबेकरानें आपली सर्व मालमत्ता ह्या स्वारींत अर्पण के-ली. ओमारानें उंट व ओथमानानें सोनें आणि स्त्रियांनीं आपले अलंकार दिल्हे. महमदानें हिरवीं वस्त्रें परिधान

करून सुरियाच्या सुपीक देशावर चाल करावी व ग्रीक राज्याचा व त्याच्या धर्माचा विध्वंस करावा ह्मणून दाहा हजार घोडेस्वार व वीस हजार पायदळ आणि बारा हजार सांडणी स्वार एवढ्या सैन्यासुद्धां त्यानें चाल केली; परंतु उन्हाळ्याची उष्णता, मैदानांतील तप्त रेती, पाण्याच्या झऱ्यांची कमताई आणि मनुष्य व पशु यांचा जिविकासावीस करणारी अशी मारक हवा या सर्व योगानें त्याचें सैन्य फारच कमी झालें. आणि त्याचे खचलेले सोबती जे हंगाम व पक्व फळें सोडून आले होते त्यांची घोकर्णी त्यांनीं केली. ह्या त्यांच्या कुरकुरण्याला महमद उत्तर देतां बोलला कीं, " नरक यापेक्षां तप्त आहे." सुरियाच्या हद्दीवर मदीना व दमास्कस यांच्या मधोमध ताबुक एथें पोहंचले असतां ताड झाडांच्या राईखालीं उतरले आणि आपली तहान त्यांनीं तेथील झऱ्याच्या पाण्यानें शांत केली.

लढाईविषयीं मसलत करणाऱ्या मंडळीमध्यें महमदानें कबूल केलें कीं ही लढाई चालविण्याविषयीं मला ईश्वरी हुकूम नव्हता. ओमारानें मत दिल्हें कीं पूर्वेकडील रोमी राजाचा मोठा पराक्रम याचा नाश केवळ पृथक पृथक करितां येईल. आणि आपल्या शस्त्राच्या दहशतीनें तर आह्मीं सर्वांच्या अंतःकरणास दरारा बसण्यापुरतें काम केलें, या गोष्टीला सर्व मान्य झालें.

मदिनेस परतल्यावर लवकरच आब्दुल्ला इब्नओबा खा-

आदी जो मुख्य ढोंगी तो इतका रोगी पडला कीं त्याच्या जगण्याची आशा राहिली नव्हती. जरी ह्या माणसाच्या विश्वासघाताविषयीं व आपल्याविरुद्ध त्यानें कसे छकेपंजे गुप्तपणें सतत चालविले हें महमदाला पुरतें माहीत होतें, तरी हा दुखणाईत होता तोंपर्यंत त्याच्या समाचारास तो वारंवार गेला आणि त्याच्या अंतकाळीं त्याजवळच असून मसणवटीपर्यंत त्याच्या प्रेताबरोबर गेला. त्या मयताच्या पुत्रानें आग्रहानें मागितल्यावरून त्याच्या पापाची क्षमा व्हावी ह्मणून महमदानें प्रार्थनाही केली. अशी ढोंग्यासाठीं प्रार्थना केल्यावरून ओमार यानें एकांतीं महमदाचे कान उघडले आणि आब्दुल्लानें किती वेळ त्यावर तुफान घेतलें याची आठवण त्यास दिल्ही; पण त्यानें त्यास धूर्त्ताईनें कुरानांतील वाक्य काढून उत्तर दिल्हें. तें असें, "तूं आपल्या खुशीप्रमाणें ढोंग्यांसाठीं प्रार्थना कर किंवा नको करूं. परंतु जरी तूं सत्तरदां प्रार्थना केली, तरी त्यांवरून त्यास क्षमा प्राप्त व्हावयाची नाहीं" ( सुरा तवबा आय.८१).

खाज्राादि लोक व त्या मयत मनुष्याचे पराक्रमी मित्र यांची मर्जी संपादावी ह्मणून आब्दुल्ला मूठमाती देतांना त्या प्रार्थना केल्या होत्या. आणि ह्या अर्थीं त्या प्रार्थना सफळ झाल्या. कारण कीं त्या मयताचे बहुतेक आश्रित त्या पैगंबराच्या स्वाधीन झाले आणि तेव्हांपासून त्याची सत्ता मदिनेमध्यें बिनधोक चालत गेली. त्यानंतर

त्यांत जो अविश्वासी असेल त्याच्या अंतकाळीं प्रार्थना करूं नये आणि मूठमाती देतांना जवळ उभें राहूं नये असा हुकूम उतरला ह्मणून महमद ह्मणाला ( सुरा तेवबा आय.८९ ).

परंतु जरी महमदानें आपल्या शिष्यांवर आणि दुसऱ्या लोकांवर असा अधिकार चालविला, तरी आपल्या बायकांस आवरणें आणि आपल्या जनानखान्यांत शांति राखणें याविषयीं त्याला मोठें अवघड पडलें होतें. तो आपल्या बायकांशीं फारकरून समदृष्टीनें वागे ह्मणजे एकएकीला निरनिराळें घर नेमून देऊन तिला तेथील स्वामिणी असें केलें आणि आपण पाळीपाळीनें अहोरात्र एकएकीपाशीं घालवीत असे. एका प्रसंगीं असें झालें कीं, हाफसेची पाळी असतां ती आपल्या बापाची भेट घेण्यासाठीं बाहेर गेली होती. तिनें अकस्मात परत येऊन पैगंबर ह्या मरियाम जी त्याची आवडती दासी तिजसंगतीं असतां त्याला गांठलें. ह्यामुळें हाफसेनें जो मोठा गोंगाट केला, त्यावरून महमदाला असा धाक पडला कीं, आपला सर्व जनानखाना ऐकून आपल्यावर उलटून पडेल. ह्मणून तिचें शांतवन करण्यासाठीं त्यानें प्रयत्न केले. परंतु इतःपर मरियामेशीं कधीं सहवास करायाचा नाहीं अशी त्यापासून तिनें शपथ वाहून घेतली, तेव्हांच काय तें तिचें शांतवन झालें. ह्या अटीवरून तिनें त्याची क्षमा केली आणि ही गोष्ट कोठें फोडणार नाहीं असें वचन दिल्हें.

तथापि तिनें आपलें वचन मोडून पैगंबराच्या बेइमानकीविषयीं आयेशेला कळविलें आणि लवकरच ती गोष्ट सर्व जनानखान्यांत जाहीर झाली होती. तेव्हां त्याच्या बायकांनीं त्यावर दोषरोपाचा एकसारखा भडिमार केला. त्याच्यानें दम धरवेना तेव्हां त्यानें हाफसेचा त्याग करून वरकडांच्याहीं घरीं जाणें येणें अगदीं वर्ज केलें. एक महिनाभर तो एका निराळ्या खोलींत खालीं सतरंजीवर एकटा निजे, परंतु असें ह्मणतात कीं शेवटीं याच्या वेडेपणाविषयीं मनांत आणून आल्लानें कुराणाचे कांहीं भाग पाठवून त्याला मरियामेविषयींच्या शपथेपासून मुक्त केलें, तेव्हां ती लागलीच त्याची अंतःपुरांतील सहेली झाली ( सुरा ताहरीम. आय १-३).

तेव्हां ह्या वेढंगी बायका आपल्या चुकांविषयीं शुद्धीवर आल्या असतां त्याच हुकुमावरून त्यांस कळविलें गेलें कीं, जी मनाई सामान्य मनुष्यास लागती ती पैगंबरास लागू नाहीं. सरशेवटीं हाफसा पश्चात्तापी झाल्यावरून तिचाही अंगिकार त्यानें केला. आयेशेची व त्याची समजूत झाली, (तिजवर त्याची मनापासून प्रीति होती) आणि सर्व दुसऱ्याही स्त्रिया प्रसंगानुरूप अंगीकारल्या गेल्या, परंतु मरियाम दिसण्यांत सुंदर व त्याच्या एकुलत्या पुत्राची आई होती ह्मणून तो तिजशीं सहवास करीत राहिला.

जेव्हां महमदाला लुटीचा वगैरे पुष्कळ पैसा मिळूं ला-

गला व लोकांमध्यें त्याची मानमान्यता फार वाढली, तेव्हां त्याच्या बायकांसही वाटूं लागलें कीं, त्यानें आमच्या अन्न-वस्त्रांची अधिक चांगली व्यवस्था ठेवावी. ह्मणून त्यांनीं कट करून त्यापाशीं मागणें केलें, त्यावरून तो मोठ्या पंचाइतींत पडला आणि एक महिनाभर त्यांकडे न जातां एकटाच निजत असे. शेवटीं आल्लाचा हुकूम तयार करून त्यांस कळविलें कीं, जर तुह्मांस उत्तम खाणेंपिणें व डाम-डौल यांची आवड असेल, तर सूटपत्र देतों. परंतु आल्लाची व प्रेषिताची गरज असेल, तर मी देईन तें घेऊन राहा. याप्रमाणें त्यांची समजूत करून त्यांस ठेऊन घेतलें (सुराअ-हज़ाब. आय. २८, २९ ).

वार्षिक यात्रेचा पुण्यमास आतां जवळ आला होता. परंतु महमदाला घरचें दारचें इतकें काम पुरवलें कीं त्याचें मदिनेंतून बाहेर जाणें होईना. याकरितां आपल्या ठिकाणीं अबुबेकरानें जे यात्रेकरू मदिनेपासून पुण्यनगरीस जाणार होते, त्यांवर अधिकार करावा ह्मणून महमदानें त्यास नेमिलें. त्याप्रमाणें तीनशें यात्रेकरू व बलिअर्पणार्थ वीस उंट यांसहवर्त्तमान अबुबेकर निघाला.

त्यानंतर लवकरच महमदानें आपला जावई जो सच्छिष्य अली त्यास बोलावून आणिलें आणि आपल्या सांडणींतून विशेष चपळ अलआधा ह्मणजे चिरलेल्या कानाची, तिजवर त्याला बसवून सांगितलें कीं, मक्केस फारच त्वरेनें जावें आणि हा नुकताच ईश्वरापासून जो हुकूम आला तो

कुरानाचा सुरा चहुंकडून जे यात्रेकरू जमा झाले असतील त्यांस जाहीर करावा.

आलीनें आपल्या नेहमीच्या आवेशानें व प्रामाणिकपणानें आपलें काम बजाविलें. तो धर्मसंबधीं उत्साहाच्या ऐनभरामध्यें त्या नगरीस पोहंचला. बलिअर्पणाच्या दिवशीं मीना खोऱ्यांत बलि वधण्यानें यात्राविधि संपावयाचा होता आणि जेव्हां इस्लामी धर्माचीं सर्व मतें व विधि हे अबुबकरानें लोकांस उपदेश करून शिकविले होते, तेव्हां आलआकाबाच्या डोंगरावर जो मोठा मेळा होता त्यासमोर आली उभा राहून बोलला कीं मी निकडीचा हुकूम घेऊन महमदापासून वकील होऊन आलों आहें. मग जो कुरानाचा सुरा त्यानें आणिला होता तो वाचून दाखविला. त्यांत तरवारीच्या जोरानें धर्म बेमुरवतीनें चालवावा असें प्रगट केलें होतें. जर मूर्त्तिपूजक व इतर अविश्वासू लोक आपल्यां करारविषयीं कोणत्याही प्रकारें लबाडी करितात किंवा महमदाच्या शत्रूची मदत करितात, तर त्यांच्याशीं जो तहनामा किंवा करार केला आहे, त्यापासून महमद ह्या हुकुमावरून मुक्त होता. ह्या हुकूमावरून आतां खबर दिल्हेल्या वेळेपासून अविश्वासी लोकांस चार महिन्यांची मुदत दिल्ही जाती, अशी कीं ह्या चार महिन्यांच्या आंत त्यांनीं पृथ्वीच्या पाठीवर कोठें तरी सुखरूप जावें. " परंतु ही मुदत भरल्यावर सर्व दिल्हेली मुभा बंद होईल. मग जे अविश्वासूच राहतात त्यांशीं सर्वप्रकारें

सर्वदां सर्वत्र लढाई केली जाईल. मग त्यांनीं धर्म स्वीकारावा, नाहीं तर कर द्यावा, यावांचून दुसरा कांहीं उपाय राहणार नाहीं. पुण्य मास किंवा पुण्य क्षेत्रें हीं त्यांस आणखी आश्रय देणार नाहींत. त्या हुकुमांत असें ह्मटलें कीं, "ज्या महिन्यांत तुह्मी हल्ला करूं नये ते गुजरल्यावर जेथें जेथें तुह्मांस मूर्त्तिपूजक अढळतील तेथें त्यांस जिवें मारा किंवा त्यांस कैद करा, त्यांस वेढा घाला, नाहीं तर त्यांसाठीं दबा धरा. जातीचे किंवा मित्रत्वाचे संबंध कांहींच मानिले जायाचे नाहींत. आपले जवळचे नातलग आणि परम मित्र जर ते मूर्त्तिपूजकच राहतात, तर विश्वासू लोकांनीं त्यांशीं कांहींच संबंध ठेवूं नये." चालतें वर्ष संपल्यावर कोणी अविश्वास्याला मक्केच्या पुण्य हद्दींत पाऊल घालूं देऊं नये आणि आल्लाच्या देवळांत जाऊं देऊं नये अशी मनाई होती. ही मनाई हा काळपर्यंत चालत आली आहे.

कित्येक यहुदी आणि मूर्त्तिपूजक अरब यांच्या वर्त्तणुकीवरून महमदाला फार संताप आल्यावरून हा कुरानाचा निर्दय सुरा लिहिला गेला असें वाटतें. त्या लोकांशीं महमदानें करार केला होता, परंतु त्यांनीं त्याशीं लबाडी केली आणि त्याच्या प्राणावर देखील दगे फटके केले होते. अणखी त्याचा दगलबाज आणि पराक्रमी शत्रु जो आव्दुल्ला इब्न ओबा याच्या मरणावरून आणि अरबी कुळें त्याच्या अंकित झाल्यावरून त्याची उमेद वाढली असें त्या सुऱ्यावरून दिसून येतें. त्याचाच धर्म ठ्या-

वर्त्तक करून चालविण्याविषयीं हा वास्तविक पूर्ण उपाय असा होता.

अबुबेकर व आली हे मक्केस परत आले असतां अबुबेकरानें ह्मटलें, कीं मी रसूलाच्या ठिकाणीं पाठविला गेलों असतां हा अगत्याचा हुकूम जाहीर करण्याचें काम मला दिल्हें नाहीं यावरून आश्चर्य व दुःख वाटतें. परंतु सर्व जे नवीन हुकूम ते पैगंबरानें स्वतां किंवा त्याच्या खाजगत घराण्यांतील कोणी एकानें मात्र प्रसिद्ध करावे अशा खातरजमा करून दिल्यावरून त्याची समजूत झाली.

कुराणाच्या सदरहू सांगितलेल्या सुऱ्याच्या जाहिरातीवरून आणि जे सर्व हा धर्म अंगिकारण्याविषयीं अमान्य आहेत त्यांचा लढाई करून समूळ नाश करण्याविषयींची धमकी देण्यावरून झुंडीच्या झुंडी हा धर्म अंगीकारणाऱ्या व कर देणाऱ्या झाल्या. इतक्या कीं त्या महिन्याच्या अखेरीस व हिजरा शकाच्या दहाव्या वर्षाच्या आरंभीं मदिनेंतील वस्तीमध्यें दूरदूरच्या कुळांपासून व राजांपासून आलेल्या वकील लोकांची गर्दी झाली होती. त्यांमध्यें जो पैगंबराच्या सांप्रतच्या अधिकारास वश झाला तो फार्वा नामानें सुरियांतील हराक्लियस बादशाहाचा सुभेदार होता. हा आमोन नामें जी आमोनी लोकांची प्राचीन राजधानी तेथील गवर्नरही होता. तथापि ह्याची शरणांगतकृति त्या बादशाहानें नाकारून त्यास तुरुंगाची शिक्षा दिल्ही.

महमद उत्तरोत्तर राजासारिखा आपल्याला समजून वर्त्तूं लागला. परंतु याच्या जयसंबंधी ज्या मोठ्या मसलती, त्या त्याच्या प्रेषितपणाच्या आवेशानें सर्वदा निर्दोष अशा दाखविल्या होत्या. त्याचे सरदार तर पहिल्यापेक्षां अधिक दूरच्या स्वाऱ्यांवर पाठविले होते, परंतु मूर्त्तीचा विनाश करून मूर्त्तिपूजक लोकांस आपल्या धर्मांत आणावें हाच काय तो त्याचा उद्देश होता. असा कीं त्याच्या धर्माच्या फैलावाइतकी मात्र त्याची अगिक सत्ताही चालली. अरबिया फेलिक्स ( येमेन ) यामध्यें आपल्या नांवानें अधिकार चालविण्यासाठीं त्यानें दोन प्रतिनिधींची नेमणूक केली. परंतु त्या सधन व वजनदार देशाचा एक भाग अझून अमान्य आहे असें दिसल्यावरून त्या लोकांस मथविण्यासाठीं तीनशें स्वारांनिशीं आलीला तिकडे पाठविलें होतें.

त्या तरुण शिष्यानें असें ह्मटलें कीं, जेथें मी जातों, तेथील लोक मजपेक्षां वयस्कर व शहाणे आहेत. याकरितां त्यांशीं प्रेषितपणा करण्याविषयीं मला संकोच वाटतो. परंतु महमदानें त्याच्या ओंठावर एक हात व छातीवर दुसरा हात ठेविला आणि त्याचे डोळे आकाशाकडे उंचावून मोठ्यानें बोलला, "हे भगवान, याची जीभ मोकळी कर आणि याच्या अंतःकरणांत प्रेरणा घाल." त्यानें न्यायाधिशी करितांना कसें वर्त्तावें ह्मणून महमदानें एक नेम लावून दिल्हा कीं, दोन पक्षांचीं माणसें

तुजसमोर असतां दुसऱ्याचें ऐकून घेतल्यापूर्वीं एकतर्फी फैसला कधीं करूं नको. मग त्याच्या हातीं धर्माचें निशाण देऊन व त्याच्या डोईस पागोटें घालून महमदानें त्याची मुखरुपें रवानगी केली.

हे सैनिक प्रेषित येमेनाच्या अविश्वासी प्रदेशीं येऊन पोहंचले असतां त्याच्या माणसांनीं आपले प्राचीन अरबी व्यसनाप्रमाणें लुटणें व नाश करणें सुरु केलें. आली हा त्याच्या अनर्थाचा मोड करून त्या पळणाऱ्या निवास्यांला कोठें जाऊं न देतां त्यांस इस्लामी धर्ममतें उघड करून दाखवूं लागला. त्याच्या जिभेविषयीं महमदानें प्रार्थना केली असतांही त्यांचें भाषण लोकांच्या मनांत पटेना. त्यांनीं त्याला बरच्या व तीर मारून प्रत्युत्तर दिल्हें. मग त्यानें तरवारीचा उपाय त्यांवर चालू केला, तो असा सफळ झाला कीं वीस अविश्वासी वधिले गेल्यावर वरकडांनीं आमची पुरती खातरी झाली ह्मणून कबूल केलें. याप्रमाणें दुसरीं कित्येक कामें सिद्धीस गेलीं असतां प्रत्येक वेळीं महमदाकडे आली हा वकील पाठवून त्या धर्माच्या नव्या विजयाचें वर्त्तमान कळवीत गेला.

चहुंकडून अशा विजयाचें वर्त्तमान आल्यावरून महमद आनंदभरित असतां घरांत एक जालीम हानि झाल्यावरून त्याच्या जिव्हारीं मोठा बाण लागला. त्याचा पुत्र इब्राहीम जो त्याची आवडती दासी मरीयाम इजपासून झाला, जो केवळ पंधरा महिन्यांचें लेंकरूं त्याचें

एकुलतें पुत्रसंतान, ज्यावर त्यानें आपल्या वंशपरंपरेनें नांव चालत जाण्याविषयीं आपली आशा ठेविली होती, त्याला काळरोगानें ग्रासिलें असतां त्याच्या दृष्टीसमोर त्यानें प्राण सोडिला. महमदाच्या उमेदीची इमारत खचल्यावरून वेदनेनें त्याची कंबर वांकली असतां त्याच्यानें पोटचा कळवळा सांवरेना. तो कण्हून ह्मणाला, "हे माझ्या पुत्रा, तुझ्या वियोगानें माझें अंतःकरण खिन्न आहे; आणि माझ्या डोळ्यांतून अश्रुपूर वाहत आहेत आणि मी लवकरच तुझ्या पाठोपाठ येणार आहें हें जर मला कळतें नसतें, तर याहूनही अधिक दुःख मला झालें असतें. कारण आह्मी आल्लाचे आहोंत, त्यापासून आलों आणि त्याकडेच आह्मांला परत जायाचें आहे.

अब्दलरहमानानें त्याला अश्रु गाळितां पाहून विचारिलें, "मेलेल्यासाठीं शोक करण्याविषयीं त्वां आह्मांस मनाई केली नाहीं काय?" महमदानें उत्तर केलें, "नाहीं. किंकाळ्या व आरोळ्या मारणें, तोंड बडवून घेणें, आणि आपलीं वस्त्रें फाडणें यांविषयीं मात्र मीं तुह्मांस मनाई केली आहे. कारण ह्या त्या दुष्टांच्या सूचना अशा आहेत. परंतु अनर्थामुळें अश्रुपात तर हृदयास शांत्वनकारक असतां दयेनें धाडिला आहे."

तो आपल्या लेंकराच्या पाठीमागें कबरस्थानापर्यंत गेला, तेथें विरहाच्या दुःखानें व्याकुळ असतांही आपल्या धर्माचे सिद्धांत आपल्या मनांत अखंड आहेत असें त्यानें

दुसरें एक प्रमाण दाखविलें. तें प्रेत कबरेमध्यें ठेवितांना तो मोठ्यानें बोलला, "माझ्या पुत्रा, माझ्या पुत्रा, माझा प्रभु आल्ला आहे, आल्लाचा पैगंबर माझा बाप आणि इस्लामी धर्म माझा धर्म असें तूं बोल." दूत हे परीक्षा करितांना विश्वासप्रकरणीं जे प्रश्न करितील त्यांचीं उत्तरें देण्यास आपल्या लेंकराला तयार करण्यासाठीं हें त्यानें ह्मटलें होतें. ही परीक्षा तर प्रत्येक मयतानें कबरेमध्यें द्यावी असें मुसलमान लोकांचें मत आहे.

महमदानें मक्केचें जें अखेरीस दर्शन घेतलें त्याला शेवटची यात्रा असें ह्मटलें आहे. महमदाच्या शिष्यांस मक्केची यात्रा करण्यास हा नमुना असा आहे. डोलीमध्यें त्याच्या नऊ बायका आणि १,१४,००,० शिष्यमंडळी त्याच्या समागमें होती. सदरहू काआबा ज्या चौकोन स्थानीं आहे त्याची लांबी पाव मैल आणि रुंदीही सुमारें तितकीच आहे. त्यांत ३५,००,० मनुष्य मावण्यापुरती जागा आहे. त्याच्या सभोंवतीं जी पडशाळा आहे, तिला ५०० खांब व ३९ दरवाजे आहेत. ती पडशाळा लहान लहान घुमटांनीं आच्छादिली आहे. आणि तिच्या चारी कोंपऱ्यांवर दुहेरी जिन्यांचे चार उंच मनोरे आहेत. काआबाच्या जवळ आब्राहामाचें संस्थान आहे. तें ठिकाण ईश्वरानें नमाजासाठीं नेमिलें असें कुराणाच्या तिसऱ्या सुऱ्यामध्यें सांगितलें आहे. तेथें एका खडकामध्यें आब्राहामाच्या पादुका उमटल्या आहेत असें मुसलमान ह्मणतात. पूर्वेस जे-

मजेम नामें विहीर आहे. तिच्या भोंवतें भिंतीचें आवार असून तें घुमटानें आच्छादलेलें आहे. तिचें पाणी चमत्कारिक गुणाकारी आहे असें ते ह्मणतात. ह्या प्रसंगीं जो यात्राविधि महमदानें केला, तो त्याच्या पूर्वीच्या यात्राविधीहून फारसा निराळा नव्हता. त्यानें आपल्या वयाच्या वर्षसंख्येप्रमाणें ६३ उंट आपल्या हातानें मारून बलिअर्पण केलें. आणि आपल्या धर्माचे मुख्य सिद्धांत अधिक स्पष्ट करून लोकांस सांगितलें आणि कुरानामध्यें जे विधि आज्ञापिले आहेत त्या सर्वांचें कारण उघड करून दाखविलें.

महमद एवढा पराक्रमी झाल्यावरून कोणाच्यानें त्याविरुद्ध उभें राहवत नव्हतें खरें, तथापि त्याची बरोबरी कोणी करूं लागल्यास वाईट न वाटावें अशा महत्वास तो पावला नव्हता. त्यानें आपणाला पैगंबर आणि रसूल ह्मणविल्यावरून त्याला जें मोठें यश प्राप्त झालें होतें त्यावरून आपणाला ह्याच योगानें महत्व व ऐश्वर्य प्राप्त करून घेतां येईल अशी दुसऱ्यासही सूचना झाली. मोसेलामा हा एक बलवंत प्रतिस्पर्धी उठला होता, त्याला इस्लामाचे अनुसारी आजच्या दिवसापर्यंत लबाड मोसेलामा असें ह्मणतात; तो तर होनेफाच्या कुळांतील असतां येमामाच्या प्रांतांत श्रेष्ठ होता. ह्या नव्या धर्माचें लक्षण व याच्या स्थापणाऱ्याचा स्वभाव आणि सभाग्यपण यांविषयीं विचार करून त्याच्या मनांत आलें कीं दैवी प्रेषितपणाचा वांटा महमदाबरोबर युक्तिप्रयुक्तीनें आपणाला प्राप्त करून घेतां येईल.

तेव्हां सर्व मनुष्यमात्रास मूर्त्तिपूजेपासून वळवून खऱ्या ई-श्वराच्या भक्तीस लावण्यासाठीं बोलवावयाचा अधिकार मह-मदासहित मला देऊन ईश्वरानें पाठविलें असें तो जाहीर करूं लागला. त्याच गाब्रियेल दूताच्या हातून कुराणाप्रमाणें लि-हिलेले हुकूम मला प्राप्त झाले असें मीस करून ते हुकूम लो-कांस जाहीर करूं लागला. त्याच्याच कुळांतील कित्येक लोक त्याला अनुकूळ झाल्यावरून धर्मसंबंधी अधिकाराचा वांटा मला असावा असें त्यानें महमदाला सांगितलें. त्याच्या पत्राची सुरुवात येणेंप्रमाणें होतीः "मोसेलामा जो देवाचा रसूल याकडून महमद जो देवाचा रसूल यास. आतां ही पृथ्वी अर्धी तुझी व अर्धी माझी व्हावी." परंतु आप-ल्याला सरकतीची गरज नाहीं असें वाटून महमदानें केवळ याप्रमाणें उत्तर पाठविलें. "महमद जो देवाचा रसूल याकडून मोसेलामा जो लबाड यास. पृथ्वी तर देवाची आहे. आपल्या सेवकांतील ज्यास तो इच्छितो त्यास ती देतो. आणि जे त्याचें भय धरितात त्यांस सद्गति प्राप्त होईल." पुढें थोडक्या महिन्यांनीं तो मरणार होता, तेव्हां त्या प्रतिस्पर्ध्याचें मत खंडन करण्यासाठीं खालेद जो "ईश्वरी खग" ह्मटलेला त्याला महमदानें स्वारीवर पाठ-विलें. असें ह्मटलें आहे कीं त्याला शेवटचें दुखणें लागलें असतां त्यांत ह्या अनपेक्षित प्रतिस्पर्ध्याविषयीं विचार मनांत येऊन तो घाबरा होई. महमदाच्या मरणानंतर खालेदाला जय प्राप्त झाला आणि त्या मताचा शेवटीं अगदीं लोप

होऊन गेला. जे रणांगणीं वधिले गेले नव्हते ते विजयी लोकांच्या तरवारीपासून लखलखीत प्रमाण जें चकाकलें त्यावरून त्यांची खातरी होऊन त्यांनीं आपले दोष पदरीं घेतले आणि मुकाट्यानें महमदाच्या मंडळींत माघारें वळून आले होते.

खैबर ह्मणून यहूदी नगर कौल देऊन सोडल्यावर त्यांत महमद गेला असतां हारेथाच्या घरीं त्याला मेजवानी झाली होती. हारेथाची जैनान नामें कन्या इनें अगोदरच जो मेंढराचा फरा विषयुक्त केला होता, तो जेवणामध्यें महमदाच्या पुढें वाढला. त्याच्या एका सोबत्यानें त्या फऱ्याचें पुष्कळ मास खाल्यावरून तो लवकर मरण पावला. आणि महमद जरी बराच हात राखून जेवला होता, तरी त्याला जी बाधा झाली तिजपासून तो कधीं निभावला नाहीं. मक्केची यात्रा करून माघारें आल्यावर त्याची प्रकृति क्षीण होत गेली. त्याच्या डोक्यांतील तीव्र वेदना व अंगीं महाज्वर लागल्यावरून त्याचें मरण जवळ आलें असें लक्षण दिसलें. त्यानें आपल्या बायकांस समोर बोलावून आणून आयेशेनें दुखण्यांत माझी सेवा करावी असें इच्छिल्यावरून त्याला तिच्या घरीं नेऊन ठेविलें. ज्या त्याच्या सोबत्याला खैबर एथें विषप्रयोग झाला होता, त्याची आई ह्या घरीं महमदाच्या समाचारास आली, तेव्हां तिला पाहून तो ह्मणाला, "हे बाशराच्या माते, जें मांस तुझ्या पुत्रासंगतीं म्या खैबरास

खालें तेणेंकरून माझ्या अंतःकरणाचीं अंतडीं आतां तुटत आहेत." दुसऱ्या दिवशीं आली आणि त्याचा दुसरा एक मित्र यांवर टेंकून महमद मशिदींत गेला. आपल्या पापाची क्षमा व्हावी ह्मणून त्यानें प्रसिद्धपणें प्रार्थना केली. मग उपदेशस्थानीं चढून तो लोकांशीं बोलूं लागला, "अहो मनुष्यांनो, म्या कोणी एकाला क्रूरतेनें फटके मारले असल्यास तेच फटके मला मारले जावोत. म्या कोणाचें नांव बुडविलें असल्यास माझेंहि बुडविलें जावो. म्या कोणाला फसविलें असल्यास यथान्याय त्याची फेड करण्यास मी आतां सिद्ध आहें." तेव्हां मंडळींतील एक जण उठून बोलला, "तूं माझे तीन रुप्य दिरम लागतोस." त्यानें तत्काळ त्याची फेड करून ह्मटलें, "परलोकापेक्षां एथें लाजविलें जाणें बरें आहे." नंतर त्यानें मध्यान्हींचा नमाज केला, त्यांत विशेषेंकरून त्यानें मयतांची आठवण केली. तो आपल्या परम विश्वासू शिष्यांस शेवटची निरवणूक करितां बोलला कीं, "तुह्मी अरबस्थानांतून सर्व मूर्तिपूजकांस घुडावून लावा; ज्या हक्कांचा माझे शिष्य उपभोग घेत आले, ते सर्व तसेच कायम ठेवा; आणि नमाजांत तत्पर असा." शेवटल्या तीन दिवसांत तो आपल्या खोलीच्या बाहेर आला नाहीं. त्यानें आपल्या बहुत दासांस मुक्त केलें. आपल्या अनुसाऱ्यांस आपले शेवटील नियम लिहून द्यावे ह्मणून त्यानें लेखण, शाई व कागद मागविले असतां ओमारानें त्याला

अडथळा घातला. त्यावरून वादविवाद होऊं लागल्यावरून माझ्यासमोर असा वादविवाद करूं नये असें महमदानें त्यास सांगून तो मिटवून टाकला. त्यानें त्या आपल्या मित्रास सांगितलें कीं, काल दूतानें मजजवळ येण्याची मजपाशीं परवानगी मागितल्यावरून मीं त्याला रुकार दिला. त्यानें आयेशेच्या मांडीवर आपलें डोकें टेंकिलें असतां त्याला मूर्छा आली. आणि आपले डोळे वर करून अडखळत बोलला कीं, " होय, दिव्य सोबत्यांसहित. " त्यानें सत्रंजीवर आपले हातपाय ताणून प्राण सोडिला. ही गोष्ट हिजरी सनाच्या अकराव्या वर्षीं आणि त्याच्या वयाच्या त्रेसष्टाव्या वर्षीं घडली.

आपला पैगंबर खरोखर मरण पावला हें बहुत लोकांस फारकरून खरें वाटेना. ओमार मोठ्यानें बोलला, " देवाचा पैगंबर मेला नाहीं, तो मोशे, इब्न आम्राम यांसारिखा चाळीस दिवसपर्यंत गेला किंवा इसा इब्न मेरियाम यांप्रमाणें पुन्हा परत येण्याकरितां आकाशांत गेला आहे." आणि त्यानें आपलें खड्ग् उपसून शपथ वाहिली कीं, "हा पैगंबर मेला असें जर कोणीं ह्मटलें, तर मी त्याचे कापून तुकडे करीन." परंतु अबुबेकराच्या शहाणपणानें ह्या भ्रांत्या दूर झाल्या. त्यानें सामोपचारानें त्यांस बोध करून ह्मटलें, " तुह्मी कोणाची भक्ति करितां ? महमदाची किंवा महमदाच्या ईश्वराची? जर तुह्मी ईश्वराची भक्ति करितां तर तो सर्वकाळ जगतो असें जाणा. परंतु महमद मर्त्य आहे

असें कुरानांतच सांगितलें आणि मरणाऱ्यांचा समाईक वांटा त्याला प्राप्त झाला आहे."

त्या पैगंबराचें प्रेत कोठें पुरावें याविषयीं वाद पडला. मक्का ही त्याची व आमची जन्मभूमि आहे ह्मणून त्याला तेथें न्यावें असा कोणी कोणी पक्ष धरिला. यरूशालेम हें पैगंबराचें नगर आहे ह्मणून तिकडे त्याला न्यावें असें दुसऱ्यांचें मत होतें. परंतु अबुबेकर पुन्हा मधीं पडून त्यांस बोलला कीं पैगंबर जेथें मरतो तेथेंच तो पुरला जावा असें महमदाला बोलतांना म्या वारंवार ऐकिलें होतें. याकरितां त्याला मदिनेंतच राखावें असें सर्वांनीं कबूल केलें. तें प्रेत एका शोभायमान तंबूमध्यें ठेवून आलीनें अति शुद्ध पाणी घेऊन मोठ्या भक्तिभावानें तें धुतलें. मग त्यांनीं तो मुर्दा टिकून राहण्यासाठीं कापुरानें सुवासिक केला आणि त्याचें तोंड व तळहात व तळपाय यांस सुगंधिक मसाल्यांनीं लेपन केलें. तदनंतर त्यांनीं त्याला शुभ्र वस्त्रानें गुंडाळून त्याच्या सभोंवतीं कःरूबा, कस्तूरी आणि गंधकाष्ट यांचे तुकडे ठेविले. ह्या सिद्धता झाल्यावर शवयात्रेच्या पुढें त्याचें घराणें झालें. त्यांच्या मागून त्याच्या पळण्याच्या वेळेचे जे त्याचे सोबती उतरले होते ते. त्यांच्या मागें मदिनेंतील मुख्य ग्रामाधिकारी, आणि त्यांच्याही मागून पुरुष, स्त्रिया, लेंकरें यांचा निःशब्द ससमुदाय, असे चालले. कुरानांतील प्रार्थना उच्चारिल्या गेल्या. ज्या खोलींत तो मरण पावला तिच्या खालींच त्याला पुरलें.

महमदाच्या इतिहासाविषयीं एवढ्याच काय त्या मुख्य गोष्टी आह्मांस माहीत झाल्या आहेत. ह्या गोष्टींवर आह्मीं कितपत भरंवसा धरावा, अशी शंका उत्पन्न होती. महमदाच्या इतिहासकांतून मोठा विवेकी अबूलफेदा, तो महमदाच्या मरणानंतर ७०० वर्षांच्या आंत आला नव्हता असा जेव्हां आह्मी विचार करितों, तेव्हां ज्या सर्व गोष्टी त्याविषयीं लिहिल्या आहेत, त्यांविषयीं आह्मांला अर्थातच अंदेशा येण्याजोगें आहे. ह्या ह्मटलेल्या पैगंबराच्या मरणानंतर बहुत काळानें जीं चरित्रें कल्पिलीं तीं त्याच्या इतिहासांत मिळविलीं नसतील याविषयींचा काय भरंवसा आहे? जर कुरान नसतें तर त्याविषयींचा आधार पाहण्यास मोठा घोंटाळा पडला असता. ह्यांतील बहुत सुरे आणि वाक्यें महमदाला जशी गरज लागली, तसें त्यांत घातलीं गेलीं असें तर प्रमाणच आहे. आणि हे कोणत्या गोष्टीविषयीं लागतात त्यांचा समज त्यावरूनच पडतो. आणि महमदाच्या स्वभावाचा सुमार बांधितां यावा व ज्या उपायांनीं त्यानें आपला धर्म जगामध्यें स्थापिला त्यांचा समज पडावा असे खातरीचे मुद्दे पुरतेपणीं आह्मांस लागले असें कदाचित आह्मांला ह्मणतां येईल.

---

## अध्याय ४.

### महमदाचें गुणलक्षण.

याप्रमाणें महमदाचा जगिक कामकारभार अटोपला. तो मनुष्यांमध्यें एक परम दक्ष व महान विजयी धुतारा

असा होऊन गेला. त्याच्याठायीं अति महत्वप्राप्तीचा विशेष लोभ असतां त्यानें आपली विशाल बुद्धि चालवून अरबी राष्ट्रांमध्यें हलक्या पदवीपासून चढतां चढतां अधिकाराच्या थेट कळसास जाऊन पोहंचला. आणि आपल्या मरणापूर्वीं मनुष्यांच्या इतिहासांत वर्णिलेल्या एका विशेष राज्यासंबंधी पालटापालटीचा आरंभ केला. त्यानें ज्या राज्याचा पाया घातला, त्याचा अधिकार केवळ ऐशीं वर्षांच्या अवधींत इतक्या राज्यांवर व देशांवर पसरला कीं, आठशें वर्षांमध्यें देखील तसा अम्मल रोमचा झाला नव्हता. त्याच्या अमलाचा विचार एकीकडे ठेवून त्यानें धर्मसंबंधी जें प्राबल्य संपादन केलें त्याची जेव्हां छान करितों आणि ह्या महमदी पाखंडाची त्वरित वाढ, त्याचा मोठा फैलाव आणि त्याचा टिकाव कसा झाला यांविषयीं विचार करितों तेव्हां तर आह्मी चकित होऊन जातों. जेव्हां कोणाच्या दैवाचा व योजलेल्या उपायाचा योग अगदीं जमून येत नाहीं आणि त्याचें प्राबल्य सर्वांच्या सुमारापलिकडे धांव घेतें, तेव्हां हें शुद्ध ईश्वरी सूत्रानें घडलें असा सिद्धांत करणें जसें प्राप्त होतें तसें ह्याही गोष्टीविषयीं प्राप्त झालें आहे. असे मोठे परिणाम कांहीं सामान्य गोष्टीनें झाले नाहींत. यहोवा ज्याचें ज्ञान अगाध व ज्याचे बेत पूर्ण झाल्याअगोदर आमच्या बुद्धिपलिकडे आहेत, त्यानें कांहीं चांगल्या कारणास्तव हा महमदी धर्म उत्पन्न होऊं दिल्हा आहे, यांत संशय नाहीं.

महमदाच्या स्वरुपाविषयीं त्याचे इतिहासक असें वर्णन करितात कीं त्याचा बांधा मध्यम व त्याचा वर्ण लाल भडक होता. त्याचें डोकें मोठें व सुघड होतें. त्याचे केस मृदु व चकचाकित काळे व डोळेही त्याच रंगाचे होते. त्याच्या शरिराचा बांधा इतका पराकाष्ठेचा जिवट व मजबूत होता कीं मरणापर्यंत फारकरून कांहीं तुटारी किंवा गात्रशैथिल्य त्यास प्राप्त झालें नव्हतें. त्याचा तोंडवळा मोठा असून दर्शनीय होता. त्याचे गाल तरतरीत, कपाळ उंच, त्याच्या भोंवया लांब व मऊ असून एकमेकींजवळ असूनही परस्परें लागून नव्हत्या. त्यांमध्यें एक शीर दिसत होती, तो रागावला ह्मणजे तत्काळ ती ताठून उभी राही. त्याचें नाक गरुडाच्या सारिखें आणि तोंड मोठें होतें. त्याचे दांत विशेष लखलखीत आणि विलक्षण आकाराचे होते ह्मणजे ते करवताच्या दांतांप्रमाणें सुतीक्ष्ण असतां त्यांमध्यें परस्परें थोडेंसें अंतर जरी होतें तरी त्यांची मांडणूक सुंदर होती. तो हंसतांना ते दाखवी, तेव्हां ते रुढीप्रमाणें गारेसारिखे किंवा मोत्यासारिखे दृष्टीस पडत. त्याचें हंसणें देखील पूर्ण राजतेजाचें होतें; ह्मणजे तो हांसे तेव्हां त्याच्या तोंडवळ्यावरील मुद्रा अशा दिसत कीं त्याकडे लक्ष लागल्यावांचून रहायाचें नाहीं असें ह्मटलें आहे. तो आपल्या वृद्धापकाळीं स्थूल झाला. तथापि त्याचा डौल सर्वदा उघड व चाल थोरवट व बोलण्याची ढब सर्वांस आवडती होती.

मोसलेम लेखकांनीं ह्या पैगंबराच्या मानवी गुणलक्षणांची अपार प्रशंसा केली आहे. त्यांतील कित्येक असें ह्मणतात कीं, महमद हा लेंकरूं असतां त्याला दोघां दूतांनीं उचलून नेऊन त्याचें शरीर सुरीनें विदारिलें आणि त्याचें अंतःकरण काढून त्याची मूळची भ्रष्टता मोठ्या काळ्या दुर्गंध थेंबांनीं अगदीं निचरून निघेपर्यंत त्यांनीं तें दाबिलें व पिळिलें. मग तें शुद्ध व परिपूर्ण झालेलें अंतःकरण पूर्ववत त्याच्या हृदयीं ठेविलें आणि ती जखम चमत्कारिक रीतीनें बरी केली. ही गोष्ट मूर्ख कादंबरी आहे असें दुसरे कित्येक कबूल करितात, तथापि तो आपल्या सद्गुणांवरून सामान्य मनुष्यापेक्षां फार थोर होता असें तेही मानितात. त्याच्या सुंदरपणाविषयीं योग्यतेपेक्षां चागलें वर्णन केलें ह्मणून संशय वाटतो; परंतु त्याच्या वर्तणुकीमध्यें त्याच्या न्यूनता आह्मांस त्याचा इतिहास व कुरान यांवरून खचीत काढितां येतात. त्याचे जे अनुसारी ते त्याचें धार्मिकपण, प्रामाणिकपण, न्याय, औदार्य, नम्रता आणि इंद्रियनिग्रह यांची बढाई करितात. आणि ह्या सर्वांमध्यें तो विश्वासणाऱ्यांचा पूर्ण कित्ता आहे असें ह्मणतांना कांहीं किंतू आणीत नाहींत. विशेषेंकरून त्याच्या दानधर्माचा एवढा लौकिक ते सांगतात कीं, त्याच्या हाताशीं फारकरून पैसा राहत नसे. तो आपल्या कुटुंबांच्या उपजीविकेपेक्षां कांहीं अधिक ठेवीत नसे आणि गरीबांच्या गरजा पुरविण्यासाठीं वारंवार आपल्या उपजीविकेंतूनही तो देई.

घटकाभर असें ह्मणा कीं ह्या सर्व गोष्टी अशाच असतील, परंतु ह्या सद्गुणांचा निवाडा करितांनां जे गुप्त हेतु सिद्धीस नेण्याचें त्याच्या मनांत होतें तेंही जमेस धरिले पाहिजेत; आणि याप्रमाणें ममताळू व थोर हृदय यांतील उदार कळवळे हे किंवा आपमतलबी नीतीचीं कृत्यें हीं होतीं यांविषयीं बरोबर ठरवितां येत नाहीं. मनांत मुख्य व प्रबळ अशी हाव असती तर तिनें मनाच्या वरकड हावा ज्या विशेष विरुद्ध व विपरीत कां असेनात त्या सर्वांस आपल्या हुकुमाखालीं एकोप्यानें नांदवावें ही असाधारण गोष्ट आहे असें नाहीं. महत्वेच्छा कधीं कधीं लोभावर अधिकार करिती, आणि सुखेच्छा तर ह्या दोघांवरही वारंवार अधिकार करिती. पैगंबरपणा आणि राज्याधिकार संपादनाचा हेतु कोणी एकाच्या मनांत उत्पन्न होतो, तेव्हां त्याला या गोष्टीकरितां नीतिमान व उदार व निर्दोषवृत्तिही धारण करितां येती. महमदानें पैगंबराचे सद्गुण दाखविले होते खरे असें जरी ह्मटलें, तरी निःसंशय पैगंबराच्या फळाकडे त्याचें लक्ष लागलें होतें. परंतु याच्या गुणावगुणांचा निवाडा करितांना उगीच आह्मी निष्ठुर होऊं असें नाहीं. त्याचा स्वभाव खरोखर मोकळा, उघड, राजमान्य, आवडता आणि तो कदाचित थोर मनाचा असा होता हें असंभव्य आहे असें आह्मांस वाटत नाहीं. ख्रिस्ती लेखकांनीं त्याच्या ठकविण्याचा अति द्वेष करण्यावरून त्याच्या स्वाभाविक गुणांविषयीं अयोग्य गोष्टी लिहिल्या असाव्या असें

आह्मांस वाटतें. परंतु इस्लामी धर्म आणि त्याचा स्थापणारा यांविषयीं जो इतिहास आहे त्याचें खरेपण जितकें आह्मांस पटतें तितक्यावरून पाहतांना स्पष्ट नजरेस येतें कीं, जर याच्याठायीं मुळींच वाखाणावयाजोगे गुण होते, तर तो जसजसा वाढत गेला तसतसे ते कमी होत चालले, त्याच्या यशाच्या पावलाबरोबर त्याच्या सद्गुणांची भ्रष्टताही पाऊल टाकीत गेली, आणि त्याचे अवगुण अधिक अधिक भारी आणि टळटळीत असे होत गेले.

याप्रमाणें त्याचे शिष्य त्याच्या मानसिक गुणांविषयींही मोठी बडाई करितात. त्याचें एवढें बुद्धिवैभव होतें कीं त्याला अभ्यासाची गरज पडली नाहीं. त्याला विद्येच्या प्रकाशाची मदत नसून ग्रंथाचाहि अभ्यास नव्हता; तथापि त्याच्या स्वाभाविक शक्तीनें भविष्य व कविता यांच्या उत्कृष्टतेमध्यें त्याला प्रवीण केलें. आणि कांहीं नमुने किंवा गुरु नसतांही त्याच बुद्धिवैभवाच्या बळानें त्याला अनुपम वक्तृत्व करितां आलें, परंतु एथें तर त्या पैगंबराची बडाई करितांना ते त्याच्या कुरानावर दोष आणितात. ह्मणजे शास्त्र रचल्यावरून जितकी त्याची अब्रू वाढवितात, तितकी त्याच्या ईश्वरी प्रेरणेविषयींच्या प्रमाणास बाध आणितात. कारण कीं हें कुरान अनक्षर पैगंबर यापासून आहे ह्मणून त्यांतील अनुपम रचनेची योग्यता मनुष्याकडे लागत नाहीं, ईश्वराकडे लागती असें महमद हमेशा स्वतां प्रमाण दाखवी. तथापि कुरानाव-

रून त्याच्या कवितेची योग्यता व त्याला रचणाऱ्याचें बुद्धिवैभव जें दिसून येतें त्याविषयीं वाचणाऱ्याला आपल्या आपण निवाडा करितां येईल. त्याची बुद्धि तीव्र, त्याची स्मरणशक्ति दृढ, मनुष्याच्या स्वभावाचें ज्ञान प्रवासानें व विशेष सहवासानें वाढलेलें जें त्याला होतें तें सखोल व बेताबाताचें होतें, आणि मनधरणी व मधुर भाषण यांत तो असा निपुण होता कीं त्याचा हात धरण्यासारिखा कोणी नव्हता, असें त्यांनीं त्याविषयीं आह्मांस सांगतलें असतां आम्ही त्यांस रुकार देतों. तो वाचाळ नव्हता पण बोलून चांगला होता. त्याची समाधानवृत्ति होती, त्याचें भाषण आवडतें व मृदु होतें आणि आपल्या ठायीं आपल्या मित्रांची व आश्रितांची निष्ठा जडविण्याची त्याच्या अंगीं आश्चर्यकारक युक्ति होती, असें त्यांनीं त्याचें वर्णन केलें तर आमच्यानें त्याविरुद्ध देखील कांहीं सांगवत नाहीं.

त्याचें जिणें आणि कृत्यें यांविषयीं निःपक्षपातानें चौकशी केल्यावरून महमद हा स्वभावानें थोरांतील एक होता आणि त्याकाळीक लोकांपेक्षां श्रेष्ठ होता, असें आह्मांस निर्बाधपणें ह्मणतां येतें. परंतु ज्या काळीं व ज्या देशांत तो उत्पन्न होऊन प्रसिद्धीस आला, तो अडाणी व रानटी असा होता; आणि ज्या नेमानें अरबस्थानांतील हिंडणाऱ्या कुळांमध्यें तो थोर असा ठरतो त्याच नेमानें पाहिलें असतां युरोपाच्या सुधारलेल्या देशांतील सामान्य

मनुष्यांपेक्षां विशेष मानिला गेला नसता. माणसांचीं गुणलक्षणें, जसें त्यांचें बुद्धिवैभव आणि त्यांची प्रधान इच्छा यांवरून होतात, त्याचप्रकारें त्यांच्या प्रसंगानें व भाग्योदयानेंहि होतात. जसे पर्जन्यबिंदु वाळवंटामध्यें जिरून जातात, तसे दुसरे योग जमून आले असतां मोस्लेम धर्माचा व सारसेन राज्याचा स्थापक आपल्या सजातीय लक्षावधि लोकांसारिखा विस्मरणांत बुडून गेला असता. त्याच्या सर्व इतिहासावरून असें दिसून येतें कीं धर्मवेड, महत्वेच्छा, आणि कामातुरपणा ह्या त्याच्या प्रधान हांवा होत्या; त्यांतून महत्वेच्छा व कामातुरपणा यांचें प्राबल्य झाल्यावरून धर्मवेडाचा उत्तरोत्तर क्षय होत गेला. तो स्वभावानें आवेशपूर्वक असतां लौकिकामुळें ढोंगी झाला. त्याच्या दुर्व्यसनांचा विशेष जोर झाल्यावरून त्याची तृप्ति करण्यासाठीं सत्यता, न्याय, मित्रत्व आणि भूतदया यांचा खर्च करण्याविषयीं त्यानें मागें पुढें पाहिलें नाहीं. त्याच्या आचरणांतील विशेष त्रासदायक विषयांचा अदमास करितांना ज्या लोकांमध्यें तो राहिला त्यांचें अज्ञान, अविचार, वर्तणूक आणि कायदे हेही आम्ही जमेस धरिले पाहिजेत. ख्रिस्ती नीतीप्रमाणें मूर्तिपूजकांचा निवाडा करूं नये; त्यांसच जो प्रकाश मिळाला तो पाहून ठरवावें. त्यानें बहुत बायका केल्या ह्याविषयीं पाहिलें असतां त्याच्या देशस्थ लोकांमध्यें अनेक बायका करून घेण्याची पुरातन काळापासून जी चाल होती तीच त्यानें धरिली. अबुसोफियन

आणि काआब यांनीं ह्या पैगंबराचा वैरभाव धरून त्याचा जीव धोक्यांत घातला होता असें समजून महमदानें त्यांचा जो घात करविला त्याविषयीं याला जरी आमच्यानें निर्दोष असें मानवत नाहीं, तरी कांहीं प्रकारें निमित्त आहे असें दिसतें; कारण कीं ती गोष्ट अरब लोकांच्या चालीविरुद्ध कांहीं नव्हती. सांप्रत काळीं देखील त्या सर्व देशांतील मुसलमानी लोकांस जिवाचा हलकेपणा वाटतो; हें लक्षण तर देशाच्या स्वाभाविक क्रूरतेकडे जसें लागतें, तसें राष्ट्रांच्या चालीकडेही निःसंशय लावितां येतें. असल्या लोकांची नीति तर केवळ हलकी अशी आह्मांस दिसेल. आणि ह्या नांवाचा पैगंबर आपल्या देशांतील लोकांच्या नीतीचा सुधारक असें आपल्याला ह्मणवीत असतां त्यांतील कित्येक अति दुष्ट मताचा आपण स्वीकार करून आचरीत राहिला यावरून आह्मी त्याला क्रोधदृष्टीनें पाहतों. एथें महमदावर जो मुख्य दोषारोप आहे तो हाच. जे नीतीचे नेम त्यानें स्वतां लिहून दिल्हे आणि जे दुसऱ्याकडून त्यानें भयंकर अधिकारानें पाळविले ते त्यानें स्वतां पाळिले नाहींत या बाबतींत ह्या महाठकाला कांहीं निमित्त दाखवितां येत नाहीं. त्यानें आपल्या पैगंबरपणानें आपले घरगुती अनुचित भोग आच्छादिले, आणि मला विशेष हुकूम प्राप्त झाल्यावरून जे नेम दुसऱ्यांस लागतात त्यांपासून मी मुक्त आहें असें ह्मणून, आपल्या इच्छेनुरूप

कोणंतीही बायको करून घेण्याची मला मुभा आहे, असें प्रगट केलें. "हे नबी, त्वां आपल्या ज्या बायकांस त्याचें मूल्य दिल्हें त्यांविषयीं तुला आह्मीं मोकळीक दिल्ही. आणि तुझ्या हातांतल्या ज्या दासी तुझ्या हातीं ईश्वर लागूं देतो आणि तुझ्या चुलत्याच्या लेकी व तुझ्या आतेच्या लेकी आणि तुझ्या मामाच्या लेकी व तुझ्या मावशीच्या लेकी ज्यांनीं तुझ्याबरोबर मक्केस सोडिलें; आणि कोणी स्त्री मुसलमान आहे तीं आपल्याला नबीस अर्पून देती किंवा नबी तिला आपली बायको करून घेण्यास इच्छितो, तर सदरहू गोष्टीविषयीं वरकड सान्या मुसलमानांशिवाय त्याला मात्र विशेष मुभा दिल्ही आहे" (कुरान सुरा ३. सुरा अहजाब. आय. ४९ ). याप्रमाणें लग्नसंबधी जी मोकळीक अति उदारपणानें नबीला दिल्ही होती ती आणि त्याच्या शिष्यांस जी मोकळीक दिल्हीं त्यांमध्यें केवढें अंतर आहे तें पाहावें."तुमच्या मर्जीप्रमाणें, दोन दोन, तीन तीन, चार चार लग्नें करा, परंतु तितक्यांशीं आपल्याला समदृष्टीनें वागतां येत नाहीं असें भय असल्यास केवळ एकच लग्न करा" ( सुरा ४. सुरा निसा. आय. ३ ).

महमदाची हीं वर्त्तणूक आणि हा स्वभाव याविषयीं लाजेमुळें आमच्यानें सविस्तर लिहवत नाहीं. सदरहू लिहिलेल्या गोष्टींवरून त्यानें आपल्या दैहिक हावांची कशी तृप्ति केली हें वाचणान्याच्या लक्षांत आल्यावांचून

राहणार नाहीं. त्यानें आपणास जें नाम लावून घेतलें त्याचा दुर्व्यय करण्याविषयीं मरियाम जी मिसरी दासी तिजशीं सहवास करण्याच्या गोष्टीमध्यें एक महा दोषाचा दाखला अढळतो. त्यानें आपल्या ह्या दासींशीं अनुचित कामव्यवहार केला ही गोष्ट ऐकून, होय, दृष्टीनेंही पाहून त्याच्या एका लग्नाच्या बायकोला समजली असतां तिने त्याच्या बेइमानकीवरून त्यावर दोषारोपाचा पराकाष्ठेनें निखरून वर्षाव केला. तेव्हां तिचें शांतवन करण्यासाठीं असा अन्याय पुन्हां मजकडून व्हावयाचा नाहीं असें तिला शपथपुरःसर वचन देणें त्याला प्राप्त झालें. परंतु थोडक्याच वेळानें त्याच्या कामातुरपणाचा जोर इतका झाला कीं, त्यापुढें त्याच्या निश्चयाचें बळ कांहीं चालेना, तेव्हां त्या निर्लज्ज झक मारण्याचा कलंक उडविण्यासाठीं त्यानें आपल्या बनावटी हुकुमाचा आश्रय केल्यावरून कुराणाच्या पृष्ठावर व त्याच्या कर्त्याच्या अब्रूवर फारच काळा डाग मात्र लागला. त्यानें आपल्या शपथेच्या बंधनापासून धादांत ढोंगानें मुक्तता करून घेऊन पुढील वाक्य बनविलें. "हे पैगंबरा, ज्याची तुला ईश्वरानें परवानगी दिल्ही आहे त्याची मनाई कां करितोस? तूं आपल्या बायकांची मर्जी संपादण्यास पाहतोस, परंतु ईश्वर क्षमा करणारा व मेहरबान असा असतां तुमच्या शपथेपासून तुम्हांस मुक्त करावें असें ठरवितो आणि ईश्वर तुमचा धनी आहे" ( सुरा ६६. ताहारीम.

आय. १— ३). ही तर त्याची बनावटी मोकळीक पाहिली असतां हें सिद्ध होतें कीं जो आपल्याला ईश्वराचा पैगंबर ह्मणावीत होता, त्यानें आपण जरी खोटी शपथ वाहिली,तरी कायद्याविरुद्ध होत नाहीं. त्यान आपल्या शिष्यांस याप्रमाणें शिकविलें: "तुह्मी आपसांमध्यें करार करितां तेव्हां देवाचा करार पुरा करा आणि देवाला आपला जामीन करून ज्या शुद्ध शपथा वाहिल्या त्या तोडूं नका; जें तुह्मी करितां तें ईश्वर जाणतो" ( सुरा नहल. आय. ९२, ९३ ).

त्याच्या वृत्तांताचे दोन विभाग, ते सहज लक्षांत येण्याजोगे आहेत, ह्मणजे ज्या वेळेस तो आपल्या देशस्थ माणसांमध्यें आपलें वजन पडावें ह्मणून उद्योग करीत होता आणि संकटानें तें काम चालवीत होता तेव्हांचा; आणि ज्या वेळेस त्याला आपले हेतु सिद्धीस नेण्याकरितां सामर्थ्य प्राप्त झालें तेव्हांचा. पहिल्या भागांत तो बाहेरून नम्र, मर्जी संपादणारा, गरिबांवर कृपाळू,थोरांशीं अंकित असा होता. दुसऱ्या भागांत तर तो तीव्र, कठोर आणि खुनी असा होता.

महत्वेच्छेविषयीं उद्योग करण्यांत व आस्था धरण्यांत एकसारिखें लक्ष लागल्यावरूनच काय ते पहिल्यापहील त्याच्या मनांत सर्व उपाय सुचले आणि सर्व हलक्या विचारांचा अगदीं लोप होऊन गेला. हा उद्योग करितांना विशेषेंकरून त्याचा पाया घालण्यांत फारच शहा-

णपण व सावधगिरी त्याला धरावी लागली. ज्या धूर्ती-ईवरून त्याची अब्रू इतकी मोठी झाली, तिच्या योगानें कांहीं वेळपर्यंत आपल्या दुष्ट हावांचा छंद त्याला गुप्त राखणें आणि कदाचित अकळणेंहि प्राप्त झालें. नाही तर ज्यांची सुइच्छा त्याला अनुकूळ करून घेण्याची होती, त्यांस याच्या दुराचरणावरून अडथळा झाला असता, आणि जें जाळें तो ढोंगानें विणीत होता तें पुरतें खंबीर आणि टिकाऊ झाल्यापूर्वीं त्याच्या गैरचालीनें त्याच्या अंतःकरणांतील गुप्त हेतु व भावना प्रसिद्धीस आणून तें जाळें उलगडून टाकिलें असतें. त्याच्या प्रेषितपणाची नूतन स्थिति असतां व त्यापूर्वींही जोंपर्यंत त्याचे साहसिक बेत पक्के झाले नव्हते आणि ते सिद्धीस जाण्याविषयीं निश्चय नव्हता, तोंपर्यंत ह्या धूर्त महाठकानें आपली सर्व वर्त्तणूक बाह्यात्कारी मोठ्या नेमनिष्ठेनें राखली होती असें वाटतें. परंतु त्याच्या पैगंबरपणाचा लौकिक स्थापित झाला आणि त्याचा अधिकार सामान्य कारणानें ढळला जायाचा नाहीं असा दृढतेनें मुळावला गेला आणि त्याची महत्वेच्छा ही सामर्थ्य प्राप्त झाल्यावरून कांहीं प्रकारें तृप्त झाली होती, तेव्हां लागलीच त्याची दुसरी एक हांव प्रबळ झाली, आणि ज्या प्रतिबंधानें ती आंकळली होती त्यापासून मुक्त होऊन महत्वेच्छेप्रमाणें सारिख्या जोरानें त्यास तिनें अगदीं बेताल करून टाकिलें. शेवटीं सारासार विचाराची जशी गरज नाहीं-

शी झाली, तसें त्यानें तो करणें सोडून दिल्हें, आणि शुद्धाचरणाचा डौल एकीकडे गुंडाळून ठेवून फार प्रसिद्धपणें स्वच्छंदानुरूप अतिशय दुराचरण करण्यास तो प्रवर्तला. ज्या बोधावरून इहलोकीं दैहिक हावांस स्वच्छंदानुरूप चालण्याविषयीं इतकी मोकळीक होती आणि परलोकीं त्या हांवा पूर्ण दशेस नेऊन अनंतकाळपर्यंत विषयभोगानें तृप्त होण्याविषयीं वचन दिलें गेलें, तो एक अत्यंत मोहक पाश असा होता. त्यानें आपल्या देशस्थ माणसांपुढें तो पाश पसरल्यावरून त्यास मोठें येश प्राप्त झालें होतें. जे कायदे त्यानें ह्या हांवा आवरण्याविषयीं लावून दिल्हें ते इतके पळपळीत होते कीं कोणी भला मनुष्य त्यांस मान्य करणार नाहीं. आणि ते अत्यंत विषयासक्त मनुष्यांस इतके अनुकूळ आहेत कीं त्यांस कुरकूर करण्याची कांहीं जागा राहत नाहीं.

जीं मतें ह्या महाठकानें प्रवृत्तींत आणिलीं तेणेंकरून अरबी लोकांच्या चालीची वास्तविक सुधारणा त्यानें केली, या गोष्टीचा नाकार आमच्यानें कदाचित करवत नाहीं. जो धर्म त्यानें स्थापिला त्यामध्यें सर्व प्रकारच्या भ्रांतिकारक व असमर्पक गोष्टी असतांही खऱ्या धर्मांतील कांहीं सिद्धांतही त्यांमध्यें आहेत आणि अनर्थ व अमंगळ मूर्त्तिपूजेचा जो सांप्रदाय अरबस्थानांत चालला होता त्यापेक्षां हा धर्म सर्वप्रकारें निःसंशय बरा आहे. परंतु त्याचा परदेशांतलि फैलाव आणि त्याचा शेवटील परिणाम यांविषयीं

जेव्हां आह्मी विचार करितों आणि ज्या धर्मांत परिपूर्ण आणि प्रियकर सिद्धांत व नीति आहेत त्याचा नाश ह्या धर्माकडून होण्याविषयीं कसें भय होतें आणि अजूनही परोपकारिक कामाविषयीं कसा अडथळा होतो त्याचें जेव्हां आह्मी मनन करितों आणि ह्याच्या मोहानें किती असंख्य लोक अत्यंत गाढ अंधकार व भ्रांति यांकडून आतां पावेतों व्यापले आहेत असें जेव्हां आह्मी मनांत आणितों, तेव्हां लागलेंच महमदाविषयीं व त्याच्या ठकपणाविषयीं आमचें ठरविणें होतें आणि त्याचे भयंकर आणि वेडेवांकड्या रूपाचें वास्तविक ज्ञान आह्मांस होतें.

सदरहू जें महमदाच्या गुणलक्षणांविषयीं वर्णन केलें त्यापेक्षां विशेष अनुमत धरणारे ख्रिस्ती देशांत देखील कित्येक अढळले आहेत. जगामध्यें परोपकारिक काम सिद्धीस नेण्याकरितां देवानें मला पाठविलें आहे असें त्यानें आपल्याला अंतःकरणपुरःसर मानिलें आणि तो मनुष्यमात्राचें कल्याण करण्याचा वास्तविक हेतु मनांत धरून वागला असें मानायाला ते तयार आहेत. त्यानें एवढी मोठी व दीर्घदर्शी ठकविण्याची योजना करून ती आपल्या अंतकाळपर्यंत इतकीं वर्षें चालवावी हें असंभाव्य आहे असें ते ह्मणतात. त्यानें आपल्या अंतकाळीं जी समाधान व शांत वृत्ति धारण केली, तिजविषयीं आह्मीं विचार करावा ह्मणून ते सांगतात; आणि विचारतात कीं त्यानें समजून उमजून आपलें सर्व आयुष्य ढोंगांत घालवावें आणि

तें उघडकीस न आणितां याप्रमाणें मरावें हें होईल तरी कसें? पण जे अशा शंका आह्मांस करितात ते मानवी मनाचा एक गुण आपल्या ध्यानांत आणीत नाहींत. हा गुण तर आत्मवंचना आहे. दुसऱ्यास फसविण्याचे जे उपाय तेणेंकडून आपणच फसणें हें तर त्याचें लक्षण आहे. दुसऱ्याच्या मनांत भ्रांति आणावयाकरितां आपलें आयुष्य घालविणें हें फारकरून आपल्या मनाचे डोळे अंधळे करणें असें आहे. आपले डोळे उघड असल्याशिवाय दुसऱ्यास फसवितां येतच नाहीं हें ह्मणणें खरें नाहीं. कोणी ठकविणारा ज्या साहित्यानें काम करितो त्याचा एक भाग हें त्याचें खाजगत मन आहे, आणि दुसरा भाग हीं दुसऱ्यांचीं मनें अशीं आहेत. आपल्या समोरासमोर सत्यता आहे आणि तिजशीं लढलें पाहिजे असें ठकास अढळतें. परंतु सत्यतेशीं उघडपणें युद्ध करणें याचा मनुष्याच्या मनाला अगदीं कंटाळा आहे, आणि याकरितां खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें करून दाखविणें हें त्याचें दुसरें काम होतें. दुसऱ्यानें जें खरें मानावें ह्मणून इच्छितो तें आपण स्वतां मानिलें पाहिजे. याकरितां ज्या गोष्टी आपल्या योजनेशीं प्रतिकूळ आहेत त्यांची घोकणी करण्यापासून तो अर्थातच राहतो आणि ज्या गोष्टी अनुकूळ आहेत त्यांचा ध्यास करण्याचा सराव त्यास लागतो. येणेंकरून विवेकबुद्धि भ्रष्ट होती इतकेंच केवळ नाहीं पण स्तब्धही होती. महमद महत्वेच्छेनें नवा धर्म

स्थापण्यास कसा पहिल्यानें उत्तेजित झाला होता आणि उत्तरोत्तर आपल्या विवेकाच्या तकरारी कशा निवारीत गेला हें ह्या नियमाचें ज्ञान झाल्यावरून आह्मांस सहज समजतें.

महमदाच्या गुणलक्षणांविषयीं सदरहू जें सांगितलें त्याला घडलेल्या गोष्टींचा आधार आहे. विशेषेंकरून एक मोठी गोष्ट अशी आहे कीं त्याला जें खोटें ह्मणून बरोबर माहीत होतें त्यांतून बहुत त्यानें खरें करून दाखविलें आणि जें ईश्वरापासून नव्हतें ह्मणून त्याला ठाऊक होतें तें ईश्वरापासून आहे असें त्यानें माणसांस दर्शविलें. मनुष्याला आपल्याच मनांतील सूचना घेऊन त्या ईश्वरापासून आहेत असें भ्रांतीनें कसें ह्मणतां येतें हें आह्मांस समजतें; परंतु आपल्याला आकाशांतून दूत येऊन भेटला, तो साकार सजीव बोलता, चालता, स्पर्शनीय असा असतां आपण त्याशीं बहुत भाषण केलें आणि तें केवळ एकदां असें नव्हे, परंतु २३ वर्षेंपर्यंत शेंकडों वेळां केलें एवढी पराकाष्ठेची चूक कोणाला करितां येईल? कोणाच्यानें करवत नाहीं, असें सर्व सुज्ञ मनुष्यें कबूल करितील.

मनुष्याचें कर्तव्यकर्म याविषयीं जें त्यालाच योग्यायोग्य वाटतें त्यापेक्षां ठराव करण्यासाठीं अणखी कांहीं पाहिजे असा सिद्धांत जोंपर्यंत बहुधा मनांत ठसत नाहीं, तोंपर्यंत या अरबी पैगंबराविषयीं जसे मतभेद आतांपावेतों पडत आले तसेच पुढें सर्वदां पडत जातील. आ-

पल्या जबाबदारीविषयीं ठराव करणें असल्यास माणसांनीं जो बोध अंगिकारून घेतला तेणेंकरूम नव्हे, पण ईश्वरानें जो बोध लावून दिल्हा तेणेंकरून तो करावा. आपला मनःसाक्षी सुधरावा व तो ईश्वरी वचनाप्रमाणें बोले असा करावा ह्मणून ईश्वरी शास्त्राचा उत्कंठेनें शोध करणें व त्याचें मनन करणें हा मनुष्यमात्राचा धर्म होय. ज्यांस मानवी ज्ञान थोडें बहुत आहे ते सर्व तेव्हांच कबूल करतील कीं मनुष्यमात्रांस लाभ किंवा लाभाचा भास याचा ओढा असल्यावरून अमुक करणें भाग आहे याविषयीं ते ठरवितात. कांहीं मालमत्तेविषयीं बिनवारसी मनुष्याची खातरी करून देण्यास जीं प्रमाणें पाहिजेत, त्यापेक्षां जो त्या मालमत्तेवर आपला वारसा आहे असें सांगतो त्याचा दावा खोटा करून दाखविण्यासाठीं विशेष अधिक प्रमाणांची गरज आहे. ज्या माणसाचें मन महत्वेच्छेनें अगदीं भरलें आहे तो आपल्या गोष्टीविषयीं सबब सांगावयास समर्थ होतो; तोच पूर्वीं महत्वेच्छेचा कमजोर असतां त्याच सबबी दाखविण्याविषयीं कचला असतां, स्वार्थबुद्धि, हांव किंवा निष्काळजी येणेंकरून माणसास सदसद्विवेकास जर भ्रष्ट करूं दिल्हें आणि त्या भ्रष्ट विवेकाप्रमाणें त्याचा निवाडाही होऊं दिल्हा, तर कोणाच्या गुणावगुणांविषयीं पाहण्याची गरज राहत नाहीं.

महमद केवळ एकला सृष्टिनिराळा पापी होता असा

कांहीं आमचा अभिप्राय नाहीं. त्यावर ठकपणाचा दोष लागतो, पण ठकपणा हें कांहीं देशानिराळें व लोकानिराळें अलौकिक पाप आहे असें आह्मी समजत नाहीं. असे तर अनेक महमद आहेत; आपली वाणी ही ईश्वरी वाणी मानिली जावी याविषयीं ते खुशी आहेत आणि जीं माणसें त्यांच्या आज्ञेनें चालायास मान्य आहेत त्यांसाठीं ईश्वराचें नाम घेऊन ते विधि लावून देण्यास तयारही आहेत. हा तर खरोखर महत दोष, अवाच्य धिटाई; परंतु विरळ आहे असें नाहीं.

---

## अध्याय ९.

### महमदाचा धर्म.

जर आह्मी महमदाच्या धर्ममतांचें संक्षिप्त वर्णन करीत नाहीं, तर त्याचा वृत्तांत अधुरा होईल, इतकेंच केवळ नाहीं पण त्याच्या पुरता समजही पडणार नाहीं. हीं मतें त्यानें मोठ्या आवेशानें व वक्तृत्वानें शिकविलीं; याशिवाय तेवीस वर्षांच्या अवधींत त्यानें ह्या मतांचें ज्या ग्रंथांत निरूपण केलें तो खंडशः देत देत गेला. हा ग्रंथ तर कुरान; हा अरबी शब्द आहे व त्याचा जो अर्थ "वाचन", तो जसा सगळ्या ग्रंथाला लागतो तसा त्यांतील प्रत्येक वाचनालाही लागतो.

ह्या ग्रंथांत एकशें चवदा सुरे ह्मणजे अध्याय असे विभाग आहेत. कित्येक सुरे तर तीन चार आयते ह्मणजे

ओव्या यांचे आहेत आणि दुसरे तीनशें आयतेपर्यंत आहेत. मुसलमान लोक कुराणाचा एवढा मान राखितात कीं, हातपाय आदिकरून धुतल्यावांचून ते त्याला स्पर्श करीत नाहींत. त्याचीं आयतें ते पताकावर आणि मशिदीच्या भिंतीवर लिहितात. आणि ते त्याच्या प्रती सोन्याच्या किंवा रुप्याच्या पेट्यांत घालून त्या पेट्या सोडगे असे आपल्या संगतीं बाळगितात. खलिफांनीं तर कुरान जवाहिरांनीं शृंगारिलें होतें; आणि तुर्क लोकांचे बादशहा हेही अझून तसेंच करीत आले आहेत. एर्पेनियस आणि गोलियस अशा युरोपांतील अरबी महान विद्वानांनीं वेळोवेळ कुरानाचे विभाग छापिले होते. आणि तें सगळेंहि वारंवार छापविलें गेलें. सन १८३४ यांत लैप्सिक एथें त्याचा एक सुंदर प्रतीचा छाप झाला होता. मुसलमान लोकांसाठीं त्याचा तर्जुमा पारशी, तुर्की, उर्दू, जापान आणि मालाई या भाषेंत केला गेला आहे. आणि ख्रिस्ती विद्वानांकरितां लाटीन व युरोपांतील सर्व अर्वाचीन भाषा यांत त्याचा तर्जुमा झाला आहे.

ह्या ग्रंथांत केवळ धर्ममतें आहेत असें नव्हे पण मुसलमानी देशांमध्यें दिवाणी व फौजदारी यांच्या सर्व कायद्यांचा आधारही आहे असें मनांत धरिलें पाहिजे.

कुरानाशिवाय मुसलमान लोकांजवळ अनेक संप्रदाय आहेत. ते महमदानें सांगितलेले, असें मानिलें आहे. त्याला ते सुन्नत ह्मणतात. ह्या संप्रदायांस अवलंबून जे जे राह-

तात, ते सुन्नी असे ह्मटले आहेत. आणि त्याचे प्रतिपक्षी जे ह्या संप्रदायाला मानीत नाहींत त्यांस शीई ह्मणतात.

साक्षात्कार दाखवून आपल्या ईश्वरी प्रेषितपणाविषयीं प्रमाण दे असें महमदाजवळ मागितल्यावर त्यानें पुराव्यासाठीं कुरान पुढें केलें. तथापि कुरानांत कधीं कधीं पूर्वापरविरोध अढळतात. मागील हुकूम रद्द करण्यासाठीं पुढील हुकूम दिल्हे आहेत असें ह्मणून ते त्या विरोधांचें निवारण करायास पाहतात. उघड साक्षात्कार दाखविण्याविषयीं जरी महमुदानें स्वतां मागें पुढें पाहिलें होतें, तरी त्याचे मागाहून झालेले शिष्य इतके शाहणे नाहींत. बहुत चमत्कार त्यानें केले असें मुसलमान लोक मानितात. ते ह्मणतात कीं, त्याच्या हातांतील रेती गात होती, अनेक पशूंनीं त्याशीं तोंडोतोंड भाषण केलें; त्याच्या बोटांच्या संधींतून पाण्याचे ओघ वाहिले आणि त्याच्या आज्ञेसरसें चंद्रानें आभाळांतून उडी मारून काआबाभोंवत्या सात फेऱ्या केल्या, आणि मग त्याच्या फळसावर थांबून ज्या भाषेनें ज्याप्रकारें त्याचे शिष्य बोलत असत, त्याप्रकारें तो महमदाशीं बोलल्यावर त्याच्या उजव्या बाहींत शिरून डाव्या बाहींतून पार निघाला, आणि त्याच्या पांघरुणावरून चहुंकडे फिरल्यावर त्याचे दोन तुकडे झाले आणि वायुमार्गें जात असतां ते पूर्ववत जुळले गेले.

सर्व कुरान तर आकाशामध्यें एका पुस्तकांत लिहून ठेविलें होतें; आणि तें खंडशः प्रसंगानुरूप गाब्रिएलानें वेळों-

वेळ मजकडे आणिलें, असें महमदानें साक्षात्कारीं दाखविलें. हे भाग शिष्यांनीं पाठ करून राखिले, नाहीं तर ते ताडपत्रावर किंवा चर्मांवर लिहिलेले असे होते. ह्या लेखांचा संग्रह जो महमदाच्या एका बायकोच्या स्वाधीन होता तो अबुबकर जो त्याचा उत्तराधिकारी किंवा खालिफ यानें अनुक्रमानें जुळून एक पुस्तक केलें. थोड्या वर्षांनीं ओथमान जो तिसरा खालिफ यानें त्या सर्व प्रती आणविल्या आणि त्या सर्वांचा नाश करून एक नवा ग्रंथ केला तोच आतांचें कुरान आहे. प्रत्येक सुऱ्याला निरनिराळी संज्ञा आहे, ह्मणजे गाई, इम्रान, बाया, तारा, मेज, किल्ला, लूट. बनी एस्राएल, हाज, कवी, चंद्र, प्रकाश, इत्यादि.

प्रत्येक सुराच्या वर ज्या गांवांत तो लिहिला होता त्याचें नाम सांगितलें, ह्मणजे “ मक्केस उतरला ” किंवा “ मादिनेस उतरला ”असें आहे. नवव्या सुऱ्याखेरीज सर्वांच्या आरंभीं “ बिस्मिला हिर्रहमानिर्रहीम ” हें आहे. कुरानाची भाषा पुरातन अरबी असतां हल्लीं मक्केकरांस ती अभ्यासानें शिकली पाहिजे. कुरान गद्यरूप लिहिलें आहे, परंतु तें गळ्यावर वाचतात. विद्वान गोलिग्रस यानें एर्पनियसांच्या अरबी व्याकरणाच्या पुरवणींत कुरानाचा मुख्य उद्देश जो दाखविला तो येणेंप्रमाणें:“ कुरानाचा उद्देश असा दिसतो कीं त्या वेळेस आरंभीं अरबस्तांच्या देशांत तीन धर्मांच्या मतांस अंगीकार करणारे जे लोक होते, त्यांस अनंत व अदृश्य जो एक ईश्वर याचें ज्ञान शिकवून

त्याच्या भक्तिमार्गी लावून एकवट करावें. त्यातील बहुतेक मूर्तिपूजक आणि वरकड जे ख्रिस्ती व यहूदी तेही बहुधा बहकलेले असे होते. त्यांस कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन विधी, कांहीं नियम व बाह्यात्काराच्या कांहीं रीति देऊन ऐहिक व पारलौकिक दंड व देणग्या दाखवून चालवावें. आणि या सर्वांस महमद जो ईश्वराचा प्रेषित पैगंबर याच्या अधिकाराखालीं आणावें. अगोदर बहुत वेळां उपदेशक, वचन देणारे आणि धाक घालणारे होऊन गेल्यावर सरशेवटीं पृथ्वीच्या पाठीवर देवाचा धर्म तरवारीच्या जोरानें स्थापिला जाऊन फैलाव्याकरितां महमद धर्मसंबंधी गोष्टींविषयीं मुख्य अध्यक्ष व राजसंबंधी गोष्टींविषयीं पादशहा असें सर्वांकडून मानिलें जावें, हाच काय तो कुराणाचा मुख्य उद्देश दिसतो."

कुरान हें अनक्षर मनुष्याच्या हातून असतां त्याच्या रचनेची सर्वोत्कृष्ट धाटणी आहे यावरून तें ईश्वरदत्त आहे असें महमद ह्मणत असे.

जीं विदेशीय माणसें कुरान वाचतील, विशेषेंकरून जीं त्याचा तरजुमा घेऊन वाचतील, त्यांस त्याच्या रचनेच्या उत्कृष्टतेविषयीं निवाडा सहज करितां येणार नाहीं. असें असतांही त्याची तुलना दुसऱ्या तसल्या पुस्तकांशीं होती. त्याची वाक्यरचना सफाईदार, त्यांतील कित्येक भावार्थ उत्कृष्ट. त्यांत ठिकाणीं ठिकाणीं शुद्धनीति प्रदर्शविली, आणि प्रसंगोपात दमदार कल्पना, या

सर्वांवरून कुरान नामांकित आहे असें निःपक्षपाती ग्रंथकार कबूल करितात. परंतु अपूर्व रचनेचा मान त्यास ते देत नाहींत. त्यांतील कित्येक गोष्टी यहूदी व ख्रिस्ती शास्त्रांतून व कित्येक तालमूद व राब्बीनी संप्रदाय यांतून, कांहीं कल्पिलेल्या शुभवर्त्तमानांतून, आणि कांहीं अरबस्थानांतील दंतकथा त्यांतून काढून घेतल्या ह्मणून त्या ग्रंथकारांनीं थांग लाविला आहे. त्याची उत्कृष्टता इब्री व ख्रिस्ती शास्त्रासारिखी आहे असें कांहीं नाहीं. त्या शास्त्रांत जें आहे त्यापेक्षां त्यांत कांहींच वर्त्तमान अधिकोत्तर नाहीं, परंतु त्यांच्या विरुद्ध मात्र यांमध्यें बहुत गोष्टी अढळतात. नव्या करारांतील घडलेल्या गोष्टींविषयीं प्राचीन पाखंड्यांनीं अगदीं गैरशिस्त मिथ्या वर्णनें लिहिलीं होतीं तीं यांत घेतलीं आहेत. याचा यांतच वारंवार विरोध अढळतो. युरोपियन विद्वानांचीं अशीं मतें असतां अरब लोकांला कुरान इतकें आवडतें कशावरून झालें? तर याचीं कारणें दिसतात. ते आपली भाषा विपुल आणि सुंदर असें समजून सर्वदा अहंपणा धरितात. ते कधींच विद्वान लोक झाले नाहींत; दुसऱ्या राष्ट्राच्या विद्येची आपल्यामध्यें अगदीं रीघ झाली नाहीं, त्यांच्या पूर्वजांनीं हें कुरान तरवारीच्या धारेवर अंगिकारिलें होतें; ते पिढोपिढी ह्या ग्रंथावर एकनिष्ठ व अविधिनिष्ठा धरीत आले असे आहेत; त्या सर्व गोष्टी पाहिल्या असतां या ग्रंथाचा एवढा बहुमान ते ठेवितात यावरून आह्मांस नवल वाटण्याची गरज नाहीं.

जे सुरे मक्केस दिल्हे गेले, त्यांतील अभिप्राय बलात्कार पूर्वक नाहीं. परंतु महमद आपलें संरक्षण करण्यास व आपल्या शत्रूंवर लढाई करण्यास पुरता समर्थ झाल्यावर जे सुरे मदिनेस प्रसिद्ध झाले, ते अविश्वासू लोकांशीं लढाई करण्यास अत्यंत जाज्वल्य हिम्मत देणारे होते. तेव्हां त्यानें उपदेश केला कीं, " ही तरवार आकाशाची व नरकाची किल्ली आहे. एक रक्तबिंदु ईश्वराकारणें खर्चणें, एक रात्रभर हत्यार घेऊन राहणें हें तर दोन महिन्यांचे उपास व प्रार्थना यांपेक्षां अधिक श्रेयस्कर आहे. जो कोणी युद्धांत पडतो त्याचीं पापें क्षमा होतात, त्याच्या जखमा न्यायदिवशीं हिंगुळाप्रमाणें तेजस्वी व कस्तूरीप्रमाणें सुवासिक होतील आणि त्याचे अवयव तुटून गेले असल्यास त्याबद्दल दुतांचे पंख जोडिले जातील."

घडलेल्या गोष्टींच्या वर्णनाविषयीं ह्या पुढील इतिहासाच्या हकिकतींत कुरानाचा जुन्या करारांशीं बहुतकरून पडताळा मिळतो. ह्मणजे जगाची उत्पत्ति; आदामाचें पतन; जलप्रलय; नौकेमध्यें नोहा व त्याचें कुटुंब यांचें संरक्षण; आब्राहामास बोलावणें; इझाक व इश्माएल यांच्या कथा; याकोब व बारा पूर्वज; ईश्वराचे निवडक लोक व्हावे ह्मणून यहूद्यांस निवडणें; मोशे याचा भविष्यभाषीपणा, त्याचे चमत्कार आणि त्याचा अधिकार; इब्री इतिहासक, भविष्यवादी, आणि स्तोत्रकारी, विशेषेंकरून दावीद व शलमोन यांचे ईश्वराच्या प्रेरणेनें केलेले ग्रंथ; आणि शेवटीं मशिहा-

च्या आगमनाविषयीं वचन आणि त्यासहवर्त्तमान अनेक भविष्यें अश्या गोष्टी आहेत.

तसेंच नव्या करारासीं कुरानाची जी सम्मति मिळती ती येणेंप्रमाणें: येशू ख्रीस्त यहूदी लोकांचा प्रतिज्ञात मशिहा; ईश्वराच्या आत्म्याकडून त्याचें अलौकिक गर्भधारण; कुमारी मारया इजपासून त्याचा निष्कलंक जन्म; लोगास ह्मणजे देवाचा शब्द ही त्याची किताब; त्याच्या पुढें आलेला जो जखाऱ्याचा पुत्र बाप्तिस्मा करणारा योहान्न त्याचा अलौकिक जन्म; येशूचे बहुत चमत्कार ह्मणजे रोग्यांस निरोगी करणें, मेलेल्यांस उठविणें, आणि भूतांवर अधिकार मिरवून त्यांस घालविणें; त्याच्याच देशस्थ माणसांकडून त्याचा अव्हेर व पाठलाग; त्याला वधस्तंभीं मरणाचा दंड ठरविणें; त्याचें देहासहवर्त्तमान आकाशांत आरोहण; तेथील त्याचें काम ह्मणजे देव व माणूस यांमध्यें मध्यस्थी व रदबदली करणें; आणि शेवटील दिवशीं सर्व माणसांची न्यायाधीशी करणें, असें आहे. तथापि कित्येक प्राचीन पाखंड्यांचें मत धरून महमदानें ह्या तारणाऱ्याच्या वधस्तंभींच्या वास्तविक मरणाविषयीं नाकार केला. " त्यांनीं येशूवर विश्वास ठेविला नाहीं, आणि तें मरियामेवर मोठें तुफान घेऊन बोलले, आणि मशिहा इसा मरियामेचा पुत्र जो ईश्वराचा रसूल होता त्याला आह्मीं मारिलें असें ते ह्मणाले. तथापि कोणी त्याला मारिलें नाहीं आणि वधस्तंभावर चढविलें नाहीं, त्यांच्या पुढें त्याचें रूप धरणारा होता.

त्यांनीं वस्तुतः त्याला कांहीं मारिलें नाहीं; परंतु ईश्वरानें त्याला आपल्याजवळ उचलून नेलें. आणि परमेश्वर पराक्रमी व चतुर आहे आणि त्या काफिरांनीं क्लृप्ति योजिली आणि ईश्वरानें क्लृप्ति योजिली आणि ईश्वराच्या योजना सर्वांहून चांगल्या आहेत." मुसलमानांच्या ह्मणण्या-प्रमाणें ती युक्ति अशी कीं, परमेश्वरानें येशूला आकाशांत नेऊन त्याचें रूप दुसऱ्यास दिल्हें असतां तो ह्याच्या बद्दल धरला जाऊन वधस्तंभीं मारला गेला. त्यांचें सर्वदा असें मत कीं, ज्याला असें अपकीर्तीचें मरण झालें तो स्वतां येशू नव्हता, पण दुसरा कोणी त्याच्या सारिख्या स्वरूपाचा होता.

कुरानांतील ज्या अनेक गोष्टींचा ख्रिस्ती शास्त्रांतल्या घडलेल्या गोष्टी व सिद्धांत यांशीं पडताळा मिळतो, त्यांच्यामध्यें वाढविलेल्या दंतकथा, अघटित गप्पा, आणि उपहासयुक्त व अनिवार पोरकटपणा असल्या अत्यंत असंभूत गोष्टी विलक्षण रीतीनें मिळविल्या आहेत. याचें कारण असें असावेंसें वाटतें, ह्मणजे जेव्हां ख्रिस्ती शास्त्रांतील सत्य गोष्टी काढिल्या गेल्या, तेव्हां त्याबरोबर तालमुदी व राबिनी ग्रंथकारांच्या संप्रदायांतून कांहीं व कांहीं निराधार शुभवर्त्तमानें किंवा आदामाचीं, शेथाचीं, हनोखाचीं, नोहाचीं आणि ह्यासारिखीं दुसरीं बनावटी पुस्तकें यांतूनही काल्पित कादंबऱ्या व असंभूत गोष्टी घेतल्या गेल्या. ह्या बनावटी पुस्तकांची प्रवृत्ति पहिल्या शतकांत पाखंडी लोकांमध्यें फारच होती असें ख्रिस्ती मंडळीच्या बखरींत पुरतेपणें जाणविलें आहे.

जुन्या करारांतील प्रख्यात गोष्टी ज्या कुरानांत अढळतात, त्यांतून एकदोन एथें मासल्यासाठीं काढिल्या असतां अनुचित होणार नाहीं.

"आणि आमचे दूत खुशालीचें वर्त्तमान घेऊन आब्राहामाकडे गेले. ते बोलले सलाम; तो बोलला, सलाम आहे. मग तो उशीर न करितां एक तळलेलें वासरूं घेऊन आला. आणि त्याची बायको उभी होती, ती हंसली; मग आह्मी इझाकाविषयीं आणि इझाकाच्या मागून याकोबाविषयीं खुशालीचें वचन तिला दिल्हें. ती बोलली, अरेरे! मी ह्मातारी आणि हा माझा नवरा ह्मातारा असें असतां मी प्रसवेन काय? ही तर आश्चर्याची गोष्ट आहे. ते ह्मणाले, काय, तूं ईश्वराच्या हुकुमावरून आश्चर्य मानितीस? तुह्मांवर ईश्वराची कृपा व आशीर्वाद आहेत. मग जेव्हां आब्राहामाचें भय उडालें आणि त्याला इझाकाविषयीं खुशालीचीं वर्त्तमानें आलीं, तेव्हां तो लोटाच्या लोकांविषयीं आह्मांशीं वाद करूं लागला. खरोखर, आब्राहाम हा दयाळू, कोंवळ्या मनाचा, आणि मद्भक्त असा होता. ते दूत ह्मणाले, हे आब्राहामा, ही गोष्ट सोडून दे. हा तर तुझ्या प्रभूचा हुकूम येऊन चुकला आणि त्यांच्यावर अरिष्ट येत आहे तें टळायाचें नाहीं. आणि आमचे दूत जेव्हां लोटाजवळ पोहंचले, तेव्हां तो त्याच्या येण्यावरून कष्टी आणि जीवामध्यें कासावीस झाला आणि ह्मणाला, आजचा दिवस फार

कठीण आहे. आणि त्याचे लोक त्याकडे बेशक धांवत आले. आणि ते पहिल्यापासून दुष्कर्मे करीत आले होते. तो बोलला, हे माझ्या लोकांनो, ह्या माझ्या कन्या हजीर आहेत. ह्या तुह्मांस त्यांच्या पेक्षां योग्य आहेत ह्मणून ईश्वराला भ्या आणि माझ्या पाहुण्यामध्यें माझी बेअब्रू करूं नका. काय तुझ्यामध्यें एक माणूस देखील नीतिमान राहिला नाहीं? ते बोलले, तूं तर आह्मांला जाणतच आहेस कीं तुझ्या कन्यांशीं आह्मांस कारण नाहीं आणि जें आह्मांस पाहिजे तें तर तुला माहीतच आहे. तो ह्मणूं लागला, तुमच्या समोर मला कोठून तरी बळ असतें किंवा कोणी खंबीर पाठिंबा मला मिळता तर बरें होतें. पाहुणे बोलले; हे लोट, आह्मी तुझ्या प्रभूचे दूत आहोंत. ते सर्वथा तुजपाशीं येऊं शकणार नाहींत. ह्मणून तूं रात्रींतून केव्हां तरी आपल्या कुटुंबाला घेऊन नीघ आणि तुह्मांतून कोणी मुरडून मागें पाहूं नये. तथापि जें त्यांच्यावर पडणार आहे तें तुझ्या बायकोवर पडायाचें आहे. त्यांच्या नाशाची वेळ ही सकाळ आहे" (कु० अ० ११. सुराहूद. आय. ६९–८०).

"आणि आब्राहाम ह्मणाला, मी आपल्या प्रभुकडे जातों, तो मला मार्गी लावील. हे प्रभु, मला कोणी नीतिमान पुत्र दे मग एक लेंकरूं जें नम्र होईल त्याविषयीं आह्मीं त्याला खुशालीचें वचन दिलें. नंतर तो पुत्र त्याच्या संगतीं धांवण्याइतका वयांत आला असतां

तो त्याला ह्मणाला, हे पुत्रा, तुझें बलिअर्पण मी करीत आहें, असें स्वप्नांत म्या पाहिलें. तर मग याविषयीं तुला कसें दिसतें ? तो बोलला, हे बापा, तुझा जसा हुकूम असेल तसें तूं कर. जर ईश्वर इच्छितो तर मी सहनशील असा तुला मिळेन. आण ते उभयतां हुकुमास मान्य झाले असतां यानें त्याच्या डोक्याच्या केसांला हात घातला तेव्हां आह्मी असें ओरडलों कीं, हे आब्राहामा, तूं आपलें स्वप्न खरें करून दाखविलें आहेस. तसें आह्मी नीतिमानास प्रतिफल देतों. सर्व जाणतील कीं ही निश्चित गोष्ट आहे. आणि त्याच्या मोबदला आह्मीं त्याला मोठा बलि दिला." (अ. ३७ सुरासफात. आय. ९८–१०७).

नव्या करारांतील इतिहासाशीं कुरानांतील गोष्टींचा कसा संबंध आहे हें पुढील वाक्यांवरून ध्यानांत येईल.

"जखाऱ्यानें आपल्या प्रभुपाशीं प्रार्थना केली. तो बोलला, हे प्रभू, मला तुजपासून चांगलें संतान प्राप्त कर. निश्चयें तूं प्रार्थना ऐकणारा आहेस. तेव्हां त्या खोलींत प्रार्थना करीत उभा राहिला असतां दूतांची वाणी त्यास झाली कीं योहान्नाविषयीं परमेश्वर तुला खुशालीचें वचन देतो. तो परमेश्वरापासून येणार शब्द त्याविषयीं साक्ष देईल. तो महान होईल, आणि तो बायकोजवळ जाणार नाहीं आणि तो नीतिमानांमध्यें भविष्यभाषी असा होईल. तो बोलला, हे प्रभू, मला पुत्र कोठून होईल ? कां कीं

मी म्हातारा व माझी बायको वांझ आहे. दूत म्हणाला कीं परमेश्वर जें इच्छितो तें करितो. तो बोलला, हे प्रभू मला कांहीं चिन्ह दे. दूत म्हणाला, तूं तीन दिवसपर्यंत लोकांशीं बोलणार नाहींस हेंच तुला चिन्ह आहे; केवळ खुणावितां येईल. आणि दूत बोलले, हे मरियामे, ईश्वरानें तुला पसंत व पवित्र केलें आहे, आणि पृथ्वींतील स्त्रियांमध्यें तुला निवडिलें आहे. मग दूत म्हणाले, हे मरियामे, परमेश्वर तुजकडे निरोप पाठवितो कीं तूं त्याजपासून जो शब्द उतरतो त्याला जन्म देशील. त्याचें नाम ख्रीस्त येशू, मरियामेचा पुत्र असें होईल; तो इहलोकीं व परलोकीं आणि ईश्वराच्या सांनिध जे आहेत त्यांमध्यें सन्मान्य होईल. ती म्हणाली कीं, हे प्रभू, मला कोणी पुरुषाचा स्पर्श नाहीं. मग पुत्र कसा होईल? तो म्हणाला, याचप्रकारें जें परमेश्वर इच्छितो तें उत्पन्न करितो. जेव्हां तो एका कामाविषयीं हुकूम करितो तेव्हां "होवो" असें त्यानें त्याला म्हटलें म्हणजे तें होतें. आणि परमेश्वर त्याला शास्त्र व कामाच्या गोष्टी आणि तौरत व इंजील हें शिकवील, आणि तो इस्राएल संतानाचा रसूल" ( सुरा३. सुरा इमरान. आय. ३८-४८).

जुन्या व नव्या करारांतील प्रत्यक्ष गोष्टींचाच कुरानामध्यें पडताळा मिळतो असें केवळ नाहीं, परंतु ख्रिस्ती शास्त्रांतील मतें व दाखले आणि लिहिण्याची धाटणी यांविषयींही अधिक उणा सारखेपणा अनेक ठिकाणीं दि-

सून येतो. कुरान हें यहूदी व ख्रिस्ती शास्त्राची बनावटी नक्कल आहे असें फारकरून वाटतें. ख्रिस्ती शास्त्रांतून किती विषय चोरून घेऊन कुरान बनविलें आहे हें शोध करण्याकरितां कोणी त्या उभयतांची तुलना करण्यास प्रवृत्त झाल्याशिवाय ते त्याला समजणार नाहींत. तथापि ख्रिस्ती शास्त्र व कुरान यांमध्यें ज्या एकसारिख्या गोष्टी सहज अढळण्यांत येतात, त्यांतून शेंकडोंपकीं हें पुढील प्रत्यंतर एक मामला आहे हें पाहून जुन्या व नव्या करारांतील पुष्कळ सामग्री घेऊन कुरान रचिलें आहे असें खरोखर दिसेल.

| ख्रिस्ती शास्त्र. | कुरान. |
| --- | --- |
| लोकांनीं पहावें ह्मणून तुह्मीं आपला धर्म त्यांच्या समोर न करावा याविषयीं सावध असा. नाहीं तर तुमच्या आकाशांतील बापापासून तुह्मांस फळ नाहीं. | धिक्कार किंवा उपद्रव करण्यानें तुह्मी आपला धर्म निष्फळ करूं नका, माणसांस दिसावें ह्मणून जें आपल्यापाशीं आहे तें धर्मार्थ जो खर्चितो त्याप्रमाणें. |
| येशू जो नाजोरी त्याच्या हातून देवानें जे चमत्कार आणि अद्भुतें आणि चिन्हें तुह्मांमध्यें केलीं ह्मणून तुह्मी जाणतां त्यावरून तो देवानें प्रदर्शविलेला असा मनुष्य होता. | येशू जो मरियामेचा पुत्र त्याला आह्मीं प्रसिद्ध चिन्हें दिल्हीं आणि पवित्र आत्म्याकडून त्याला सबळ केलें आहे. |

| ख्रिस्ती शास्त्र. | कुरान. |
|---|---|
| तूं जिवाबद्दल जीव देवीव, डोळ्याबद्दल डोळा, दांताबद्दल दांत, पायाबद्दल पाय, पोळण्याबद्दल पोळणें, जखमांबद्दल जखम, क्षतांबद्दल क्षत, असें ठरीव. | आह्मीं त्यास हुकूम दिल्हा कीं त्यांनीं जीवाबद्दल जीव, डोळ्याबद्दल डोळा, नाकाबद्दल नाक, कानाबद्दल कान, दांताबद्दल दांत द्यावा, आणि जो घाय करितो त्यास प्रत्युपकार करण्यानें शिक्षा करावी. |
| परंतु त्यांच्या बुद्धि मंद झाल्या, कां कीं जुना करार वाचण्यांत तेंच मुखवस्त्र काढिलें असतां आजपर्यंत राहिलें आहे. परंतु आजपावेतों जेव्हां मोश्याचें नेमशास्त्र वाचिलें जातें, तेव्हां तें मुखवस्त्र त्यांच्या अंतःकरणावर राहतें. | तूं कुरान वाचितोस तेव्हां जे ऐकतात त्यांमध्यें कोणी आहेत, आह्मीं त्यांच्या अंतःकरणावर पडदे टाकिले आहेत यासाठीं कीं त्यांनीं तें समजूं नये, आणि त्यांच्या कानीं बधिरत्व दिल्हें. |
| तेव्हां त्यांनीं त्याला ह्मटलें, आह्मीं पाहून तुजवर विश्वास ठेवावा ह्मणून तूं काय चमत्कार करितोस? | पाखंडी ह्मणतात कीं त्यावर त्याच्या प्रभुपासून कांहीं चमत्कार घडिले गेल्यावांचून आह्मी विश्वास ठेवणार नाहीं. |

## ख्रिस्ती शास्त्र.

प्रारंभीं देवानें आकाश व पृथ्वी यांस उत्पन्न केलें. तेव्हां देव बोलला कीं उजेड होवो, मग उजेड झाला.

नंतर त्याला (मोश्याला) चाळीस वर्षें भरलीं असतां त्याच्या मनांत आलें कीं आपले भाऊ इस्राएलाचे वंश यांची भेट घ्यावी.

आणि त्याच्या राज्याच्या अंत्यवेळीं पातकें परिपूर्ण झालीं ह्मणजे कठोर मुख आणि दृष्टकूटबोधी असा राजा उत्पन्न होईल.

मी आपलें तोंड दाखल्यांनीं उघडीन, जगाच्या मांडण्यापासून जी लपून राहिली ती प्रगट करीन.

मग सातव्या दूतानें वाजविलें, तेव्हां आकाशांत मोठ्या वाण्या झाल्या, अशा कीं

## कुरान.

ज्यानें आकाशें व पृथ्वी यांस उत्पन्न केलें तोच तो आहे आणि जेव्हां कधीं एक वस्तु होवो असें तो ह्मणतो तेव्हां ती होती.

मी तें (कुरान ) प्राप्त झाल्यापूर्वीं चाळीस वर्षांचा होईपर्यंत तुह्मांमध्यें राहिलों होतों ह्मणून तुह्मी समजत नाहीं काय?

तुझ्या स्वप्नाप्रमाणें तुझा प्रभु तुला निवडील व तुला दृष्टकूटाचा अर्थ शिकवील.

आह्मी त्याला दृष्टकूटाचा अर्थ शिकविला पण बहुतेक लोक समजत नाहींत.

हे प्रभू, तूं मला त्या राज्याचा विभाग दिल्हा आहे व दृष्ट ह्मणीचा अर्थ शिकविला आहे.

ज्या दिवशीं तो करणा वाजेल तेव्हां राज्य त्याचें होईल.

| ख्रिस्ती शास्त्र. | कुरान. |
| --- | --- |
| जगांतील राज्यें आमच्या प्रभूचीं व त्याच्या ख्रीस्ताचीं झालीं आहेत. | |
| कां तर पहा, मी नवीं आकाशें व नवी पृथ्वी उत्पन्न करितों. नवें आकाश व नवी पृथ्वी यांची वाट आह्मी पाहतों. मी तुह्मांला तुमच्या कबरांतून वर चढवीन आणि प्रत्येक आपल्या श्रमाप्रमाणें आपली मजुरी पावेल. | असा दिवस येईल कीं तेव्हां ही पृथ्वी पालटून दुसरी पृथ्वी व हीं आकाशें पालटून दुसरीं आकाशें अशीं होतील आणि मनुष्यें आपल्या कबरांतून जो एकला समर्थ आल्ला त्यासमोर दृश्य होण्यास पुढें येतील, आल्लानें प्रत्येक प्राण्यास यथायोग्य मजुरी द्यावी ह्मणून. |
| म्या फुशारी करणाऱ्याचा हेवा केला; दुष्टाचें कल्याण मला दिसलें तेव्हां माझें मन कष्टी झालें. | ज्या संपत्ति आह्मीं कित्येक अविश्वास्यांस दिल्या त्यांचा लोभ धरून त्यांवर आपली नजर लावूं नको. आणि त्यांच्यामुळें तूं कष्टी होऊं नको. |
| हे प्रभू, जर तूं अन्यायाची झडती घेतोस तर कोण उभा राहील ? | जर देव अन्यायामुळें मनुष्यांस दंड करिता, तर पृथ्वीवर तो कोणत्याही सचेतनास न सोडिता. |

| ख्रिस्ती शास्त्र. | कुरान. |
| --- | --- |
| तूं माती आहेस आणि मातींत परत जाशील. | आह्मी तुह्मांला मातींतून उत्पन्न केलें आहे आणि तींतच तुह्मी परत जाल असें आह्मी करूं. |
| दयाळू मनुष्य आपल्या जिवावर उपकार करितो परंतु क्रूर जन आपल्या देहाला सतावितो. | जर तुह्मी बरें करितां तर आपल्याच जिवाचें बरें कराल; आणि जर तुह्मी वाईट करितां तर आपल्याच जिवाचें वाईट कराल. |
| वाईटाबद्दल वाईट फेडूं नका, परंतु उलट्या प्रकारें आशीर्वाद द्या. | जें चांगलें आहे त्याकडून वाईट टाळ. |
| तुह्मी आपल्या देवाचें नाम घ्यावें आणि मी आपल्या परमेश्वराचें नाम घेईन. तेव्हां त्यांनीं मोठ्या शब्दानें हांक मारिली; तथापि कांहीं शब्द किंवा कांहीं साक्ष झाली नाहीं. | आणि मूर्त्तिपूजकांस असें ह्मटलें जाईल कीं, आल्लासहवर्त्तमान ज्यांस तुह्मी मानितां त्याचें नाम घ्या. आणि ते त्यांचें नाम घेतील परंतु ते साक्ष देणार नाहींत. |
| सर्व जे मसणांमध्यें ते त्याची वाणी ऐकतील व बाहेर येतील. त्यासमोर सर्व | आणि तो करणा फिरून वाजला जाईल आणि पाहा, ते आपल्या मसणांतून बाहेर |

| ख्रिस्ती शास्त्र. | कुरान. |
| --- | --- |
| राष्ट्रें एकवट केलीं जा- जातील. | येतील व प्रभुकडे त्वरा क- रितील. |
| परंतु अहो प्रियांनों, ही एक गोष्ट तुह्मी विसरूं न- का कीं प्रभुजवळ एक दि- वस हजार वर्षांसारखा आ - णि हजार वर्षें एक दिवसां- रिखीं आहेत. | परंतु जें ईश्वरानें भय घातलें तें सिद्धीस नेण्यांत तो अंतर करणार नाहीं, आणि जीं हजार वर्षें तुह्मी गणितां तीं प्रभुजवळ एक दिवस अशीं आहेत. |
| आतां चला. जे तुह्मी ह्मणतां कीं आज किंवा उ- द्यां आह्मी अमुक नगरास जाऊन तेथें एक वर्षभर राहूं आणि व्यापार करून लाभ मिळवूं, ते तुह्मी उद्यां- ची गोष्ट समजत नाहीं. त्यापेक्षां तुह्मी असें ह्मणावें, जर प्रभूची इच्छा असेल तर आह्मी जगूं आणि हें किंवा तें करूं. | 'देवाची मर्जी असल्या- स' हें वाक्य जोडल्यावांचून उद्यां मी निश्चयें हें करीन असें कोणत्याही गोष्टीविषयीं बोलूं नका. |
| परंतु त्या दिवसाविषयीं आणि त्या घटकेविषयीं को- णाला कळलें नाहीं. आ- | ते तुला शेवटील घटके- विषयीं विचारतील, तिच्या येण्याचा निश्चित काळ को- |

| खिस्ती शास्त्र. | कुरान. |
| --- | --- |
| काशांतील दूतांसही नाहीं, आणि पुत्रालाही नाहीं. बापाला मात्र कळलें. | णता ? उत्तर दे कीं त्याविषयीं माझ्या प्रभूला ज्ञान आहे. त्यावांचून कोणीही तिचा नियमित काळ प्रव्यक्त करणार नाहीं. |

सदरहू उदाहरणांवरून साफ नजरेस येतें कीं खिस्ती शास्त्रांतील मुख्य घडलेल्या गोष्टी व कथा ह्याच कुरानांत घातल्या असें केवळ नाहीं, परंतु अक्षरशः अनेक विषय, त्यांतील विचाराचे प्रकार व दाखले, आणि प्रयोगांच्या धाटण्या ह्या देखील घातल्या आहेत. तथापि ह्या ईश्वरदत्त ह्मणविलेल्या ग्रंथामध्यें निश्चित घडलेल्या गोष्टीविषयीं अनेक ठिकाणीं असल्या मोठ्या चुका अढळतात कीं ह्या ग्रंथाचा लिहिणारा पराकाष्ठेचा अज्ञानी किंवा अट्टल लबाड असावा अशी खातरी होईल. त्या अश्या कीं एलिया भविष्यभाषी मोश्याच्या वेळेस होता असें तो दाखवितो, इझाकाच्या बद्दल इश्माएल याचें बलिदान झालें, गिदोनाबद्दल शाऊलानें दहा हजारांस त्या नदीच्या तिरीं नेलें. आणि काळगणनेविषयीं पराकाष्ठेची गफलत करून मारिया जी येशूची आई तीच मोश्याची बहीण मरियाम आहे असें दाखवितो.

## कुरानाचे मुख्य सिद्धांत येणेंप्रमाणें:

१ देवावरील विश्वास. सर्व वस्तूंचा निर्माणकर्त्ता, निर्वेकार, सर्वज्ञ, सर्व शक्तिमान, परम दयाळू आणि अनं-

त जो आहे व होता आणि सर्वकाळ होईल, असा केवळ एकच देव आहे.

२ महमदावरील विश्वास. तो पैगंबरामध्यें शेवटला व सर्वांहून थोर आणि देवाची इच्छा व तारणाचा सत्य मार्ग पुरा प्रगट करणारा असा आहे. हें प्रगटविणें कुरानांत आहे; त्यांतलि नियम, क्रिया व संस्कार यांकडे सर्व मनुष्यांनीं लक्ष द्यावें आणि कोणताही धर्म किंवा पंथ अगोदरचा किंवा नंतरचा असो तो त्यांनीं वर्जावा असा हुकूम आहे.

३ दूतांवरील विश्वास. ते एक अस्मानी प्राण्यांची जाति, अग्नि जो शुद्ध तत्व त्यापासून झालेली, आकारानें अव्यंग व सुंदरतेनें प्रकाशमान, परंतु लिंगभेदरहित अशी आहेत. ते दैहिक हांवा व मानवी अशक्तता यांविरहित, आणि अक्षय व टवटवीत तारुण्यावस्थेंत आहेत. विशेष नामांकित असे चार मुख्य दूत आहेत ह्मणजे गाब्रिएल जो प्रगटविण्याचा दूत दैवी नेमानेम याविषयीं लिहून ठेवितो तो; मिखाएल जो धर्मार्थ लढाया करितो तो; आज्राएल जो काळदूत तो; आणि इज्राफिल जो पुनरुत्थानाच्या दिवशीं करणा वाजवील तो. आणखी एक अजाजिल नामें दूत होता. परंतु तो गर्विष्ट व फितुरी होऊन परमेश्वराचा हुकूम असतांही आदामाची भक्ति करण्यास त्यानें नाकारिलें, सबब त्याला बिहिशतांतून घालविल्या दिवसापासून तो एब्लीस या नामें प्रख्यात आहे. कुरानांत जीन किंवा जी-

नी या खालच्या पदवीच्या प्राण्यांची जाति सांगितली आहे. ते पाप व मरण यांपासून मुक्त नाहींत असें दाखविलें.

४ प्रारब्धवादाविषयीं. कुरानांत असें सांगितलें आहे कीं, सर्व गोष्टी अपालटपणें परमेश्वराकडून ठरविल्या आहेत. त्यानें मनुष्यांची अभाग्यता व सभाग्यता यांविषयींच केवळ सविस्तार ठरविलें असें नाहीं. परंतु तो धार्मिक किंवा अधार्मिक, आज्ञांकित किंवा अनाज्ञांकित, सर्व काळपर्यंत सुखी किंवा दुःखी होईल हेंही ठरविलें आहे. अ १४. सुरा इब्राहीम. आय. ४. व अ. १६. सुरा नहक. आय. ९५. यांत सांगितलें आहे कीं, देव पाहिजे त्याला मार्गावर आणतो व पाहिजे त्याला बहकवितो. तसेंच अ ७ सुरा ईराफ. आय. १६. यांत ह्मटलें आहे कीं, देवानेंच पवित्र दूताला बहकवून सैतान असें केलें. कोणत्याही दीर्घ दृष्टीनें किंवा शहाणपणानें पूर्व नियमित गोष्टी फिरवूं ह्मटलें तर असाध्य आहे. महमदानें आपल्या शिष्यांस आपल्या धर्मवृद्धिसाठीं निर्भयपणें, आपलें शीर तळहातावर घेऊन लढण्यासाठीं उत्तेजन दिल्हें असें कीं तुमच्या सर्व काळजीनें तुमचें अनिवार दैव टळवितां किंवा आयुष्य क्षणभर वाढवितां येईल असें तुह्मी समजूं नका. मनुष्याच्या स्वतंत्रतेचा ह्या सिद्धांताशीं मेळ जमण्याविषयीं अडचण पडली ह्मणजे मुसलमान लोक मनुष्याची स्वतंत्रता सोडून देतात.

५ पुनरुत्थान व शेवटला न्याय यांवर ते विश्वास ठेवितात. मरण आणि पुनरुत्थान यांमध्यें जो काळ, त्याला बर्जाक ह्मणजे अभ्यंतर काळ असें ह्मणतात. ह्या काळांत शरीर कबरेंत राहतें, परंतु आत्मा हा आपल्या पुढील फळाचा पूर्वानुभव स्वप्नानें किंवा दृष्टांतानें अगोदर घेतो. पैगंबराचे आत्मे लागलेच बहिश्‍तांमध्यें घेतले जातात; तेथें ते हिरव्या पक्ष्यांच्या गळ्यांतल्या पिशव्यांत राहतात. पुनरुत्थानाच्या दिवसाअगोदर आकाशांत व पृथ्वीवर चिन्हें व उत्पात होतील. खग्रास चंद्रग्रहण; सूर्य पश्चिमेस उगवून त्याच्या गतींत पालट; लढाया व दंगे; जगभर धर्मभ्रष्टता; ख्रीस्त विरोध्याचें आगमन; मोठी धुरांडी सर्वत्र व्यापणें; हे इतके होतील कीं प्राण जाईल तर बरें असें मनुष्यास वाटेल. करण्याच्या आवाजासरसें सर्व मेलेले उठतील; आकाशें अंधकारमय होतील; अंतराळ विरघळून जाईल आणि सूर्य, चंद्र व नक्षत्रें हीं समुद्रांत पडतील. तो करणा फिरून वाजेल, आणि सर्व प्राणीमात्र मरतील. केवळ जे थोडेसे निवडक ते मात्र परमेश्वराकडून बचाविले जातील. सरशेवटीं आज्राएल जो कालदूत त्याला मरण प्राप्त होईल. सतत पावसाचे चाळीस दिवस किंवा चाळीस वर्षे येतील; आणि मग तिसऱ्यानें तो करणा वाजेल. हें न्याय ठरविण्यासाठीं बोलावणें आहे. त्यावरून सर्व मेलेल्यांचीं शरीरें व आत्मे पुन्हा जोडले जाऊन देवाला आपल्या कर्माची झडती देण्यासाठीं व

त्यापासून त्या धर्माचें फळ पावण्यासाठीं न्यायाकरितां आणिले जातील. गाब्रिएल दूत आपल्या हातीं मोठी तराजू घेऊन एका पारड्यांत प्रत्येक मनुष्याचें सुकृत व दुसऱ्यांत त्याचें दुष्कृत घालून तोलील. मग पूल ओलांडण्याची परीक्षा होईल. सर्व समुदायाला तरवारीच्या धारेप्रमाणें निरुंद पुलावरून महमदाच्या मागें जाणें पडेल; अविश्वासू तर त्यावरून नरकांत पडतील, परंतु विश्वासू सुरक्षित पैलपार पडून बिहिश्तमध्यें जातील.

६ नरक या ठिकाणीं सर्व प्रकारचीं दुःखें भरलेलीं आहेत. तेथील झाडांस फांद्यांबदल सर्पांचीं वेटोळीं व फळांबद्दल भूतांचीं शिरें येतात. ज्याला सर्वांहून अगदीं हलकी शिक्षा देण्याची आहे त्याला अग्नीचे जोडे पायीं घालणें पडेल, तेणेंकरून त्याच्या टक्कीस देखील ऊन पाण्याच्या हंड्याप्रमाणें अधण येईल. अधर्मी मात्र अनंत काळाच्या दंडास पात्र होतील. ज्या मुसलमानांनीं अघोर घातकें केलीं ते त्यामध्यें पाठविले जातील, परंतु तेथील दुःखें भोगल्यानें त्यांच्या दोषाचा परिहार झाल्यावर ते मुक्त होतील.

७ बिहिश्त ह्मणजे सौख्य लोक. त्या आशीर्वादित बागांतील निवासी हे जवाहीरयुक्त वस्त्रें ल्याले असतां झळकतात. ते सुवर्ण मुगुट ज्यांस मोतीं व रत्नें गुंफिलीं आहेत त्यांस आपल्या मस्तकीं धारण करितात. ते महामूल्य महालांत किंवा रेशमी तंबूंत राहून विलासाच्या पलं-

गावर निजतात. तेथें प्रत्येक मुसलमानाला सर्व प्रकारच्या खाण्यापिण्याचे पदार्थ, सुवर्ण ताटें व वाट्या यांत भरून त्यांपुढें सादर करण्याकरितां शेंकडों चाकर प्राप्त होतील. तो वीट न येतां खाईल आणि निशेवांचून पिईल; शेवटील ग्रास व घोट त्याला पहिल्याप्रमाणेंच रुचिकर होईल. त्याला अति तृप्ति वाटणार नाहीं व मलमूत्रोत्सर्गाचें कारण पडणार नाहीं.

इस्राफिलाचा सुस्वर आवाज आणि कन्यांचीं गायनें वाऱ्यांत घुमतील. तेथील झाडांच्या फांद्यांला अयुतावधि घंटा बांधिल्या असतां देवाच्या सिंहासनापासून मंजूळ वारा वाहण्यावरून तीं झाडें हलतील आणि मनोहर नाद निघेल.

ह्या सर्वांखेरीज मुसलमानास त्याच्या कल्पनेप्रमाणें स्त्रियांचा मेळा प्राप्त होईल. त्याला ज्या बायका पृथ्वीवर होत्या त्या सर्व आपल्या मूळच्या सौंदर्यानें युक्त अश्या मिळतील. त्यांशिवाय त्याला हुर आलओयुन किंवा हौरिया प्राप्त होतलि; हें नांव त्यांच्या विशाल काळ्या नेत्रांवरून त्यांस पडलें. त्या देदीप्यमान, मानवी न्यूनता किंवा नाशवंतपणा या सर्वांपासून मुक्त, आपलें तारुण्य व सौंदर्य व कुमारित्व अक्षय राखणाऱ्या अश्या आहेत. प्रत्येक मुसलमानास अश्या बाहत्तर बाहत्तर स्त्रिया मिळतील. त्यांच्या सहवासानें त्याची इच्छा असल्यास संतति होईल, नाहीं तर होणार नाहीं, आणि संतति झाल्यास ती आपल्या आईबापांएवढी एका घटकेंत वाढेल.

खरा मुसलमान ह्या सौख्यस्थानांतील विषयसुखाचा उपभोग घेण्यास पूर्ण समर्थ व्हावा ह्मणून तो कबरेंतून भरजवानीनें, तीस वर्षांच्या वयाचा उठेल. त्याच्या शरीराची काठी आदामाच्या इतकी ह्मणजे तीस हात उंचीची होईल. त्याचीं सर्व बळें सुधारून अद्भुत पूर्ण दशेस येतील. त्याला शंभर मनुष्यांचा जोम प्राप्त होईल. आणि उपभोगानें त्याच्या इच्छा व वासना घाल्या न जातां प्रदिप्त होतील.

सर्वांहून हलक्या मुसलमानास देखील हीं व ह्यासारिखीं दुसरीं सुखें प्राप्त होण्याविषयीं वचन दिल्हें आहे. तेथें योग्यतेनुरूप सुखोपभोगाच्या पायऱ्या आहेत. परंतु परम योग्य मनुष्यासाठीं जीं सुखें सिद्ध केलीं आहेत त्यांचें वर्णन करितांना महमद अगदीं थकून गेला.

**धर्मसंबंधी जे आचार ते येणेंप्रमाणें आहेतः**

१ नमाज स्नानासहवर्तमान. (स्नान हें नमाजासाठीं सिद्धता होण्याकरितां नेमिलें आहे.) असा नमाज दररोज पांच वेळां केला पाहिजे. त्यामध्यें "आल्ला थोर आहे, आल्ला पराक्रमी आहे, आल्ला सर्व पराक्रमी आहे," असा स्तुतिरूप जप फारच करावा लागतो. शुक्रवारीं मशिदीमध्यें उपदेश होत असतो. त्या वारीं ईश्वरानें मनुष्याला उत्पन्न केलें ह्मणून लोकांनीं तो दिवस बहुधा पवित्र मानिला होता आणि महमदानें कांहींसें पुरातन चालीवरून परंतु मुख्यत्वेंकरून ख्रिस्ती व यहुदी यांपासून

भिन्न असावें ह्मणून तोच दिवस आपला शाब्बाथ असा स्थापिला.

२ धर्म करणें. धर्म करण्याचे दोन प्रकार आहेत; ह्मणजे जो शास्त्राकडून नेमलेला आहे त्याला जकात, आणि खुशीचा दानधर्म त्यास सादाकात असें ह्मटलें आहे. गरीब व पीडित यांचें सहाय करण्यासाठीं आपल्या उत्पन्नाचा दशमांश कोणत्याही रीतीनें दिल्हा पाहिजे असा सर्व मुसलमानांस हुकूम आहे.

३ रोजे. वर्षामध्यें रमजान ह्या सर्व मासांत सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत मुसलमानांनीं अन्न, पाणी, स्नान, सुवास, स्त्रीसंग आणि दुसरे सर्व दैहिक उपभोग व सुखें हीं वर्जावीं असा कडकडीत हुकूम आहे. परंतु रात्रीमध्यें त्यांस इतर दिवसाप्रमाणें मोकळीक आहे. महमद ह्मणत असे कीं जो कोणी रोजे करितो त्याच्या मुखाचा सुगंध कस्तूरीपेक्षांही ईश्वराला फार आवडता आहे. मोहरमची दाहवी तारीख ही उपवासाचा दिवस आहे.

४ यात्रा. प्रत्येक मुसलमानानें आपल्या आजन्मांत एकदां स्वतां किंवा दुसऱ्याच्या योगें मक्केची यात्रा अवश्य केली पाहिजे; जे पोक्त नाहींत किंवा पोक्त बुद्धीचे नाहींत, शरिरानें अशक्त किंवा यात्रेचा खर्च करण्याविषयीं लाचार आहेत ते जर न गेले तर त्यांस न जाण्याचें योग्य निमित्त आहे. जिल्हेज ह्या महिन्याच्या आरंभीं मक्केस पोहंचतां येईल असा वेळेविषयीं पूर्वीं हिशोब करून सर्वदां

यात्रेस निघतात. मक्केपासून अमुक अंतरावर पोहंचलें ह्मणजे आपण यात्रेकरू आहों असें दाखविण्यासाठीं प्रत्येक जणानें एका प्रकारचा झगा अंगीं ल्यावा. मक्केस पोहंचल्यावर यात्रिकरू अगोदर काआबा एथें लवकर जाऊन त्या काळ्या पाषाणाचें चुंबन घेतो, आणि अनेक विधियुक्त क्रियाकर्मे करितो.

महमदानें जो धर्म स्थापिला त्यांत सद्धर्मांतल्या तीन मुख्य आवश्यक विषयांची न्यूनता आहे तेवढें सांगून हा विषय संपवितों.

१ त्याच्या सत्यतेविषयीं प्रमाणांची न्यूनता आहे. मी ईश्वराकडून पाठविला गेलों असें महमदानें कांहींच प्रमाण दिल्हें नाहीं. त्यानें कांहीं चमत्कार केला नाहीं. जरी अलीकडे त्याचे अनुसारी ह्मणतात कीं त्यानें असंख्यात चमत्कार केले, तरी तो कुरानांत वरचेवर सांगतो कीं मीं कांहीं चमत्कार केला नाहीं. हें कुरान स्वतां चमत्कारादाखल पुढें केलें जातें. परंतु तेवीस वर्षांमध्यें एक पुस्तक तयार होणें हा कांहीं चमत्कार नाहीं. बरेंच सुधारलेल्या लोकांमध्यें पहिल्या प्रतीच्या कुळांतील मोठ्या घराण्याचा असा तो होता; त्याचें राहणें व्यापाराच्या मध्यस्थानीं होतें; देशाटणें घडण्यासाठीं त्याला विशेष अनुकूळ असे प्रसंग मिळाले असतां ज्ञानाचीं साधनें मिळविणें सवघड होतें; मग कित्येक वर्षें एकांतीं ध्यान करून विशाळ बुद्धिवैभवानें तीं साधनें रेखारूपास

आणण्याचा अवकाश सांपडला. तर असल्याला अज्ञान ह्मणणें हें अगदीं साजत नाहीं. त्याला लिहितां येत नव्हतें हें मत जरी लोक मान्य करितात, तरी तें खचीत आहे असें वाटत नाहीं. परंतु त्याला लिहितां येत होतें किंवा नाहीं याविषयीं काय चिंता? जीं वचनें कुरानांत आहेत तीं दुसऱ्याकडून लिहविणें यांत कांहीं अलौकिकपणा नाहीं. कुरानाशीं नवा करार लावून पाहतां हा त्यापासून केवढा भिन्न दिसून येतो! नव्या कराराच्या सत्यतेविषयीं विश्वासूला जितकीं पाहिजेत तितकीं, किंवा अविश्वासू जितक्या कल्पना घेईल तितक्यांस पुरतीं अशीं प्रमाणें आहेत; आणि त्या प्रमाणांकडून तें ईश्वरी शास्त्र असें स्थापित होतें. साक्षीदारांच्या झुंडीच्या झुंडी नव्या करारांतील घडलेल्या गोष्टींविषयीं प्रमाणें देतात. महमदी धर्म खरा आहे असें प्रमाण दाखविण्यासाठीं कुरानांतील घडलेल्या गोष्टींविषयीं एक देखील साक्षीदार नाहीं.

२ कुरानांत यज्ञार्पणाची न्यूनता आहे. त्यामध्यें कांहीं पापासाठीं प्रायश्चित्त नाहीं. ईश्वराच्या अपालट स्वभावास व त्याच्या पूर्ण नियमास योग्य असा क्षमा मिळविण्याकरितां त्यास शरण जाण्याचा कांहीं उपाय नाहीं. यज्ञार्पणाविषयीं तर मोशयाची कर्मपद्धति भरून गेली आहे, तेणेंकरून भक्तांच्या मनीं पापाची आठवण होई, आणि ज्या तारणाऱ्याविषयीं भविष्यशास्त्रांतला मुख्य विषय होता

त्यावरच्या भक्तानें आशा धराव्या असें करी. ख्रिस्ती धर्म जो इब्री विधीचा उलगडा करितो व त्यास पूर्ण करून आपल्याशीं मिळवून घेतो तो तारणाऱ्याविषयीं असें कळवितो कीं "देव देहानें प्रगट झाला" ह्मणून तो तारणारा अनंत थोर आहे; जे त्यावर विश्वास ठेवितात त्यांच्या आज्ञाभंगाच्या ठिकाणीं याचें आज्ञापालन अंगीकारिलें आहे, पापाच्या प्रायश्चित्ताकरितां त्याचें स्मरण होतें, आणि तो सर्वदा मध्यस्थि करण्यासाठीं जगतो ह्मणून तारायास समर्थ आहे. ह्या आश्रयाकडे क्लेशित मन धांव घेतें. एथें दंडपात्र पश्चात्ताप्याला शांति मिळती. जो ईश्वराच्या क्रोधापासून भयानें पळायाचा त्याचा ईश्वराशीं समेट होतो; आणि देव आपला प्रिय बाप आहे असें समजून तो त्याची सेवा आणि स्तुति करून आनंद पावतो. ज्या प्रायश्चित्ताविषयीं इब्री शास्त्रानें अगोदर छाया दाखविली व पुरातन भविष्यभाष्यांनीं कथन केलें व जें ईश्वरी पुत्रानें शुभवर्त्तमान विशेष गौरवानें सादर करितें तें महमदाला ठाऊक नव्हतें, किंवा तें त्याला ठाऊक असतांही तें त्यानें नाकारिलें आणि आपल्या लक्षावधि शिष्यांपासून गुप्त राखिलें. प्रार्थना व नवस व उपवास व यात्रा व अविश्वास्यांशीं लढणें, इत्यादिकांत पापाविषयीं प्रकाशित मनाचें प्रचंड वादळ शमविण्यास काय सामर्थ्य आहे? ईश्वराविरुद्ध जे अपराध त्यांचें निरसन करण्याविषयीं ते उपाय काय पुरे पडतील?

३ त्यामध्यें सामर्थ्याची न्यूनता आहे. भ्रष्ट अंतःकरण नवें करण्याविषयीं, मनोवृत्ति व कल्पना शुद्ध करण्याविषयीं, दुःखामध्यें आत्म्याला आधार देण्याविषयीं आणि इंद्रियनिग्रहाच्या मार्गी जीवास नेण्याविषयीं त्यामध्यें कांहींच सामर्थ्य नाहीं. त्याचे सर्व हेतु फार नीच आणि कित्येक तर अत्यंत भ्रष्ट असे आहेत. त्याच्या प्रार्थना तर अंतरानुग्रहाविषयीं कांहीं नाहींत. मनुष्याला केवळ आपल्या शक्तीचा भरंवसा आहे. मनुष्याला यापेक्षां अधिक उंच किंवा अधिक उत्तम असें कांहींच त्यांत सांगितलें नाहीं. त्याची अत्यंत गंभीर अपेक्षा, चिरकालिक अपेक्षा, सार्वत्रिक अपेक्षा ह्या पुरविण्यासाठीं त्यांत कांहीं सामग्री नाहीं. ज्या मोठ्या युद्धावरून मनुष्याच्या ठायीं व जगामध्यें वास्तविक जय व्हावयाचा आहे त्याविषयीं महमदानें कांहींच शिकविलें नाहीं. अधिकारयुक्त असून ममताळू आणि परिपूर्ण गुरु मनुष्याला कित्त्यासाठीं पाहिजे कीं त्यांनीं त्याला आपल्या पुढें ठेवून गिरवावा व त्याचें वळण धरावें; पण असा कित्ता कुरानांत नाहीं.

जर कुरानाची ग्रीक पुराणाशीं किंवा हिंदु शास्त्राशीं तुलना करून पाहिली तर कुरान सर्वोत्कृष्ट निघेल. ईश्वराविषयींचें उत्कृष्ट वर्णन; ईश्वरी ऐक्यतेचें संस्थापन; ईश्वरी सूत्र व नीतीचा अधिकार यांविषयीं निश्चित वचन; पुढील न्याय आणि परलोकींचा दंड व देणगी यांचें प्रतिपादन; ज्या सुंदर घाटणीनें त्यांतील नीतिवाक्यास शोभा

येती ती; जसें श्रीमंतास तसें गरिबासही एकसारिखें शिकविण्यावरून त्यांचा निःपक्षपात; या सर्वांवरून अशीं प्रमाणें वाटतात कीं महमदाला इब्री व ख्रिस्ती शास्त्रापासून बहुत फलश्रुति प्राप्त झाल्या आहेत. परंतु त्यांमध्यें दंतकथा, वचनविरोध आणि दुर्भाषणें, वेडगळ सोंगें, व क्रूर व घातकी नियम हीं भेसळिल्यावरून त्या सत्यतेवर महमदानें अंधार धरिला. आणि आपली हांव व विजय यांच्या योजनांस आधार देणारा असा धर्माचा आश्रय करावा ह्मणून हें सर्व धोरण त्यानें अधम हेतूवर बांधिलें. सारांश, कुराणाची नव्या कराराशीं—महमदाची येशूशीं—इस्लामी धर्माची ख्रिस्ती धर्माशीं तुलना करूं जातां त्यांमध्यें जमीनअस्मानाचा फरक आहे असें दिसून येतें.

---

## अध्याय ८.

### महमदी धर्माची प्रसिद्धि आणि तिचीं कारणें.

महमदाच्या मागें त्याच्या गादीवर कोणी बसावें याविषयीं मोठा गोंधळ पडला होता; परंतु ह्या पुढील नेमणुका झाल्यावरून त्या गोंधळाचें निवारण झालें. त्या येणेंप्रमाणें. पहिल्यानें अबुबेकराची नेमणूक; मग ओमाराची; त्यानंतर ओथमानाची; आणि मग आलीची. अबुबेकरानें आपणाला खालिफ ह्मणजे उत्तराधिकारी हीं किताब घेतली. खालेदानें मागें सांगितल्याप्रमाणें मोसेलामा जो प्रतिस्पर्धी नबी त्यास जिंकलें; आणि तीं फितुरी

आरबी कुळें पुनः अधिकाराखालीं आणिलीं होतीं. तेव्हां लागलींच इस्लामी धर्मांत सर्व राष्ट्रें वळतील तोंपर्यंत जगामध्यें ह्या धर्माचा प्रसार करावा असा जो महमदाचा हुकूम तो अमलांत आणण्याविषयीं अबुबेकरानें मनावर घेतलें. इरानी व ग्रीक बादशाहांमध्यें ज्या बहुकालिक लढाया झाल्या तेणेंकरून तीं पराक्रमी राज्यें जेरदस्तीस आलीं होतीं. तेव्हां सिरिया देश हस्तगत करून घेण्याविषयीं उद्योग चालविण्याचा त्या खलिफानें निश्चय केला. त्यानें केवळ सव्वा दोन वर्षें अंमल चालविला, परंतु जीं सैन्यें त्यानें सिरिया व इराक यांकडे पाठविलीं त्यांच्या विजयाचें आनंदकारक वर्तमान आपल्या मरणापूर्वीं ऐकलें होतें. तो मरण पावला त्याच दिवशीं दमास्कस शहर घेतलें गेलें.

ओमाराच्या अंमलांत ती लढाई तशीच विजयानें चालत गेली. इसवी सन ६३६ यामध्यें एर्मुक एथील लढाईमध्यें मुसलमानांस ग्रीक बादशहाच्या सैन्यावर पूर्ण जय प्राप्त झाल्यावरून सिरिया देश त्याच्या अमलांत आला. यरूशालेम, आलेपो आणि आंतिओख हीं नगरें लागोपाठ हस्तगत झालीं. आणि सहा वर्षें लढाई झाली असतां सन ६३९ यामध्यें सर्व सिरिया मुसलमानांच्या हस्तगत झाला. आम्रू सरदारानें मिसर देशांत सन ६३८ यामध्यें एक स्वारी केली; आलेक्झांद्रिया जी राजधानी ती लवकरच घेतली गेली आणि दोन वर्षांच्या आंत तो मोठा प्रांत खलिफास मिळाला.

महमदाला मरून बावीस वर्षे झाली असतां ज्या आलि-जाहां आरबी राज्याला सिरिया, इरान, आणि मिसर जे देश जोडिले होते ते ओथमानाच्या मरणानंतर महमदाचा चुलत भाऊ व जांवई जो आलि त्याच्या स्वाधीन झाले. जरी आलीच्या संतानांस राज्याधिकार नाहीं, तरी तीं आपल्या नबीचीं लेंकरें असें समजून मुसलमान लोक त्यांचा सर्वदा आदर करितात. सिरियामध्यें व तुर्कस्थानामध्यें लोकांचा तिसावा हिस्सा आलीचें संतान आहे, हिरवीं पागोटीं घालितात व त्यांस शेरीफ असें ह्मणतात.

आलीचा प्रतिस्पर्धी जो मोआविहा याला सैन्यानें खालिफ नेमिला आणि तो महमदासहवर्त्तमान जरी एका घराण्यांतला नव्हता, पण एकाच कुळांतील असतां आलीच्या व आब्बास जो महमदाचा काका त्याचयाही लेंकरांस हक्क तो बळकावून बसला. आणि त्यानें आपल्याच घराण्यामध्यें खालिफाची वंशावळी स्थापिली व त्याच्या वंशानें नव्वद वर्षें तो राज्याधिकार चालविला. त्यांस ऊमियादी ह्मटलें गेलें. हीं नव्वद वर्षें झाल्यावर राज्याची उलटापालट होऊन आब्बासाचा निपणतू जो इलब्राकीम याच्या पक्षाकडे तें राज्य झालें त्या वेळेपासून (सन ७५० यापासून) त्या राज्याचे युरोप, आफ्रिका आणि एशिया यांमध्यें तीन निरनिराळे इलाखे झाले. तथापि हे विभाग झाल्यापूर्वी आफ्रिकेमध्यें त्या राज्याचा फैलाव कार्थेज, तांजेर, आणि माराको एथपर्यंत होता. आणि आटलां-

टिक सागराच्या पूर्वकांठावर सारसनी लोकांनीं सन ७०९ यांत आपल्या देवळाला तांबडा पाषाण व नुमिदी संगमर-वर यांचे शोभायमान खांब लावण्यानें आपल्या वैभवाची साक्ष तेथें राखिली होती.

रोदरीक जो गोथी लोकांचा शेवटला राजा तो सन ७०९ यामध्यें स्पेनाच्या गादीवर होता. तारीक जो सारसेनांतील युद्धावर यानें आपल्या समागमें सात हजार सैन्य घेऊन जी सामुद्रधुनी युरोपापासून आफ्रिकेला विभक्त करिती ती ओलांडून काल्के डोंगर एथें आपली छावणी दिल्ही. आणि त्या गढीला आपलें नांव जिबेल अलतारीक ज्याला आतां जिब्रालटर ह्मणतात तें दिल्हें. जेरेस याजवळील ग्वदालेताच्या कांठीं गोथीक राज्य यांच्या हातीं जाईल असें लढाईंत ठरलें. रोदरिक हा आपल्या अति चपळ घोड्यावर बसून रणभूमींतून पळून गेल्यानंतर ग्वादलक्विर या नदींत बुडाला. दुसऱ्या योध्यांनीं सिंधु नदीच्या कांठच्या प्रदेशांत व तातीरीच्या बर्फयुक्त प्रदेशांतील समरकंद शहरांत जाऊन कुराणाचें घोषण केलें. चीन देश सन ७१० यामध्यें त्याच्या पुढें लीन झाला. सन ७१८ यामध्यें कानस्तांतिनोपलास ग्रीक अग्नि * कडून कांहीं वेळपर्यंत ते मागें हटले होते. पश्चिमेस ते पिरेनी डोंगरास ओलांडून

* ग्रीक अग्नि ह्मणजे नफाथ, गंधक आणि राळ यांचें मिश्रण होतें तें सातव्या शतकांत ग्रीक लोकांनीं ह्या कामास लावलें.

गेले आणि फ्रांस देशाच्या दक्षिणेस आपण राहिले. परंतु तेथून चार्लेस मार्तेल यानें त्यांस सन ७१० यामध्यें धुडावून लाविलें.

समुद्रामध्यें त्या विजयी सारासेन लोकांनीं पूर्वेच्या राज्यांतून सन ६४७ यामध्यें कुप्रसाला हिस्कून घेतलें. आणि र्‍होदस, कोर्सिका, सार्दिनिया व सिसली हीं आपल्या ताब्यांत घेतलीं. र्‍होदस एथें त्यानीं कोलासस ह्मणून पितळाची मूर्त्ति हिचा चुरा एका यहूद्यास विकत दिल्हा. तो उचलून नेण्याकरितां त्यानें नऊशें उंट भरले होते. त्या विजयी सैन्यानें तिबर नदीवरून हकारून जाऊन संतापितर याचें देऊळ लुटिलें आणि रोमाच्या कोटाला वेढा घेतला. परंतु चवथा लिओ पोप त्यांशीं शौर्यानें भिडला (सन ८४६—८५०.). त्याच्या अर्ध्या अरमाराची तर वादळानें दाणादाण झाली, त्यांतून थोडेसे निभावले, दुसऱ्यांच्या नौका फुटल्या, आणि वरकड तर कैद करून नेले गेले. त्या पोपानें आपल्या पाडावांस त्या नगराची कोटबंदी बांधायास लाविलें.

अकराव्या शतकांत स्पेन देशांतील राजपुत्र विषयांध झाले व त्यांचे सेवक महत्वेच्छा धरूं लागले, यावरून तेथील मुसलमानी राज्य विभागलें जाऊन दाहा बारा लहान लहान राज्यें झालीं. आणि चारशें वर्षांनंतर त्यांचें राज्य आणि त्यांतील उद्योगित्व, अभिरुचि आणि वैभव यांसहवर्त्तमान सन १५०९ यामध्यें नाश पावलें.

याप्रमाणें आफ्रिकेमध्यें ही निरनिराळीं राज्यें झालीं होतीं; ह्मणजे माराको, आलजीर्स, आणि तुनीस ह्या देशांच्या इतिहासांमध्यें अनेक नामें आढळतात तीं आठवून अत्यंत देदीप्यमान किंवा अत्यंत भयंकर गोष्टींचें स्मरण होतें. इतर सर्वांपेक्षां सालादीन ज्याच्या राज्याच्या वैभवाविषयीं इतिहासकांनीं आनंदेंकरून वाखाणणूक केली त्याचें तर फारच स्मरण होतें.

सारासेनी राज्याचा एक विभाग बगदादाची खालिफात होती. त्यामध्यें महमदाचा चुलता आब्बास याच्या घराण्यामध्यें पांचशें वर्षेपर्यंत वंशपरंपरेनें मुख्य अधिकार बिनधोक चालला होता. पुढें तीनशें वर्षेपर्यंत तो अधिकार रडत कसत चालला. शेवटीं त्या हतभाग्य राजांनीं मोगल व तारतार यांच्या बादशाहाच्या हातीं तो राज्यकारभार दिल्हा. तरी त्या राजांनीं अणखी तीनशें वर्षेपर्यंत एक प्रकारचें धर्मसंबंधी स्वामित्व राखिलें होतें परंतु जगीक अधिकाराला ते अगदीं मुकले होते.

एशिया खंडाच्या ईशान्येकडील सुदृढ मेंढके मुसलमानी राज्यांवर चालून आले. हिंदु राज्याची स्थापना महमुदानें सन ९९९ या मध्यें केली. या बादशाहानें आपणाला सुलतान ही किताब पाहिल्यानेंच घेतली. त्यानंतर सन १३९९ यांत तें राज्य तिमूर यानें जिंकून घेतलें. त्यांनांच तिमूरलेन ह्मणतात. हें नांव, तिमुर ह्मणजे राजकुमर, आणि लेन ह्मणजे पारसीमध्यें लंगडा हे दोन

शब्द होऊन झालें आहे. तिमूराचा जन्म समरकंद जी तारंतार लोकांची राजधानी तिच्या जवळ झाला होता. त्यानें आपल्या जन्म देशाला असंभूत वशर्थिनें व शौर्यानें हिंदुस्थान, इरान, आणि सिरियाचा मोठा भाग जोडला. आणि चीन देशही जिंकण्याविषयीं तो पुढें चाल करणार होता तेव्हां त्याच्या अघोर विजयी व झोटिंग बादशाही चरित्राची समाप्ति त्याच्या सत्तराव्या वर्षी झाली.

बाराव्या शतकाच्या मध्यें आत्तमान तुर्की लोकांचे पूर्वज हे कास्पियनाच्या उत्तरेपासून निघून खोराजानांत आले आणि चवदाव्या शतकांत ते एशिया मैनराच्या सेलजूक लोकांशीं मिसळून गेले होते.

ह्या एकत्र झालेल्या लोकांमधून ओथमान जो अर्वाचीन तुर्की राज्याचा स्थापणारा तो उत्पन्न झाला. तो ग्रीक राज्याच्या सरहद्दीवर असतां त्याच्या मनीं महत्वेच्छा उद्भवल्यावरून त्यानें ओलिंपसाच्या मार्गानें बिथिनियापर्यंत दौड केली. तेथें सत्तावीस वर्षेंपर्यंत विजयी स्वाऱ्या केल्यावर त्यानें राज्याधिकार स्थापिला तो त्याचा पुत्र ओरखान यास प्राप्त झाला. आणि त्या गादीवर तसेंच वंशपरंपरेनें आमराथ बजाजेत, आणि दुसरा आमराथ हे बसत आले. दुसऱ्या आमराथाचा पुत्र जो दुसरा महमद यानें सन १४५२ यांत कान्स्तांतिनोपल घेतलें आणि पूर्वेकडील रोमी राजाचा नाश केला.

शेवटीं आत्तमान लोकांनीं सन १६६९ यांत कांडिया

आणि सन १६७२ यांत कामेनीक हें जिंकून घेतलें. तेव्हांपासून तुर्की राज्य उत्तरोत्तर क्षीण होत आलें आहे.

तारतारी देश यांत थैबेताचा ग्रांडलामा याचे अनुसारी; ग्रीक मंडळीचे ख्रिस्ती; सरकासी व दुसरीं कुळें ज्यांस कोणताही धर्म नाहीं असें दिसतें तीं; आणि मुसलमान; हे लोक यथाविभागें राहत आहेत. मुसलमान लोक ज्या मोठ्या प्रदेशीं राहतात त्याचा विस्तार कास्पियनापासून तर बलुच्याच्या पर्वतापर्यंत आणि वालुकास्थळापलिकडील जें गौर त्याच्या डोंगरापासून तर रुशियाच्या सरहद्दीवर जें इसिम तेथपर्यंत आहे. त्याची लांबी पंधराशें मैलांला कमी नाहीं आणि रुंदी आठशें मैलांपेक्षां जास्ती आहे.—चीन देशांतही महमदी धर्माचा प्रवेश होऊन कित्येकांनीं तो अंगिकारिला आहे.

हिंदुस्थानांत जे मुसलमान मांडलीक राजे, व काजी होत आले ते बहुधा सुन्नी आहेत. आणि जे इरानापासून आले ते शिया आहेत. याखेरीज बहुत हिंदुही मुसलमान झाले आहेत. पंजाबामध्यें शीक लोकांत दोन्ही धर्माची कालवाकालव झाली आहे. हिंदुस्थानामध्यें मुसलमानांची संख्या कोटी दीडकोटी आहे. पूर्वेकडील मोठाल्या बेटांमध्यें ते तर पुष्कळ आहेत, परंतु किती आहेत असा आकार करण्यासाठीं आह्मांस कांहीं उपाय नाहीं.

मक्केस यात्रेचा मेळा दरसाल कमी कमी होत चालतो. परंतु अमीर व उमराव अशा पदवीचे पुरुष व स्त्रिया हीं

आपल्या यात्रा दुसऱ्यांकडून करवितात. मोठाले रस्ते, जहाजें आणि चौकी पाहरे येणेंकडून मुसलमानी राजे सहाय करितात. आणि तारतारी मनुष्य सिद्धीसीं भेटतो आणि सरकासीं, इरानी आणि हिंदु यांशीं जे यात्रेकरू बारबरी व माराकोपासून येतात त्यांशीं मिळून चालतात आणि तेथून आपापल्या लोकांकडे काश्मीरी शाला किंवा बंगाली मलमल, खिलानी मोती, लंकेची दालचिनी किंवा गवळकोंडाचे हिरे असे नेतात.

जगामध्यें या धर्माची पहिली स्थापना व त्याचा त्वरित पराक्रमयुक्त फैलाव, त्याचें इतक्या अनेक पिढ्यांपर्यंत टिकणें, आणि ज्या राष्ट्रांनीं तो अंगीकारिला त्यांच्या मनावर व चालीवर खंबीर सत्ता धरून त्याचें राहणें, याचें वास्तविक कारण काय असेल? असा विचार उत्पन्न होतो. बाह्यात्कारिक विजयावरून त्या धर्माला देव मान्य करितो याचें आणि सत्य मंडळीचें हें लक्षण आहे असें समजावें कीं काय?

असें अगदीं नाहीं; कारण कीं जो प्रकार मनुष्याला पसंत झाला तो देवालाही पसंत आहे, असें आह्मी ठरवूं नये. सर्व मनुष्यमात्र ईश्वराशीं समचित्त असतें तर असें मत धरणें शोभतें. लोभाची व्याप्ति तर सर्व जगभर झाली आहे आणि हरएक देशांत पाहिलें तर लोक फारकरून लोभाच्या सत्तेंत आहेत आणि उत्पत्तिपासून अशीच गोष्ट आहे. परंतु यावरून लोभ हा ईश्वरापासून आहे असें

कोण ह्मणेल? मनुष्यामध्यें या धर्माचा विजय झाल्यावरून तो देवापासून असण्याचें प्रमाण आहे असें अनुमान करण्यापेक्षां निराळा सिद्धांत करावा हें अधिक योग्य होईल, ह्मणजे ईश्वरप्रणीत जो धर्म त्या विरुद्ध सर्व उठतील आणि त्याचा जगामध्यें पायंडा राखिला जाणें देखील कठीण पडेल. सरशेवटीं खरेपणाचा विषय होईल असें आह्मीं समजावें खरें, परंतु सांप्रत तर खरें व खोटें मिश्रित होऊन चालत आहे. जरी ईश्वर कांहीं प्रकारें आपल्या इच्छेप्रमाणें मनुष्यास आकळितो व उत्तेजन देतो, तरी पूर्ण प्रतिफळाचा समय येईल तोंपर्यंत मनुष्यास आपल्या इच्छेनुरूप स्वतंत्रतेनें वर्तूं देतो हें उघडच आहे. खऱ्या मंडळीचीं लक्षणें तिच्या मताच्या सत्यतेवरून आणि तिच्या लोकांच्या धार्मिकपणावरून समजावीं. जीं चिन्हें दुष्ट मंडळीचींही असतील त्यांपासून तिला वेगळीं पाहिजेत, नाहीं तर प्रमाण दिसणार नाहीं.

हे दोष आतां एकीकडे ठेवून जो इतिहास आह्मांपुढें घडला आहे त्याकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहूं.

१ धर्माविषयीं अरब लोकांचा स्वभाव कसा होता? ते चंचळ बुद्धीचे होते; त्यांच्यामध्यें अनेक पंथ होते; त्यांच्यामध्यें मूर्त्तिपूजक, नास्तिक, यहूदी आणि बिघडलेला ख्रिस्ती धर्म अंगिकारणारे अशया लोकांची भेळमेळ झाली होती.

कोणी धैर्यवान व हुशार सुधारणारा जो शाहणा व

भक्तिमान असा मानिलेला होता त्यानें ह्या सर्व प्रकारच्या लोकांमधून थोडक्या जनांस त्यांच्या आसमंतांत ज्या भ्रांत्यांचें प्राबल्य झालें त्या पाहण्याकरितां व ज्या धर्ममतांत प्रत्येक मनुष्याला आ[illegible]ला मतलब काईम राहून दुसऱ्याचे दोष दिसूं येतात तें मत अंगीकारण्याकरितां उत्तेजित करावें यांत हो काय नवल आहे? प्रमाण व सत्यतेची आवड यांस धरून चालावें असा आरबी मनुष्यांचा स्वभाव नव्हता. परंतु त्यापेक्षां ते आपल्या कल्पना व मनोवृत्तीचा उत्साह यांप्रमाणें चालत असत. त्यांच्या भावना व मनोवृत्ति यांस बरें वाटेल असें मत सांगितल्यास तें अंगीकारलें गेलें यांत काय आश्चर्य मानावें?

२ महमदाची स्थिति व गुण यांकडे आपण लक्ष देऊं. त्याच्या जन्मनगरीमध्यें त्याचें घराणें कित्येक पिढ्यांपासून धर्माधिकारी असें मोजिलें होतें. "एक ईश्वर आहे" अश्या ज्या मोठ्या सिद्धांतावर त्या लोकांचे वाडवडील विश्वास धरित होते आणि अवस्थेची सुधारणा, या दोन गोष्टींकडे कांहींसें लोकांनीं लक्ष द्यावें व यथाकाळीं त्यांस अनुकूळ व्हावें अशी अपेक्षा तर त्यास सहज धरितां आली.

३ महमदानें जो उद्देश धरिला त्याकडे आपण लक्ष देऊं. सार्वभौम राज्याची स्थापना व्हावी, हाच काय तो महमदाचा उद्देश होता याविषयीं कुरान व त्याचा वृत्तांत वाचणाऱ्याला कांहीं संशय राहणार नाहीं. प्र-

त्येक मत, प्रत्येक नियम आणि बेत यांत केवळ हाच उद्देश दिसून येतो. मनुष्याच्या निरनिराळ्या धर्मांवरून त्यांच्या स्थितीवर जीं महत्कार्यें घडलीं होतीं तीं पाहून त्याच्या तीव्र बुद्धीस असें समजलें कीं जर मीं धर्माचें निमित्त करून एक सैन्य तयार करितों आणि धर्माच्या आवेशानें आपल्या शिष्यांचा युद्धोत्साह प्रदीप्त करितों आणि ऐहिक विजय व पारलौकिक सुख यांची निश्चित आशा दाखवितों, तर हें जग जिंकून हस्तगत करण्याविषयींची जी आपली आशा ती निःसंशय सिद्धीस जाईल. हाच उद्देश त्याच्या तीव्र बुद्धीस सुचला असतां आपल्या आयुष्याचा हा मुख्य उद्देश आहे असा त्याच्या महत्वेच्छेनें धरिला. आणि त्या कार्यार्थ धर्मपिस्यानें तो स्वतां व त्याचे शिष्य विशेष प्रदीप्त उत्कंठेनें प्रवृत्त झाले.

४ लोकांचें चित्त वेधणें व यश संपादणें यांसाठीं महमदानें जे उपाय निवडून घेतले त्यांकडे आपण लक्ष देऊं. त्यानें आपल्या देशांतील प्राचीन धर्ममतांतून कांहीं घेतलें; आपल्या ग्रामस्थ लोकांच्या भक्तिभावाविषयीं प्रशंसा केली; त्यानें त्यांच्या देवळाची आणि त्या विलक्षण काळ्या पाषाणाची उपासना पहिल्याप्रमाणें राखिली; अरबस्थानांतील सर्व कुळें आणि दुसऱ्या राष्ट्रांतील मनुष्यें यांनीं मक्केची यात्रा करण्यासाठीं जमा व्हावें ह्मणून त्यानें सांगितलें. यहूदी लोकांबरोबर त्यानें मोशे हा ईश्वरी पैगंबर होता असें कबूल केलें.

खिस्ती लोकांबरोबर मोशे व येशू हे ईश्वरी पैगंबर होते असें मान्य केलें. आणि मोश्यानें ज्या भविष्यभाष्याविषयीं व येशू ख्रीस्तानें ज्या संबोधकाविषयीं भविष्यें सांगितलीं तो मी आहें असें त्यानें आपल्याला पुढें केलें. ज्या कुरानाविषयीं त्याच्या देशांतील कवींनीं ह्मटलें कीं तुलना करून पाहतां कुरानासारिखें आमच्याजवळ कांहीं नाहीं, तें त्यानें आपल्या पैगंबरपणाच्या पुराव्यास पुढें केलें. त्यानें एकांतीं पहिली आपली बायको, मग आपला दास, नंतर आपला चुलत भाऊ ( तो तर सोळा वर्षांचा तापट तरुण होता ) यांस, आणि ह्यानंतर अबुबेकर ज्यानें अणखी दहा अब्रूदार व वजनदार मनुष्यांस वळविलें त्यासही आपला पैगंबरपणा अंगीकारण्यासाठीं मनाविलें. त्याचा प्रतिपाळ त्याच्या चुलत्यानें केला आणि जी संपत्ति त्याला लग्न करण्यावरून प्राप्त झाली तिजवरून तो वजनदार झाला. आपल्या गोष्टीची सिद्धता करण्यासाठीं एकांतीं कित्येक वर्षेंपर्यंत त्यानें मेहनत केली. काआबा एथें जे यात्रेकरू मिळाले होते त्यांस त्यानें उपदेश केला. आबुतालेबाच्या मरणापासून त्याचा पाठिंबा नाहींसा झाल्यावर त्यानें पळ काढिला. पळण्यापूर्वी तो आपल्या मनांत सौम्य, वर्त्तणुकींत नम्र, पाठलागांत सहनशील, असा होता आणि मृदु भाषणानें आपलें काम चालवीत असतां त्यानें आपल्या कुटुंबाबाहेरचे तीन वर्षांत अकरा शिष्य आणि साता वर्षांत सुमारें

शंभर शिष्य केले. मदिनेस तो पळून गेला तेव्हां आपल्याला हातेरबंद अनुसाऱ्यांचा सेनापति करून भांडखोर कुळांचा वैरभाव अगदीं मोडून टाकावा, असा हेतु त्यानें प्रगट केला. लढायांमध्यें विजयी होऊन त्यानें शौर्याची कीर्ति मिळविली, आणि लूट विभागून देण्यानें आपल्या अनुसाऱ्यांस संतोषविलें. त्यानें फौजा जमविल्या. आपला हुकूम चालविण्यापुरता जेव्हां त्याला सैन्याधिकार मिळाला होता तेव्हां जे लोक द्राक्षारस सर्वदा नेमस्त पीत असत व ज्यांस कधींही त्याची चट लागली नव्हती तश्या अरबी लोकांस तो पिणें वर्ज केलें. ज्या दुसऱ्या वासनांविषयीं त्याचे अनुसारी अगदीं लंपट होते तिजविषयीं त्यानें त्यांस मुभा दिल्ही. अविश्वास्यांच्या परलौकिक दुर्दशांविषयीं अखंड उत्कंठेनें व पराकाष्ठेच्या भयंकर रूपानें वर्णन केलें. जे धर्मासाठीं लढतात त्यांस रेशमी झगे, संगमरवरी महाल व कारंजीं आणि सुंदर कुमारी मिळतील असें त्यानें वचन दिल्हें. जें दैवीं लिहिलें तें कधीं चुकत नाहीं असें त्यानें शिकविलें. अश्या एकवटलेल्या व शिक्षित फौजांचा तो सरदार असतां विजयी झाला आणि शत्रुपुढें "कुरान, कर देणें, किंवा तरवार," यांतून एक निवडून घेण्याविषयीं त्यानें लोकांस निकड लाविली. त्यानें लढायांचा उपाय लाविला नसता तर त्यांचा धर्म त्याच्या देशापलीकडे कधीं पसरला गेला असता असें वाटत नाहीं.

९ त्याच्या अनुसाऱ्याच्या विजयाविषयीं विचार करूं जातां त्याचीं कारणें सहज ध्यानांत येतील. तेव्हांचीं मोठालीं राज्यें अशक्त झालीं होतीं ह्मणून त्यांच्यानें त्यांस मागें हटवेना. दुसरी गोष्ट ते महमदी योद्धे आडदांड, शौर्य, खुनसी स्वभाव, आणि प्रज्वलित धर्मपिसें या गुणांनीं युक्त असतां वालुकास्थळांतून येऊन त्या जर्जरित राज्यावर व त्या वेळच्या भ्रष्ट मंडळ्यांवर तुटून पडले. हन लोकांच्या व गाथ लोकांच्या दौडी व त्यापेक्षां प्राचीन काळचे विजय यांची आठवण केली असतां सारसेन लोकांच्या त्वरित विजयावरून आह्मांला फार आश्चर्य वाटूं नये.

इसलाम हा पूर्वेकडे ब्रिटिश अधिकाराखालीं आकळिला व पश्चिमेकडे सर्व युरोपाचा चौकी पाहरा ठेविला असें असतां पिंजऱ्यांत घालून अरबस्थानाच्या वालुकास्थळापासून आणिलेल्या सिंहासारिखा आहे; किंवा जो गरुड पक्षी पेत्रियाच्या खडकाळ डोंगरापासून आणीला असून ज्याचे पर निःसत्व व ज्याचीं पंखाडें मोडलीं असतां आपल्या पिंजऱ्यांत झुरत आहे त्यासारिखा आहे. प्राचीन काळांत घडलेल्या लढाया पुन्हा व्हायाच्या नाहींत. सांप्रत जे अधिकार जगामध्यें चालत आहेत त्यांवरून असें पुन्हा होण्याची आशा व भय अगदीं नाहींसें होतें. तर जसा महमदी इतिहासावरून त्याच्या धर्माचा प्रारंभ दाखविला गेला तसा आतां त्यावरून

त्याचा शेवटही स्पष्ट दाखविला जातो. विद्यांचा शोध त्याविरुद्ध आहेत. कलाकौशल्यांच्या योजना त्याविरुद्ध आहेत. राज्यकारभाराच्या सुधारणा त्यास प्रतिकूळ आहेत. राष्ट्रांची संपूर्ण बढती त्यास प्रतिकूळ आहे. या सर्वांशिवाय ख्रिस्ती धर्माची सत्यता त्याविरुद्ध आहे. बालाभ्यासाचें पुस्तक, लोहचुंबक, दुर्बीण, छापखाना, ख्रिस्ती शास्त्र जें आतां इकडील सर्व भाषेत प्रसिद्ध केलें आहे हीं सर्व त्यांस प्रतिकूळ आहेत. हीं शस्त्रें तरवारीपेक्षां खोल घाय करितात; तोफेच्या गोळ्यापेक्षां लांब पोहंचतात; आणि " वेळ व समय " म्हणून सांगण्याविषयीं आह्मांकडून कदाचित कांहीं चूक घडेल, तरी ज्या पराक्रमासमोर महमदाच्या धर्माचा आणि त्याच्या राज्याचा टिकाव कधीं व्हावयाचा नाहीं, त्याचीं मूलतत्वें तर आहेतच.

महमदाची व येशू ख्रीस्ताची वास्तविक तुलना करूं ह्मटलें तर कठीण आहे.

" देवाचा पुत्र " याविषयींच्या भिडेनें आह्मांस प्रतिबंध झाला नसता तरी दुर्व्यसनी, बहुपत्निवादी, लुटारू, जाज्वल्य योद्धा, कठोर धर्माभिमानी याशीं " मनुष्याचा पुत्र " जो परोपकारिक आणि पवित्र याशीं आमच्यानें कशी साम्यता करवेल ?

कित्येक गुणलक्षणांविषयीं तर फेरफार उघडच आहे तो येणेंप्रमाणें. येशू यहूदांतच राहिला व मेला; महमदानें

तर अनेक राष्ट्रांच्या व विरुद्ध धर्मांच्या लोकांमध्यें हिंडून त्यांशीं वहिवाट केली. महमद तर आरबी लुटारूंचा पुढारी होता; येशू चहुंकडे कल्याण करीत फिरला. महमद फौजांचा अधिपति असतां योद्धा झाला; येशू " शांतीचा अधिपति" होता. महमद पराकाष्टेचा विषयलंपट होता; येशू तर "पवित्र, निष्पापी, निष्कलंक, पाप्यांपासून वेगळा," असा होता. महमद महत्वेच्छु होता; येशू " अंतःकरणांत नम्र व लीन" होता. महमदानें आपल्या पैगंबरपणाविषयीं प्रमाणार्थ एकांतीं बनावलेलें कुरान पुढें केलें; येशूनें तर " जीं कामें मनुष्याला करितां यायाचीं नाहींत अशीं कामें केलीं. त्यानें रोग्यांस निरोगी केलें, आणि मेलेल्यांस उठविलें." रक्त पाडावें व जिंकावें ह्मणून महमदानें आपल्या अनुसाऱ्यांस बोलाविलें; येशूनें आपल्या शिष्यांस पश्चात्ताप, नम्रता आणि प्रीति करण्यास आज्ञापिलें. महमद शत्रूला चुकांडी देऊन पळून गेला; येशूनें देहादुपारीं चमत्कारिक रीतीनें आपला बचाव केला. ज्यामध्यें पूर्वापार विरोध आहे असा धर्म महमदानें शिकविला; येशूनें सर्वदा एकसारिखेंच शिकविलें. महमद नाश करणारा होता; येशू तर तारणारा आहे.

समाप्त.